



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार २३ मे २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०






## वाघाच्या हल्ल्यात 4 महिला ठार

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहरातून एक अतिशय धक्कादायक बातमी समोर आली असून वाघाच्या हल्ल्यात ४ महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही-पवनपार परिसरातील ही घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तेंदुपत्ता तोडण्यासाठी १३ महिला जंगलात गेल्या



असताना यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात ४ महिलांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी आणि पोलिस विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. या प्रकरणाचा सविस्तर तपास झाल्यावर याबाबत अधिक माहिती मिळण्याची शक्यता आहे. मात्र या घटनेमुळे परिसरात मोठा तणाव निर्माण झाला असून वाघाच्या हल्ल्यात एकाच वेळी चार महिलांच्या मृत्यूची जिल्ह्यातीलच नाही तर राज्यातील ही पहिली घटना असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वाघाच्या हल्ल्याची ही घटना गुंजेवाही-पवनपार या मार्गावर असलेल्या खैरीचक परिसरातील जंगलात घडली असून सर्व महिला या गुंजेवाही या गावातील रहिवासी आहेत. त्या सर्व महिला भट्टी मोहल्ला वार्ड क्रमांक १ येथे राहतात. (पान २ वर)

# झारखंडमध्ये एकाच वेळी २७ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**रांची/वृत्तसंस्था :** झारखंडमध्ये आज २७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. ज्या २७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, त्यापैकी २५ केंद्रीय समिती सदस्य मिसिर बेसरा उर्फ सागर जी, असीम मंडल यांच्या पथकातील शीर्ष कमांडर आणि मारक दलाचे सदस्य आहेत. हे सर्व कोल्हान आणि सारंडाच्या दुर्गम जंगल-पहाडी भागांत सक्रिय होते. आत्मसमर्पण करणा-यांमध्ये ६ उप-विभागीय समिती सदस्य, ६ क्षेत्र समिती सदस्य आणि १३ दलाचे सदस्य समाविष्ट आहेत. यासोबतच गुमला जिल्ह्यात सक्रिय असलेल्या जेजेएमपी संघटनेच्या २ नक्षलवाद्यांनीही शस्त्रे खाली ठेवली




आहेत. पोलिसांनुसार, हे सामूहिक आत्मसमर्पण राज्यात नक्षलवादी कारवाया कमकुवत होत असल्याचे संकेत आहे. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांपैकी ८ जणांवर एकूण ३३ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. या सर्वांविरुद्ध विविध जिल्ह्यांमध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलिसांचे म्हणणे आहे की, सतत चालवल्या जाणा-या मोहिमा आणि कठोर कारवाईमुळे नक्षलवादी दबावाखाली आहेत. झारखंड पोलिसांच्या रणनीतीचा परिणाम असाही दिसून आला की तेलंगणा आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्येही नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. अधिका-यांचे मत आहे की अशा आत्मसमर्पणामुळे संघटनेची रचना कमकुवत होते आणि नवीन तरुणांच्या भरतीवरही परिणाम होतो. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत (पान २ वर)

## राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** निवडणूक आयोगाने १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून आहे. या जागांवरील विद्यमान सदस्य २१ जून ते १९ जुलै दरम्यान निवृत्त होत आहेत. निवृत्त होणा-या सदस्यांमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्यासह २४ खासदारांचा समावेश आहे. आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांमध्ये प्रत्येकी चार जागांसाठी निवडणूक होणार आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होईल. झारखंडमध्येही तीन जागांसाठी निवडणुका होणार आहेत. तसेच मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराम या राज्यांमध्ये (पान २ वर)

## इंजेक्शनद्वारे दिले जाणारे ऊत्पादने कॉस्मेटिक नाहीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सेंट्रल ड्रग्स स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन (सीडीएससीओ) ने स्पष्ट केले आहे की, इंजेक्शनद्वारे दिले जाणारे कास्मेटिक उत्पादने कायद्यानुसार वैध नाहीत. म्हणजेच, सौंदर्य वाढवण्यासाठी वापरल्या जाणा-या इंजेक्शनला कास्मेटिक मानले जाणार नाही आणि त्यांच्या वापरास परवानगी नाही. हा निर्देश अशा वेळी आला आहे, जेव्हा देशभरातील ब्युटी क्लिनिक आणि वेलनेस सेंटरमध्ये



शस्त्रक्रियेविना सौंदर्य उपचार वेगाने लोकप्रिय होत आहेत. सोशल मीडियावरही त्यांचा जोरदार प्रचार केला जात आहे. संस्थेचे प्रमुख डीसीजीआय यांनी सांगितले की, कायद्यानुसार कास्मेटिक उत्पादने केवळ शरीरावर लावण्यासाठी, फवारण्यासाठी किंवा स्वच्छता आणि सौंदर्य वाढवण्यासाठी असतात. त्यांचा इंजेक्शनच्या स्वरूपात वापर केला जाउ शकत नाही. नियामकाने अशीही चेतावणी दिली आहे की, दिशाभूल करणा-या जाहिराती, खोटे दावे आणि प्रतिबंधित घटक असलेल्या कास्मेटिक उत्पादनांवर कठोर कारवाई केली जाईल. यासोबतच लोकांना असेही सांगण्यात आले आहे की, जर कुठे असे अवैध किंवा दिशाभूल करणारे उपचार होत असतील, तर त्याची तक्रार संबंधित अधिका-यांकडे करावी.

**सौंदर्यप्रसाधने उपचार करू शकत नाही-** सोमवारी जारी केलेल्या नोटीसमध्ये उऊरऊ ने स्पष्ट केले की इंजेक्शनच्या (पान २ वर)

## नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची पुण्यात मोठी कारवाई

# भौतिकशास्त्राचा पेपर फोडणा-या शिक्षिकेला बेड्या




**पुणे/प्रतिनिधी :** देशात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात दोन शिक्षकांना अटक केल्यानंतर आता केंद्रीय अन्वेषण विभागाने पुण्यातील आणखी एका शिक्षिकेला अटक केली आहे. मनीषा संजय हवालदार असे या शिक्षिकेचे नाव असून, या महिलेचा नीट परीक्षेचा भौतिकशास्त्राचा पेपर फोडण्यात कथित सहभाग होता, अशी माहिती सीबीआय अधिका-यांच्या हवाल्याने इंडियन एक्सप्रेसने प्रसिद्ध केली आहे. यापूर्वी सीबीआयने नॅशनल टेस्टिंग एजन्सीने नियुक्त केलेल्या दोन शिक्षकांना अटक केली आहे.

**भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होत्या-** संशयित आरोपी मनीषा संजय हवालदार सध्या पुण्यातील सेठ हिरालाल सराफ प्रशालेत कार्यरत असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने त्यांना नीट परीक्षेसाठी तज्ञ म्हणून नियुक्त केले होते. हवालदारांकडे नीट भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होत्या. एप्रिलमध्ये भौतिकशास्त्राचे अनेक प्रश्न सहआरोपी मनीषा मांढरेला शेअर केले होते. पेपरफुटीच्या या प्रकरणात मांढरेला १६ मे रोजी अटक करण्यात आली आहे, एक्सप्रेने सीबीआयच्या हवाल्याने प्रसिद्ध केलेल्या वृत्तात म्हटले आहे.

**यापूर्वी मनीषा मांढरेंना अटक-** संशयित मनीषा हवालदारने शेअर केलेले प्रश्न नीट भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांशी जुळल्याचे सीबीआयच्या तपासात उघड झाले आहे. गेल्या आठवड्यात मनीषा मांढरे यांना या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. मांढरे पुण्यातील शिवाजीनगर येथील म ?डर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात शिक्षिका म्हणून (पान २ वर)

## NEET पेपरफुटीचा पर्दाफाश; तब्बल ५ राज्यांमध्ये विक्री, महाराष्ट्रात सर्वाधिक खरेदीदार!

**मुंबई/प्रतिनिधी :** शभरातील वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या नीट परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण



विभागाच्या म्हणजेच सीबीआयच्या तपासातून एक अत्यंत खळबळजनक माहिती समोर आली आहे. नीट परीक्षेचा फुटलेला पेपर देशातील तब्बल ५ राज्यांमध्ये विकला गेला होता, आणि या पेपरची सर्वाधिक विक्री महाराष्ट्रात झाली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची चौकशी आणि त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाईल व लॅपटाप यांसारख्या डिजिटल गॅजेट्सच्या तांत्रिक तपासणीनंतर हा सगळा प्रकार उघडकीस आला आहे. तपासात समोर आले आहे की, या पेपरफुटीच्या सिंडिकेटला सर्वाधिक आर्थिक प्रतिसाद महाराष्ट्रातून मिळाला असून महाराष्ट्रापाठोपाठ (पान २ वर)

## मंत्र्यांचे दावे फोल, बुलढाण्यात इंधनाचा हाहाकार!



बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा जवळील परडा फाट्यावर इंधन तुटवड्याविरोधात रस्ता रोको आंदोलन करताना संतप्त शेतकरी आणि नागरिक

### ४४°C तापमानात डिझेलसाठी रांगा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असो की पुरवठा मंत्री छगन भुजबळ रोज एकच दावा करतात की, पेट्रोल, डिझेल चा तुटवडा नाही! यामुळे इतर सत्ताधारी नेते, मंत्री, आमदार देखील हाच सूर आवळत आहे. इंधनाचा तुटवडा नसून जनतेने अफ़वावर विश्वास ठेवू नये, घाबरू न जाउ नये असे कोरडे उपदेशवजा आवाहन केले जाते. प्रत्यक्षात, जिल्ह्यातील पंपावर लहान मोठ्या वाहनधारकांच्या दीर्घ रांगा कायम आहे. इंधनाचा साठा नाही वा अपुरा साठा आहे, अनेक ठिकाणी इंधन नाहीच्या पाट्या लागल्या आहेत. यामुळे कारचालक असो की दुचाकी, आटो चालक असो की ट्रॅक्टर चालक, सर्वांचे इंधन टंचाई ने बेहाल केले आहे. बुलढाणा जिल्ह्यात किरकोळ अपवाद वगळता असेच भीषण चित्र आहे.

**मोताळा तालुक्यातही बेहाल** -मोताळा तालुक्यातील जनता जनार्दनाचे, लहान मोठ्या वाहन धारकांचे असेच बेहाल होत आहे. कडक उन्हात व बेचाळीस डिग्री सेलसियस तापमानात पेट्रोल, डिझेल साठी दीर्घ रांगामध्ये उभे राहण्याची पाळी आली. कधी कधी रात्री अपरात्री पंपसमोर उभे राहावे लागत आहे. पेट्रोल (पान २ वर)

## अभिजीत दीपकेचे इन्स्टाग्राम खाते हॅक

### कॉकरोच जनता पार्टीचे इन्स्टावरील बॅकअप अकाउंट हटवले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर आणि देशभरात अभिजीत दीपके चर्चेत आहेत. अभिजीत दीपके यांनी स्थापन केलेल्या कॉकरोच जनता पार्टीची देशभर चर्चा सुरु आहे. अभिजीत दीपके हे मूळचे महाराष्ट्रातील असून सध्या शिक्षणानिमित्त अमेरिकेतील बोस्टन येथे आहेत. अभिजीत दीपके यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर पोस्ट करुन त्यांचं इन्स्टाग्राम खातं हॅक झाल्याची माहिती दिली आहे. याशिवाय बॅकअप म्हणून कॉकरोच जनता पार्टीचं काढलेलं खातं हटवण्यात आल्याची माहिती देखील




दीपके यांनी शेअर केली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणीदरम्यान देशातील युवकांचा परजिवी आणि झुरळं असा उल्लेख केला होता. दुस-याच दिवशी त्यांनी स्पष्टीकरण देखील दिलं होतं. मात्र, अभिजीत दीपके यांनी इन्स्टाग्रामवर कॉकरोच जनता पार्टी नावाचं अकाउंट सुरु केलं. दीपके यांच्या या पार्टीच्या फॉलोअर्सच्या संख्येत नाट्यमयरित्या वाढ झाल्याचं पाहायला मिळतं. इन्स्टाग्रामवर सीजेपीचे २ कोटींहून अधिक फॉलोअर्स झाले आहेत. मात्र, अभिजीत दीपके यांनी त्यांच्या पक्षाची सोशल मीडिया खाती हॅक करण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा (पान २ वर)

## संविधान मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नाही-सरन्यायाधीश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संविधान सर्व नागरिकांसाठी समान आहे आणि ते अशा काही मोजक्या उच्चभ्रू लोकांचा विशेषाधिकार नाही जे महागड्या न्यायालयीन प्रक्रियांचा खर्च उचलू शकतात आणि देशातील सर्वात हुशार वकिलांची मदत घेउ शकतात, असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी म्हटले आहे. वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांच्या द कान्स्टिट्युशन इज माय होम: कान्वर्सेशन्स ऑन अ लाईफ इन लॉ या आत्मचरित्राच्या प्रकाशन सोहळयातील भाषणादरम्यान सरन्यायाधीशांनी हे मत व्यक्त केले. मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित केलेले सरन्यायाधीश या कार्यक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत, त्यामुळे त्यांनी या पुस्तक प्रकाशनाबद्दल आपल्या शुभेच्छा देणारी एक व्हीडीओ क्लिप पाठवली आणि ब्रिक्स देशांच्या न्यायाधीशांच्या आगामी बैठकीमुळे उपस्थित राहू न शकल्याबद्दल खेद व्यक्त केला.




**समान हक्क-** सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केल्यानुसार, महागड्या न्यायालयीन प्रक्रिया किंवा हुशार वकील केवळ काही मोजक्या लोकांना परवडतात. याचा अर्थ असा नाही की संविधान केवळ त्यांच्यासाठीच आहे. अतिशय गरीब किंवा दुर्गम भागात राहणा-या प्रत्येक नागरिकाला संविधानाचे संरक्षण आणि न्याय मिळण्याचा समान अधिकार आहे.

**कायद्यासमोर समानता-** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ नुसार, प्रत्येक नागरिकाला कायद्यासमोर समान दर्जा आणि समान संरक्षण देण्यात आले आहे. आम्ही भारतीय लोक: संविधानाची उद्देशिका आम्ही भारतीय लोक या शब्दांनी सुरू होते. हे दर्शवते की संविधानाची अंतिम सत्ता ही देशातील सर्वसामान्य जनतेच्या हातात आहे, कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या नाही.

## मतदार यादीतील नावे वगळल्यावर दुरूस्तीसाठी सहा दिवसांची मुदत

**मुंबई :** महाराष्ट्रात होत असलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीत (एसआयआर) पारदर्शकता आणण्याकरिता वगळल्या गेलेल्या मतदारांच्या याद्या राजकीय पक्षांनाही देण्यात येतील. तसेच त्या अंतिम करण्यापूर्वी संकेतस्थळावर जाहीर केल्या जाणार असून, वगळल्या गेलेल्या मतदारांना पुरावे सादर करण्याकरिता सहा दिवसांची मुदत दिली जाईल, अशी ग्वाही राज्याचे निवडणूक अधिकारी



चोकलिंगम यांनी पत्रकार परिषदेत दिली. देशभर राबविण्यात येणा-या एसआयआरच्या तिस-या टप्प्यात महाराष्ट्रातील ९ कोटी ८६ लाख मतदारांची फेरतपासणी केली जाणार आहे. जनगणनेअंर्तगत सुरू असलेली घरगणना मोहीम संपल्यानंतर ३० जूनपासून घरोघरी मतदार गणनेच्या अर्जांचे वाटप करत (पान २ वर)






# विधान परिषदेच्या जागावाटपावरून महायुतीत पेच: शिवसेनेचा 7 जागांवर ठाम दावा

## भाजपकडून केवळ 3 ते 4 जागा सोडण्याची तयारी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी लागलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये जागावाटपावरून मोठा पेच निर्माण झाल्याचं चित्र समोर येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने या निवडणुकीत ७ जागांवर आपला ठाम दावा केला आहे. शिवसेनेने भाजपसमोर आधीच्या ५ आणि नव्याने ताकद वाढलेल्या २ अशा एकूण ७ जागांचा अधिकृत प्रस्ताव ठेवला होता अशी माहिती समोर येत आहे. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप कडून शिवसेनेच्या या प्रस्तावाला फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. भाजपने शिवसेनाला केवळ ३ ते ४ जागा देण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे आता शिवसेनेने ७ जागांवर ठाम राहण्याचा निर्णय घेत भाजपची कोंडी केली आहे.

**आमची ताकद वाढली, ७ जागा मिळाल्याच पाहिजेत-** या सर्व राजकीय घडामोडींवर शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेउन पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे. सरनाईक म्हणाले, 'विधानपरिषदेसाठी कोणाला उमेदवारी द्यायची, याचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील. यापूर्वी धुळे, कोकण या भागांत आमचे ५ आमदार होते. आता पक्षाची ताकद वाढलेली असल्यामुळेच आम्ही ७ जागांची मागणी केली आहे. यावर महायुतीचे प्रमुख नेते एकत्र बसून अंतिम निर्णय घेतील.'

**'आता माघार नाही...' शिवसेनेच्या नेत्यांमध्ये सल-** शिवसेनेच्या अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाने आता कोणत्याही परिस्थितीत माघार न घेण्याचं ठरवलं आहे. लोकसभा, विधानसभा आणि आगामी महापालिका निवडणुकीच्या जागावाटपाच्या वेळी शिवसेनेने स्वताची ताकद जास्त असतानाही नेहमीच कमी जागा घेउन तडजोड केली. ही तडजोडीची सल आजही पक्षातील अनेक नेते व कार्यकर्त्यांच्या मनात कायम आहे. त्यामुळे आता विधान परिषदेच्या निवडणुकीत पुन्हा तोच प्रकार सहन केला जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका शिवसेनेने घेतल्याची माहिती आहे.



### महायुतीचा प्राथमिक फार्म्युला काय होता?

विधान परिषदेच्या जागांसाठी महायुतीमध्ये सुरु वातीला जो प्राथमिक फार्म्युला ठरत होता, त्यानुसार भाजप १२ जागा, शिवसेना ३ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार असल्याची चर्चा होती. महायुती म्हणून एकत्र लढण्यावर तिन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांचे एकमत झालं असलं, तरी काही पारंपरिक जागांची अदलाबदल केली जाणार असल्याचं कळत आहे. मात्र, शिवसेनेने थेट ७ जागांची मागणी केल्यामुळे आता नेमकं कोण माघार घेणार, याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे.

### कुठल्या जागेवर कोणत्या पक्षाचा दावा?

**राष्ट्रवादी काँग्रेस -** रायगड-रत्नागिरी -सिंधुदुर्ग, हिंगोली - परभणी

**शिवसेना** - ठाणे, नाशिक, यवतमाळ,

**भाजप -** नागपूर, वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर - जालना, सातारा - सांगली, पुणे, जळगाव, नांदेड, भंडारा - गोंदिया, अमरावती, लातूर -धाराशीव - बीड, सोलापूर

### निवडणूक कार्यक्रम जाहीर

अधिसूचना जारी : २५ मे
अर्ज भरण्याची शेवटची तारीख : १ जून
अर्जाची छाननी : २ जून
अर्ज माघारीची शेवटची तारीख : ४ जून
मतदान : १८ जून - स. ८ ते दु. ४.
मतमोजणी : २२ जून

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# उधारीच्या पैशावरून तरुणावर प्राणघातक हल्ला करणारे ताब्यात

## तपोवन परिसरातील घटना, मुख्य आरोपी फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-**उधारीचे पैसे मागितल्यामुळे झालेल्या वादात आदिल खानवर १४ मेच्या रात्री तपोवन गेट परिसरात प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. त्याच्या बयानाच्या आधारावर फ्रेजरपुरा पोलिसांनी अल्पवयीनसह तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. अनुज दत्तात्रेय सेवाने (वय २२, गजानन नगर ) व सय्यद सैफ सैय्यद साबिर (वय २२,जीशान नगर नं. २) असे अटक आरोपींची नावे आहे. तर मुख्य आरोपी ईशान पठाण व फैजान पठान (दोन्ही राहणार इंदला) फरार आहे. माहितीनुसार जखमी आदिल खानने आरोपी ईशान पठाण याला उसने पैसे दिले होते. ते पैसे त्याने परत मागितले. यामुळे आरोपी ईशान पठाण ने त्याला राजुर नाका जवळील सायबर कॅफे येथे बोलवले आणि पैसे देण्यापासून नकार दिला. यामुळे दोघांच्या मधात वाद झाला. वादात आदिल खानने त्याला म्हटले की जर पैसे नाही दिले तर तुझी दुचाकी घेऊन जाईल. असे म्हणून तो तिथून निघाला त्यानंतर ईशान पठाण ने त्याला पुन्हा फोन करून तपोवन गेट जवळ सोनू ज्यूस हात गाडीजवळ थांबायला लावले आणि आपले सात ते आठ मुले घेऊन तिथे पोहचला व त्याच्यावर चाकुने हल्ला केला. त्याच्या पोटात, पाठीत व कमरेवर चाकुने वार करून त्याला जखमी करून आरोपी तेथून पळाले. पोलिसांनी त्याला तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. जेथे त्याच्यावर उपचार सुरू आहे. त्याच्या बयानाच्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून परिसरात लागलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावरून आरोपींची ओळख पटवली आणि अनुज दत्तात्रय सेवाने (२२, गजानन नगर) व सय्यद सैफ सैय्यद साबीर (२२,जीशान नगर नं.२) यांना ताब्यात घेतले. आरोपी ईशान पठाण व फैजान पठाण अजूनही फरार आहे. त्यांचा शोध पोलीस घेत आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, निलेश गावंडे, उपनिरीक्षक राहुल महाजन, वैभव काळबांडे, सुभाष पाटील, रज्जाक शेकूवाले, हरीश चौधरी, शशिकांत गवई, सचिन बोकरकर, सागर चव्हाण,जयेश परिवाले, अखिल दळवी, रोशन वऱ्हाडे, प्रशांत वानखडे, जावेद पटेल यांनी केली.

# धामणगावमध्ये मालवाहु ट्रकला लागली आग
## नागरिकांच्या तत्परतेमुळे टळला मोठा अनर्थ

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-शहरातील गजबजलेल्या टिळक चौक परिसरात आज शुक्रवार २२ मे रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास एम एच २६/८३८८ क्रमांकाच्या मालवाहु ट्रकला अचानक आग लागल्याची घटना घडली. ट्रकमधून धूर व आगीच्या ज्वाळा बाहेर येताच परिसरात एकच खळबळ उडाली.भर चौकात घडलेल्या या घटनेची बातमी पसरताच परिसरातील नागरिकांनी तत्परता दाखवत आग विझविण्यासाठी धाव घेतली. नागरिकांनी मटके, पाण्याचे कॅन तसेच पाण्याच्या बाटल्यांच्या सहाय्याने आग नियंत्रणाचा प्रयत्न केला. काही नागरिकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मदत केली. नागरिकांच्या सतर्कतेमुळे आग मोठ्या प्रमाणात पसरण्या पूर्वीच नियंत्रणात आणण्यात यश आले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, या आगीत ट्रकचे प्रचंड नुकसान झाले आहे. दरम्यान, आग लागलेला ट्रक रस्त्याच्या मध्यभागी असल्याने टिळक चौक परिसरात काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी एकत्र येऊन ट्रकला धक्का मारत शहराबाहेरील दिशेला हलविण्यास मदत केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग लागण्याचे नेमके कारण काय हे अद्याप स्पष्ट झाले नाही.**



पान १ व १० वरून

## वाघाच्या हल्ल्यात 4 महिला

भंडा-याच्या जवाहरनगर येथील आयुध निर्माणीच्या परिसरात दिवसाच वाघाचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे. आयुध निर्मितीच्या मुख्य मार्गालगत हा वाघ आला. सध्या तापमान ४६ अंश सेल्सिअसच्या घरात पोहोचले असून मानवासह प्राण्यांचीही प्रचंड उकाड्यामुळे ससेहोलपट होत आहे. शरीराची होणारी लाहीलाही मिटविण्यासाठी हा वाघ पाण्याचा छोटासा स्रोत असलेल्या जागेवर बस्तान मांडून आराम करीत असल्याचा येथून जाणा-या एका नागरिकाने हा व्हीडीओ त्यांच्या मोबाईलमध्ये चित्रित केला असून तो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.आयुध निर्माणी परिसरासोबतचे पेवठा ते जवाहरनगर मार्ग आणि डीएससी पलटून टी-प?ईंट उजार (घोडदौड) कोंडी मार्गावरही अनेक नागरिकांना हा वाघ दिसला. हा परिसर नेहमीच वर्दळीचा असल्याने रस्त्यावरू न ये-जा करणा-या वाहनधारकांची वाघाला पाहून घाबरगुंडी उडाली. १५ दिवसांपूर्वी या परिसरात मध्यरात्री वाघ बघायला मिळाला होता. त्यानंतर आता दिवसाच वाघाचे दर्शन झाल्याने वन विभागाने या भागात गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. **मृतांची नावे** १) कविता दादाजी मोहुर्ले -४५ २) अनिता दादाजी मोहुर्ले -४६ ३) संगीता संतोष चौधरी -४० ४) सुनीता कौशिक मोहुर्ले - ३५

## झारखंडमध्ये एकाच वेळी

सुविधा पुरवल्या जातील, जेणेकरू न ते समाजाच्या मुख्य प्रवाहात परत येउ शकतील.

**१६ शस्त्रे आणि २८५७ गोळ्या सुपूर्द-** आत्मसमर्पणादरम्यान नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारू गोळाही जमा केला. एकूण १६ शस्त्रे आणि २८५७ गोळ्या माओवादी नक्षलवाद्यांनी सुपूर्द केल्या, तर जेजेएमपीच्या नक्षलवाद्यांनी एक इन्सास रायफल आणि १३० राउंड गोळ्या जमा केल्या. जप्त केलेल्या शस्त्रांमध्ये इंसास रायफल आणि मॅगझिनचाही समावेश आहे. पोलिस अधिका-यांच्या मते, ही जप्ती नक्षलवादी नेटवर्क कमकुवत करण्यात महत्त्वाची ठरेल. सुरक्षा यंत्रणांचे मत आहे की, अशा मोठ्या आत्मसमर्पणामुळे या भागात शांतता प्रस्थापित होण्यास बळ मिळेल.

## भौतिकशास्त्राचा पेपर फोडणा-या

सन २००२ पासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. गेली २४ वर्षे अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांचा अध्यापनातील अनुभव लक्षात घेउन नॅशनल टेस्टिंग एजन्सीने नीट परीक्षेसंदर्भातील काही गोपनीय कामकाजासाठी त्यांची नियुक्ती केली होती.

**पी. व्ही. कुलकर्णी-**या प्रकरणात काही दिवसांपूर्वी सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना लातूर येथून अटक केली आहे. लातूरमधील दयानंद ज्युनियर क?लेजचे रसायनशास्त्राचे ते निवृत्त प्राध्यापक आहेत. कुलकर्णी अनेक वर्षे नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या परीक्षा प्रक्रियेशी संलग्न होते. दरम्यान नीट पेपरफुटीप्रकरणी देशभरातील विविध ठिकाणी केलेल्या शोधमोहिमेत अनेक कागदपत्रं, लॅपटाप, बँक स्टेटमेंट आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. जप्त केलेल्या वस्तूंचे फारेन्सिक-डिजिटल विश्लेषण केले जात आहे, असे सीबीआयने एक्सप्रेसशी बोलताना सांगितले.

**आतापर्यंत ११ संशयितांना अटक-** दरम्यान, देशभर गाजत असलेल्या नीट पेपरफुटीच्या प्रकरणात आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरु ग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि आहिल्यानगरसह विविध शहरांमधून एकूण ११ संशयितांना अटक करण्यात आली आहे, असे सीबीआयने सांगितले.

## NEET पेपरफुटीचा पर्दाफाश;

राजस्थानचा या यादीत दुसरा क्रमांक लागतो. ज्या पालकांनी आणि मध्यस्थांनी हा पेपर कोट्यवधी रु पये मोजून खरेदी केला, त्यांनी तो पुढे इतर विद्यार्थ्यांनाही विकल्याचे समोर येत आहे. पेपरफुटीची व्याप्ती वाढताना आता आणखी बडे मासे गळाला लागत असून लातूरमधील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरु रे यांना सीबीआयने ताब्यात घेतले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि आरसीसी कोचिंग इन्स्टिट्यूटचा संचालक शिवराज मोटेगावकर याच्याकडून डॉ. शिरु रे यांनी आपल्या मुलासाठी लीक झालेली प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा संशय आहे. सीबीआयने त्यांना लातूरहून पुण्यात आणून त्यांची कसून चौकशी केली आहे. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शहरातही सीबीआयने मोठी कारवाई करत एका बहीण-भावाची कसून चौकशी केली असून, त्यांच्याकडून मोबाईल, सीम कार्ड आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. त्यांची आई शिक्षिका असून, त्यांचीही या प्रकरणात चौकशी सुरू आहे.या आंतरराज्यीय रॅकेटचे पाळेमुळे खणून काढण्यासाठी सीबीआय आता कठोर पावले उचलत आहे. या प्रकरणात नाशिकमधून सर्वात आधी अटक करण्यात आलेला संशयित शुभम खैरनार, पुण्यातील बाटनी शिक्षिका प्रा. मनीषा मांढरे आणि मनीषा वाघमारे या तिघांना समोरासमोर बसवून सीबीआय चौकशी करणार आहे. यामुळे हा पेपर नक्की कुठून आणि कोणाकोणाच्या माध्यमातून वितरित झाला, याचा संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट होणार आहे.

३ मे रोजी झालेली नीट परीक्षा पेपरफुटीमुळे पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. आता २१ जून २०२६ रोजी दुपारी २:०० ते सायंकाळी ५:१५ या वेळेत ही परीक्षा पुन्हा घेतली जाईल. विद्यार्थ्यांना १५ मे ते २१ मे २०२६ पर्यंत परीक्षा केंद्र बदलण्याची मुदत देण्यात आली होती. ज्यांनी केंद्र बदलले नाही, त्यांचे जुनेच केंद्र कायम राहील आणि २१ मे नंतर आलेल्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही, असे एनटीएने स्पष्ट केले आहे. या फेरपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. परीक्षेचे शहर, प्रवेशपत्र आणि इतर तपशील १४ जून २०२६ पर्यंत अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करू न दिले जातील. या संपूर्ण गैरव्यवहारामुळे देशभरातील तब्बल २२ लाखांहून अधिक प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले असून, सीबीआय आता या व्यवहारात एकूण किती कोटींची उलाढाल झाली, याचा शोध घेत आहे.

## मंत्र्यांचे दावे फोल,

अभावी प्रवास, पोट भरण्यासाठीची धावपळ ठप्प पडली तर डिझेल नसल्याने खरीप हंगामाच्या मशागतीची कामे रेंगाळली आहे. मात्र याकडे पाहवयास ना नेत्यांना ना अधिका-यांना वेळ आहे. सगळे आव्हानतच गुंग आहे.

**अखेर संयम सुटला**-या पार्श्वभूमीवर अखेर शुक्रवारी, मोताळा तालुक्यातील काही वाहन धारकांचा संयमाचा बांध सुटल्याचे दिसून आले. वाहन धारक आणि शेतक-यांनी आज दुपारी बुलढाणा- मोताळा मार्ग रोखला. पेट्रोल डिझेल मिळत नसल्याने शेतकरी प्रचंड संतप्त झाल्याचे पाहावंयास मिळाले.

**उत्स्फूर्त रास्ता रोको**-पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाईमुळे संतप्त झालेल्या शेतक-यांनी थेट रस्त्यावर उतरू न रास्ता रोको आंदोलन केले. दुपारी शेकडो शेतक-यांनी बुलढाणा-मलकापूर मार्ग रोखून धरला. पाहता पाहता परडा फाट्यावर उत्स्फूर्त तीव्र रास्तारोको आंदोलन सुरू झाले . यातून, मोताळ्यातील शेतक-यांचा तीव्र उद्रेक पाहायला मिळाला . पेट्रोल पंपांवर चकरा मारू नही डिझेल मिळत नसल्याने अखेर शेतक-यांच्या संयमाचा बांध सुटला आणि मोताळा तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले. दरम्यान, घटनास्थळावर पोलीस शेतक-यांची समजूत काढत राहिले मात्र स्वयं स्फूर्त रास्ता रोको करणारे नागरिक कुणाचंच ऐकायला तयार नाही असे चित्र परडा फाट्यावर निर्माण झाले.

## अभिजीत दीपकेचे इन्स्टाग्राम

केला होता. दीपके यांचा दावा खरा ठरला असून त्यांचेच इन्स्टाग्राम खाते हॅक करण्यात आले आहे. याशिवाय बॅक अप म्हणून काढलेलं कॉकरोच जनता पार्टीचं इन्स्टाग्राम खातं देखील हटवण्यात आलं आहे.

**अभिजीत दीपके यांना धमकी** -काकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी त्यांच्या एक्स प्लॅटफॉर्मवर त्यांना आलेल्या धमक्यासंदर्भातील व्हिडिओ आणि पोस्ट शेअर केल्या आहेत. काकरोच जनता पार्टीचं एक्स खातं देखील काल हटवण्यात आलं होतं. कायदेशीर विनंतीवरु न एक्स खातं भारतात ब्लाक करण्यात आल्याची माहिती देण्यात आली होती. अभिजीत दीपके यांनी त्यानंतर काकरोच इज बॅक या नावानं नवं खातं सुरु केलं आहे. नव्या खात्याच्या फालोअर्सची संख्या १ लाख ८७ हजारांवर पोहोचली आहे. काकरोच जनता पार्टीच्या जुन्या एक्स खात्यावरील फालोअर्सची संख्या २ लाख १ हजार इतकी होती. अभिजीत दीपके यांनी त्यांच्या एक्स खात्यावरु न त्यांना आलेल्या धमक्यांची माहिती दिली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर अभिजीत दीपके यांनी सुरु केलेल्या प्लॅटफॉर्मला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय कॉकरोच जनता पार्टीचे ९४ टक्के फालोअर्स भारतीय असून त्यांना पाकिस्तानी ठरवण्याची घाई का करताय असा सवाल देखील त्यांनी केला आहे.

## मतदार यादीतील नावे

ही प्रक्रिया सुरू केली जाईल. आतापर्यंत राज्यातील ७२ टक्के मतदारांचीच प्राथमिक तपासणी (मॅपिंग) पूर्ण झाली आहे. थोडक्यात या मतदारांना नागरिकत्त्वाचे कुठलेही पुरावे सादर करण्याची गरज नाही. परंतु, उर्वरित २८ टक्के मतदारांच्या फेरतपासणीसोबतच राज्यातील स्थलांतरितांची, नवीन मतदारांची नावे समाविष्ट करण्याचे मोठे आव्हान निवडणुक आयोगासमोर आहे.

मतदारयाद्यांच्या सखोल विशेष फेरतपासणी मोहिम ही ही मतदारांची नावे वगळण्याकरिता नसून त्या सुधारणा करण्याकरिता आहे, . मृत्यू, स्थलांतर, गैरहजेरी आणि दुबार नावे वगळून मतदार यादी अधिक सुस्पष्ट करण्याकरिता एसआरए राबविली जात आहे. ही प्रक्रिया पारदर्शक करण्याकरिता वगळलेल्या मतदारांच्या नावांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करू न दिली जाईल. त्याबरोबरच आम्ही अधिकची खबरदारी घेत आहोत. वगळल्या जाणा-या नावांची यादी बूथ लेव्हल एजंट्सना (बीएलए) उपलब्ध करू न दिली जाईल. त्यावर संबंधित मतदारांचे आक्षेप असल्यास त्यांना कागदपत्रे सादर करण्याकरिता सहा दिवसांचा कालावधी देउ, असे चोकलिंगम यांनी सांगितले.११ पुरावे आवश्यक-पडताळणीदरम्यान घरे बंद आढळल्यास कर्मचारी किमान तीन भेटी देतील. ज्या प्रकरणांमध्ये मतदारांची नावे मागील नोंदींशी जुळत नाहीत, अशा प्रकरणांसाठी निवडणूक आयोगाने पुराव्यादाखल ११ कागदपत्रे ठरवून दिली आहेत. त्यापैकी कोणतेही एक कागदपत्र मतदार सादर करू शकतात. यात आधारचा समावेश नाही. आधार केवळ ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारला जाईल, नागरिकत्वाचा पुरावा म्हणून नाही, असे चोकलिंगम यांनी स्पष्ट केले.ज्या ७२ टक्के मतदारांची प्राथमिक तपासणी (मॅपिंग) झाली आहे, त्यांना सध्याचा तपशील असलेले, आधीच भरलेले गणना अर्ज मिळतील. या सोबतच २००२ ते २००४ दरम्यान झालेल्या शेवटच्या एसआयआरमधील नोंदींचे मॅपिंगही असेल. मतदार नाव, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघ यांसारख्या मूलभूत माहितीचा वापर करू न निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळाद्वारे स्वतंत्रपणे आपल्या तपशिलाची पडताळणी देखील करू शकतात.

तपासणीच्या वेळेस एखादी व्यक्ती घरात नसेल तर कुटुंबातील अन्य सदस्य या व्यक्तीच्या नावाने माहिती देउ शकतात. परंतु, संबंधित व्यक्तीच्या वतीने माहिती देणारे कुणी नसल्यास त्यांना ६ क्रमांकाचा स्वयंघोषणा अर्ज सादर करावा लागेल.एखाद्याचे नाव बदलले असल्यास त्या संबंधीचे पुरावे सादर करावे लागतील. उदाहरणार्थ एखाद्या महिलेचे लग्नानंतर नाव बदलले असल्यास त्यासाठी विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर, ज्या मतदारांची नावे जुळत नाहीत किंवा विसंगती आढळतात, त्यांना नोटिसा बजावण्यात येतील. अशा नावांच्या याद्या, वगळण्याच्या कारणांसह, स्थानिक स्वराज्य संस्था, तहसीलदार, जिल्हा निवडणूक कार्यालये आणि अधिकृत संकेतस्थळांवर प्रदर्शित केल्या जातील.

**भाजपचे सर्वाधिक प्रतिनिधी-**फेरतपाणीच्या प्रक्रियेत पारदर्शकता असावी याकरिता निवडणुक आयोगाने राजकीय पक्षांना प्रत्येक केंद्रावर आपले प्रतिनिधी (बीएलए) नियुक्त करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार १ लाख १३ हजार बीएलएंची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यात सर्वाधिक ५२ हजार ११५ प्रतिनिधी भाजपचे आहेत. त्या खालोखाल शिवसेनेचे (शिंदे गट) १७ हजार ८०० तर कांग्रेसचे १७ हजार ४२१ प्रतिनिधी आहेत. शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गट) १० हजार १४०, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) ६ हजार ४७२, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) ४हजार४६८, मनसेचे ३ हजार ८४८, बसपचे १९३, आपचे ५७ प्रतिनिधी असतील.

## राज्यसभा जागांसाठी निवडणूक

प्रत्येकी एका राज्यसभा जागेसाठी मतदान होईल.

राज्यसभा निवडणुका अशा प्रकारे होतात

राज्यसभा खासदारांची निवडणूक प्रक्रिया इतर निवडणुकांपेक्षा खूप वेगळी असते. राज्यसभा सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले जातात, म्हणजेच ते जनतेद्वारे नव्हे, तर आमदारांद्वारे निवडले जातात. राज्यसभा हे एक स्थायी सभागृह असल्यामुळे आणि दर दोन वर्षांनी एक-तृतीयांश सदस्य निवृत्त होत असल्यामुळे निवडणुका दर दोन वर्षांनी होतात. राज्यसभेच्या एकूण जागा २४५ आहेत. यापैकी २३३ जागा अप्रत्यक्षपणे निवडल्या जातात आणि १२ सदस्य राष्ट्रपतींद्वारे नामनिर्देशित केले जातात. राज्यसभा निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक मतांची संख्या पूर्वनिश्चित असते. मतांची संख्या एकूण आमदारांची संख्या आणि राज्यसभेच्या जागांच्या संख्येच्या आधारावर मोजली जाते. एका आमदाराच्या मताचे मूल्य १०० आहे.

**राज्यनिहाय २४ जागांची यादी**

आंध्र प्रदेश (४ जागा)

अयोध्या रामी रेड्डी अल्ला, परिमल नाथवानी, पिल्ली सुभाषचंद्र बोस, सना सतीश बाबू

**गुजरात (४ जागा)**

रामभाई हरजीभाई मोकारिया, अमीन नरहरी हिराभाई, गोहिल शक्तीसिंहजी हरिचंद्रसिंहजी, रमिला बेचरभाई बारा

**कर्नाटक (४ जागा)**

नारायण कोरगप्पा, इराणा काडादी, एचडी देवेगौडा, मल्लिकार्जुन खर्गे

**मध्य प्रदेश (३ जागा)**

जार्ज कुरियन, दिग्विजय सिंग, सुमेरसिंग सोळंकी

**राजस्थान (३ जागा)**

नीरज डांगी, राजेंद्र गेहलोत, रवनीत सिंग

**झारखंड (२ जागा)**

दीपक प्रकाश, शिबू सोरेन (आसन रिक्त)

**मणिपूर (१ जागा)**

महाराजा सनाजाओबा लेशेम्बा

**मेघालय (१ जागा)**

वानवेराय खारलुखी

**अरु णाचल प्रदेश (१ जागा)**

नाबाम रेबिया

**मिझोराम (१ जागा)**

के. वनलालवेना

## इंजेक्शनद्वारे दिले जाणारे

स्वरू पात पुरवले जाणारे सौंदर्यप्रसाधने, ड्रग्स अँड कॉस्मेटिक्स अॅक्ट १९४० अंतर्गत सौंदर्यप्रसाधनांच्या कायदेशीर व्याख्येत येत नाहीत. त्यामुळे कोणत्याही सौंदर्यप्रसाधनाला ग्राहक, व्यावसायिक आणि एस्थेटिक क्लिनिकला इंजेक्शनच्या स्वरू पात वापरण्याची परवानगी नाही.

**काय आहे नोटीसमध्ये?-** सौंदर्यप्रसाधने केवळ मानवी शरीरावर घासण्यासाठी, लावण्यासाठी, शिंपडण्यासाठी आणि फवारण्यासाठी वापरली जातात. सौंदर्यप्रसाधनांना अशा वस्तू म्हणून परिभाषित केले आहे, ज्यांचा उद्देश मानवी शरीर स्वच्छ करणे, सुंदर बनवणे किंवा रूप बदलणे हा असतो आणि त्यांना कास्मेटिक्स नियम २०२० अंतर्गत नियंत्रित केले जाते. नोटीसमध्ये पुढे असे म्हटले आहे की, व्यावसायिक किंवा सामान्य लोक सौंदर्यप्रसाधनांचा वापर उपचाराच्या उद्देशाने करू शकत नाहीत.

## पाण्याच्या शोधात व्याकुळ

नाराजी व्यक्त करण्यात आली. अखेर प्राणी मित्रांनीच पुढाकार घेत जखमी हरणाच्या पिल्लाला सुरक्षितरित्या ताब्यात घेऊन तिवसा येथील वन विभाग कार्यालयात दाखल केले.त्याचेवर पशुवैद्यकीय अधिकारी यांनी उपचार केले असून सध्या हरीण वनविभागाच्या देखरेखीत आहे.

सध्या वाढत्या उन्हामुळे जंगलातील जलस्त्रोत आटत चालले असून वन्यजीवांना पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीकडे येण्याची वेळ येत आहे. परिणामी अशा दुर्दैवी घटना वारंवार घडत असून वन्यजीवांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

स्थानिक नागरिकांनी वन विभागाने जखमी हरणाच्या पिल्लावर तातडीने उपचार करावेत तसेच भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

## नवजात बालिकेच्या मृत्यूप्रकरणात

बालिकेचा मृत्यू झाल्यानंतर आरोपींनी परिसरातील शेतशिवारात खड्डा खोदून मृतदेह पुरल्याची माहिती पुढे आली. ही बाब नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर बडनेरा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला. मात्र तपासानंतर धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सूरज महेंद्रसिंग गुजर (वय ४५) आणि एक महिला (वय ४०), दोघेही रा. सावता मैदान, जुनी वस्ती, बडनेरा यांनी पाच दिवसांच्या नवजात बालिकेला भर उन्हात उघड्यावर ठेवून तिच्या देखभाल व संगोपनात गंभीर निष्काळजीपणा केल्याचा आरोप आहे. अशक्त अवस्थेतील या बालिकेचा गुदमरून मृत्यू झाल्याचा प्राथमिक वैद्यकीय निष्कर्ष डॉ. रंजीत राठोड यांनी दिला आहे. त्यामुळे पोलीसांनी आता या प्रकरणात गुन्हा नोंदविला आहे.

## गोवंश तस्करीवर पोलिसांची

मदतीने या जनावरांना सुरक्षिततेसाठी दस्तुरनगर येथील गौरक्षण संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले. या प्रकरणात शेख रियाज शेख इलीयास (वय २५, रा. आझाद नगर) याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले आणि गुन्हे शाखेच्या पथकाने सहभाग घेतला.

## मध्यरात्री विद्युत पुरवठा

निष्काळजीपणा दाखवणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी देण्यात आलेले नंबर वर फोन करूनही जर कोणताही प्रतिसाद मिळत नसेल तर मग ते नंबर लोकांना दिलेच कसे असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई नाही झाली तर रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा बुधवारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत

व्यक्त केली जात आहे. अपघात इतका भीषण होता कि, स्कुटरचा पुढील भाग चेंदामेंदा झाला. रस्त्यावर रक्ताचे लोट वाहत होते. वाहनांच्या काचा फुटलेल्या होत्या. वाहतूक ठप्प होऊन बघ्यांची एकच गर्दी झाली होती. हिंगणघाट शहरास वेढून तीन राष्ट्रीय महामार्ग जातात . या मार्गावर काही ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. त्या खड्ड्याने अपघात होत असल्याच्या तक्रारी सतत होत आहेत. याकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे.

## वारंवार विद्युत पुरवठा खंडित

सांगितले कि, वारंवार ट्रिपिंग होऊन वीज पुरवठा चालू -बंद होण्याच्या प्रकारावर तात्काळ दुरुस्तीसाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्या. यासाठी ऊर्जा विभागाशी निगडित असलेल्या खाजगी यंत्रणांची मदत घेऊन वेळीच दुरुस्ती करून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना सुलभा खोडके यांनी दिल्या. नुकत्याच झालेल्या खरीप पूर्व आढावा बैठकीमध्ये सुद्धा वीज पुरवठ्याच्या

ट्रिपिंग संदर्भातील मुद्दा उपस्थित झाला असता , त्यासंदर्भात खाजगी संस्थांकडून तात्काळ दुरुस्तीची कामे करण्यासंदर्भात सुद्धा बैठकीत भर दिला असल्याचे आमदार महोदयांनी सांगितले.

शहरातील अनेक भागात निर्माण झालेल्या व्होल्टेज समस्या आणि ओव्हरलोडिंग संदर्भात अडथळे दूर करण्यासाठी महावितरण कडून नवीन ट्रान्सफार्मर लवकरच बसविली जाणार आहे. या कामांना अवधी लागणार आहे. त्यामुळे सद्या उन्हाळ्याचे दिवसात ट्रिपिंग मुळे वीज पुरवठा चालू -बंद होण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. याबाबत तात्काळ उपाययोजना संदर्भात ऊर्जा विभागाशी निगडित असलेल्या खाजगी यंत्रणांची मदत घेऊन वेळीच दुरुस्ती करून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना आ. सुलभा खोडके यांनी दिल्या.

**११ कोटींच्या विशेष निधीतुन नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यास सुरुवात-**

शहरातील अनेक भागात निर्माण झालेल्या व्होल्टेज समस्या आणि ओव्हरलोडिंग संदर्भात अडथळे दूर करण्यासाठी आ. सुलभा खोडके यांच्या ११ कोटींच्या विशेष निधी अंतर्गत शहरातील विविध ८३ ठिकाणी विद्युत डी.पी.ची क्षमता वाढ व नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याच्या कामांना महावितरण कडून सुरुवात झाली आहे. या कामांतर्गत विद्यमान ज्या ओव्हरलोडेड डीटीसीचे २०० केव्हीए वरून ३१५ केव्हीए पर्यंत विस्तारीकरण करण्यात येईल, जेणेकरून कमी व्होल्टेजच्या समस्या व वारंवार डीटीसी ओव्हरलोडिंगच्या समस्या तसेच व्होल्टेजमधील चढ-उताराच्या समस्या टाळता येतील. त्यामुळे सदर डीटीसीवरील ग्राहकांना विश्वसनीय आणि अखंड वीजपुरवठा प्रदान करणे सोयीचे होणार आहे. तसेच व्होल्टेजची समस्या आणि ओव्हरलोडिंग टाळण्यासाठी काही भागात डीटीसीचे १०० केव्हीए , २०० केव्हीए आणि ३१५ केव्हीए क्षमतेचे नवीन ट्रान्सफार्मर सुद्धा बसविण्याच्या कामांना वेग आला आहे.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक

प्रस्थापीत केले. त्यानंतर आता प्रशांतने मुलीला मेसेज करून पैसे परत मागितले. जर पैसे दिले नाही, तर तुझे फोटो व्हायरल करेन, अशी धमकी दिली. त्यामुळे पिडित मुलीने मंगरुळ दस्तगिर पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी प्रशांतविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

## नांदगाव येथे SFI-DYFI

कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा प्रक्रियेत कडक सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणीही करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित हा गंभीर प्रश्न असल्याने शासनाने तात्काळ पावले उचलावीत, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी DYFI जिल्हा सचिव कॉ.किशोर शिंदे, मोहसीन शेख, शहनशाह , राजगुरू शिंदे SFI राज्य समिती सदस्य विशाल शिंदे ,संकेत मते ,आदित्य शिंदे, साहिल साथी उपस्थित होते.

## ग्राम स्तरावरील महसूली

व प्राधान्याने पुरवण्याचे आदेश संबंधित जिल्हा प्रशासनाला दिले. खारगे यांनी आज अमरावती जिल्हा दौरा दरम्यान जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार कार्यालय, तलाठी कार्यालय, सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, भूमी अभिलेख आदी कार्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कामकाज, दस्तऐवज, ई-ऑफीस प्रणालीची तपासणी केली. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत खारगे यांनी अमरावती विभागाचा महसूल कामकाजांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. विभागीय आयुक्त नयना गुंडे, अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अपर आयुक्त संजय जाधव, सुरज वाघमारे, नगरविकास प्रशासनाच्या उपायुक्त माधुरी कडू प्रत्यक्षरित्या तसेच यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे आदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.

खारगे म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत महसूल विभागाच्या अधिसूचित सेवा नागरिकांना प्राधान्याने पुरविल्या जाणार याची दक्षता घ्यावी. जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रांना भेट देऊन नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा, दाखले विहित वेळेत दिले जातात किंवा कसे याबाबत तपासणी करावी. भुसंपादन कायदा अंतर्गत सार्वजनिक प्रकल्पांसाठी जमीन संपादित करताना जमीन मालकांना योग्य मोबदला आणि त्यांचे पुनर्वसन योग्यरितीने झाल्याचे खातरजमा करावी. तसेच यातून प्राप्त होणाऱ्या महसूलातून जिल्ह्यातील महत्वाचे प्रकल्प, उपक्रम पूर्ण करावे. जिल्ह्याच्या महसूल गोळा करण्याच्या लक्षांक पूर्ततेसाठी जबाबदारीपूर्वक कार्य करावे, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, महसूल, भुमी अभिलेख व नोंदणी-मुद्रांक विभाग ही प्रशासनाची महत्वाची खाते असून जमीन व्यवहाराशी निगडीत सर्व कामे या विभागाव्दारे केली जातात. या विभागाव्दारे पुरविण्यात येणाऱ्या अधिसूचित सेवा सामान्य नागरिकांना सहज व सुलभरित्या उपलब्ध होतील, यादृष्टीने संबंधित विभागांनी एकत्र येवून कार्य करावे. संबंधित जिल्हाधिकारी यांनी संयुक्त तपासणी दौरा करुन राज्य शासनाच्या योजना, उपक्रम, मोहिम यशस्वीरित्या राबवाव्यात. जिल्ह्यात महाराजस्व समाधान शिबिरांचे उत्तमरित्या आयोजन करुन गरजूंना आवश्यक कागदपत्रे, दाखले, ७/१२ उतारा आदी उपलब्ध करुन द्यावेत. समाजातील गोर-गरीब नागरिकांच्या क्षेत्रीय स्तरावरील अडचणी व समस्या जाणून त्यांच्या सोयी-सुविधांसाठी जे-जे चांगले करता येईल, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन खारगे यांनी यावेळी केले.

यावेळी बैठकीत अपर आयुक्त जाधव यांनी अमरावती विभागाची संक्षिप्त माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून अपर मुख्य सचिवांना दिली. अमरावती विभगातील सिलींग जमीन, भूदान जमीन, कुळकायदाच्या जमीनी अधिकृतपणे भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतरीत करणे, देवस्थान इनाम जमीनी, आदिवासी जमीनी, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, वनक्षेत्राच्या महसूली अभिलेख, गाव नमुना, ७/१२ मधील भोगवटदार सदरी वनक्षेत्राच्या नोंदी, फेरफार निर्गती, अॅग्रीस्टॅक नोंदणी, शासकीय जमीनीवरील निवासी प्रयोजनासाठीची अतिक्रमणे नियमानुकूल करणे, वाळू धोरण व वाळूघाट लिलाव, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, अर्धन्यायीक, विभागीय चौकशी प्रकरणे, पाणी टंचाई कृती आराखडा, आपले सरकार पोर्टल आदी महत्वाच्या विषयांबाबत अमरावती विभागाचा सविस्तर आढावा खारगे यांनी यावेळी घेतला.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २३ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# शिरला ग्रामपंचायतीत 'दीड कोटींचा घोटाळा' ?

## कागदोपत्री विकास, प्रत्यक्षात अंधार ; ग्रामस्थांचा संताप उफाळला

■ प्रतिनिधी | पातूर ■

*'कामे दिसत नाहीत, पण खर्च कोट्यवधींचा दाखवला जातोयष्ठ मग पैसा गेला कुठे?' असा थेट सवाल उपस्थित करत पातूर तालुक्यातील शिरला ग्रामपंचायतीविरोधात ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. सन २०२३ ते २०२४ या कालावधीत ग्रामपंचायतीत तब्बल दीड कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.*

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, तत्कालीन ग्रामसेवक, सचिव आणि सरपंच यांच्या कार्यकाळात १५ वा वित्त आयोग, सामान्य निधी, दलित वस्ती सुधार योजना तसेच वृक्षलागवड योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला. विशेष म्हणजे या खर्चासंदर्भातील ऑनलाईन नोंदी, कामांची माहिती किंवा अधिकृत कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध नसल्याने संशय अधिकच बळावला आहे.

### भ्रष्टाचार झाकणाऱ्यांवरही कारवाई करा

'फक्त पैसे खाणाऱ्यांवर नव्हे, तर त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे,' अशी तीव्र भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. पंचायत स्तरावरील निधीचा हिशेब सार्वजनिक करण्याची मागणीही आता जोर धरत आहे. दरम्यान, या गंभीर आरोपांनंतर पंचायत समिती आणि जिल्हा प्रशासन नेमकी काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. चौकशी होणार की प्रकरण फाईलमध्येच दडपले जाणार, हा प्रश्न आता नागरिक उघडपणे विचारू लागले आहेत.

### 'लाईटच नाहीत, मग दुरुस्ती कशाची?'

शिरला ग्रामपंचायत अंतर्गत शिरला गावासह पातूर बागायत, पातूर पट्टी आणि अमराई ही महसुली गावे येतात. मात्र ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, मूळ शिरला गाव वगळता उर्वरित तीन गावांमध्ये सार्वजनिक विद्युत व्यवस्था अस्तित्वातच नाही. तरीदेखील सार्वजनिक लाईट दुरुस्ती व देखभालीसाठी तब्बल १ लाख १२ हजार रुपयांचा खर्च दाखविण्यात आल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. गावात अवघे ४० ते ५० सार्वजनिक विद्युत खांब असताना एवढा खर्च नेमका कोणत्या कामासाठी करण्यात आला, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. 'गाव अंधारात आणि बिल मात्र उजेडाचे,' अशी उपरोधिक प्रतिक्रिया काही ग्रामस्थांनी दिली.

### महिलांच्या प्रशिक्षणाच्या नावाखाली लाखोंची उधळपट्टी?

महिला सक्षमीकरण आणि प्रशिक्षण उपक्रमासाठी १ लाख ७६ हजार रुपयांचा खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात कोणतेही प्रशिक्षण शिबिर, कार्यशाळा, जनजागृती कार्यक्रम किंवा महिला विकास उपक्रम झाले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

'गावात कधी कार्यक्रमच झाला नाही. महिलांना कोणते प्रशिक्षण दिले, कुठे दिले आणि कोणाला दिले?' असे प्रश्न आता उपस्थित होऊ लागले आहेत. केवळ कागदोपत्री उपक्रम दाखवून निधी लाटल्याची चर्चा गावपातळीवर रंगली आहे.

### विकासकामांमध्येही अनियमिततेचा आरोप

ग्रामपंचायतीअंतर्गत विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली नसतानाही खर्च दाखविण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. अनेक कामांच्या ठिकाणी फलक नाहीत, मोजमाप नोंदी नाहीत आणि कामांची गुणवत्ता संशयास्पद असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. ग्रामस्थांनी या संपूर्ण प्रकरणात संबंधित अधिकारी, पदाधिकारी आणि कंत्राटदारांची आर्थिक चौकशी करण्याची मागणी केली असून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी पुढे आली आहे.

# घनकचरा व्यवस्थापन नियमांची ग्रामीण भागात कडक अंमलबजावणी

- नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाईचे संकेत
- ग्रामपंचायतींना सीईओ अनिता मेश्राम यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाला अधिक प्रभावी स्वरूप देण्यासाठी केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत पेयजल व स्वच्छता विभागाने लागू केलेल्या घनकचरा व्यवस्थापन अधिनियम-२०२६ ची अंमलबजावणी आता जिल्ह्यात गतीने सुरू झाली आहे. या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मिना यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात आला असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्था व आस्थापनांवर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी अकोला जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. १ एप्रिल २०२६ पासून हे नियम लागू झाले असून ग्रामीण भागात कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ५ मे २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य शासन, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आणि ग्रामपंचायतींना विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात घनकचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांची माहिती संकलित करून त्यांची नोंदणी करावी लागणार आहे. तसेच पर्यटनस्थळे आणि यात्रास्थळांसाठी स्वतंत्र स्वच्छता यंत्रणा उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### विशेष कक्षाची स्थापना

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम-२०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामध्ये सहआयुक्त नगरविकास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, अकोला महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, पंचायत व पाणी-स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. हा विशेष कक्ष ग्रामीण आणि शहरी भागातील घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित विविध यंत्रणांवर लक्ष ठेवून नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणार आहे.

### ग्रामपंचायतींसमोर मोठी जबाबदारी

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांची ओळख व नोंदणी करणे, प्रत्येक ग्रामपंचायतीत तांत्रिक सहाय्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करणे तसेच अधिनियमांतर्गत सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांचे पालन करणे आवश्यक राहणार आहे. यासोबतच ग्रामविकास आराखड्यात घनकचरा व्यवस्थापनाचा समावेश करणे बंधनकारक करण्यात आले असून घराघरांतून कचरा संकलन आणि ओला-सुका कचरा वर्गीकरणाची अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम तसेच पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद मोरे यांनी ग्रामपंचायतींनी नियमांचे काटेकोर पालन करून स्वच्छ व पर्यावरणपूरक गाव उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# व्याळा ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार उघड

## दिवसरात्र सुरू पथदिव्यांमुळे वीजेची उधळपट्टी

■ प्रतिनिधी | अकोला ■




म्बाळापूर तालुक्यातील व्याळा गावात गेल्या अनेक महिन्यांपासून दिवसभर पथदिवे सुरू राहत असल्याने ग्रामपंचायतीच्या भोंगळ कारभारावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. हजारो युनिट वीज वाया जात असताना ग्रामसेवक व सरपंच मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप समाज क्रांती आघाडीचे जिल्हाध्यक्ष शिलवंत केशवराव वानखडे यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

वानखडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, व्याळा गावातील अनेक विद्युत खांबांवरील पथदिवे तब्बल २४ तास सुरू राहत असून यामुळे मोठ्या प्रमाणात वीजेची नासाडी होत आहे. ग्रामपंचायतीच्या निधीतून वीज बिल भरले जात असले तरी त्याचा आर्थिक बोजा अखेर नागरिकांवरच पडत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात तक्रार करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात गेले असता कार्यालयाला कुलूप असल्याचे आढळल्याचा आरोपही त्यांनी केला. ग्रामपंचायतीच्या नियमानुसार वीज बचतीची जबाबदारी ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर असताना त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे सार्वजनिक पैशांची उधळपट्टी होत असल्याचे वानखडे यांनी म्हटले आहे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करून संबंधित ग्रामसेवक व सरपंचावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे करण्यात आली आहे. गावातील पथदिव्यांच्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विश्वनाथ बोरकर यांचे निधन



**वाशीम :** स्थानिक नवीन आययुडीपी मधील रहिवाशी माजी गट शिक्षणाधिकारी विश्वनाथ यशवंत बोरकर ( रिठदकर ) यांचे आज २२ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले . मृत्युसमयी त्यांचे वय ७६ वर्षाचे होते . विश्वनाथ बोरकर यांनी बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यात सेवा दिली . त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुले , मुलगी , नातू असा परिवार आहे . स्थानिक पद्मतिर्थ मोक्षधाम येथे त्यांच्यावर आज दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी समाज बांधवासह शैक्षणिक , सांस्कृतिक , धार्मिक , राजकीय , वैद्यकीय , क्रिडा , पत्रकारिता क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

# ३ लाखांचा धनादेश न वटल्याप्रकरणी एक महिन्याचा कारावास

■ प्रतिनिधी | वाशिम ■



मैत्रीपूर्ण संबंधातून घेतलेले ३ लाख रुपयांचे हातउसनवार कर्ज परत न केल्यामुळे झालेल्या वादाप्रकरणी वाशिम येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी डी. यू. राजपूत यांनी आरोपीला दोषी ठरवत एक महिना साधा कारावास आणि ३ लाख १० हजार रुपयांची भरपाई देण्याचा महत्त्वपूर्ण निकाल २१ मे २०२६ रोजी दिला आहे.

फिर्यादी रत्नाकर नारायण गंगावणे (रा. देपूळ) आणि आरोपी श्रीकृष्ण महादू लांभाडे (रा. वारा जहांगीर) यांची ओळख होती. मे २०१८ मध्ये आरोपीला शेतीच्या कामासाठी ३ लाख रुपयांची गरज होती. मैत्रीपूर्ण नात्याचा विचार करून फिर्यादीने आरोपीला ३ लाख रुपये रोख हातउसनवार दिले होते. आरोपीने दोन महिन्यांत रक्कम परत करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र मुदत संपूनही पैसे परत न केल्याने फिर्यादीने तगादा लावला. यानंतर आरोपीने ३० जुलै २०१८ रोजी ३ लाख रुपयांचा धनादेश फिर्यादीला दिला. परंतु, हा धनादेश बँकेत सादर केला असता 'फंड्स इनसफिशिएंट' (पुरेसे पैसे नसल्याने) कारणास्तव परत आला. वारंवार मागणी करूनही पैसे न मिळाल्याने फिर्यादीने कायदेशीर नोटीस पाठवली. याकडेही आरोपीने दुर्लक्ष केल्यामुळे फिर्यादीने न्यायालयात तक्रार दाखल केली. या खटल्यात फिर्यादीतर्फे ॲड. अमोल उर्फ गुड्डू सोमाणी यांनी काम पाहिले. सुनावणीदरम्यान आरोपीने हा चेक 'नॉन-सीटीएस' असल्याचे आणि सुरक्षेसाठी दिल्याचे बचावात्मक दावे केले.

# रिसोड पोलिसांची तत्पर कारवाई : ६ लाख १२ हजारांचा चोरीचा मुद्देमाल जप्त



■ प्रतिनिधी | रिसोड ■

बसस्थानक परिसरातून चोरी गेलेला तब्बल ६ लाख १२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल अवघ्या काही तासांत शोधून काढत रिसोड पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या कारवाईमुळे पीडित वृद्ध महिलेला मोठा दिलासा मिळाला असून पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

फिर्यादी सुनंदा बळीराम धांडे (वय ५९, रा. कमलानगर, ता. शहापूर, जि. ठाणे) या रिसोड येथे नातेवाईक प्रकाश पंढरी मोरे यांच्याकडे आल्या होत्या. दि. २० मे रोजी त्या परत गावी जाण्यासाठी दुपारी १२ वाजताच्या सुमारास रिसोड बसस्थानकावर आल्या असता त्यांच्या पर्समधील लहान पर्स चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. त्या पर्समध्ये सोन्याची पोत, दोन कर्णफुले, एक अंगठी, मोबाईल फोन व रोख २ हजार ८०० रुपये असा एकूण ६ लाख १२ हजार ८०० रुपयांचा ऐवज होता.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी तात्काळ पथक तयार करून बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. तसेच सायबर शाखेच्या मदतीने तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू करण्यात आला.

तपासादरम्यान शेनगाव (जि. हिंगोली) परिसरात संशयित खाजगी प्रवासी वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यावेळी एका महिलेकडे संशय आल्याने चौकशी करण्यात आली. संबंधित महिलेने आपले नाव वत्सला दगडू तुरुकमाने (वय ६०, रा. काहकर, ता. शेनगाव, जि. हिंगोली) असे सांगितले. महिलेमार्फत तपासणी केली असता तिच्याकडून चोरी गेलेली पर्स, सोन्याचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

## जाहिरनामा

या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोंकाना कळविण्यात येते की, अर्जदार यमुनाबाई वि सखाराम इंगोले, विजय सखाराम इंगोले, प्रकाश मोतीराम इंगोले, भिमराव मोतीराम इंगोले, देवानंद गजानन इंगोले, शोभाबाई वि गजानन इंगोले, सर्व रा. मोहगव्हाण यांनी विनंती केल्यानुसार मौजे मोहगव्हाण येथील जमीन गट क्रं. ३६ सर्वे क्रं १३ क्षेत्र ७.७४ हे आर या जमीनीचे ७/१२ वर मुळ भोगवटादार श्री चर्तुभुज गोवर्धन संस्थान मंगरुळपीर व्यवस्थापण पंच नारायण बालाजी ब्राम्हण व इतर ४ या नावाची नोंद असुन ७/१२ च्या इतर अधिकारात मोतीराम नारायण मराठे यांने चर्तुभुज संस्थान तर्फे वहीवाटदार बन्सीलाल श्री किसन याज नावे कुळाची नोंद असुन सदर जमिनीवर कुळ लागु करणे बाबत अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप/ हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून ( कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून ) ०७ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती/ आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ - मंगरुळपीर
दिनांक - २०/०५/२०२६


शिक्का

-स्वा-
तहसिलदार मंगरुळपीर

# 'लॅन्ड जिहाद' विरोधात कडक कायद्याची मागणी

## जिल्हाधिकाऱ्यांना शिवसेनेचे निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■



राज्यात कथित 'लॅन्ड जिहाद' वाढत असून संघटित पद्धतीने जमीन खरेदी-विक्री, अतिक्रमण आणि लोकसंख्यात्मक बदल घडवून आणण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या शिंदे गटाने महाराष्ट्रात स्वतंत्र 'जमीन संरक्षण व अवैध हस्तांतरण प्रतिबंधक कायदा' लागू करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात शहरप्रमुख रमेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.

गुजरातमधील 'Land Grabbing (Prohibition) Act' आणि 'DistuRed Areas Act'चा दाखला देत महाराष्ट्रातही संवेदनशील भागांतील जमीन व्यवहारांवर नियंत्रण आणण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. धार्मिक किंवा संघटित हेतूने जमिनींची खरेदी करून स्थानिक सामाजिक संतुलन बिघडविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला.

देवस्थान, मंदिर ट्रस्ट, गायरान आणि सार्वजनिक जमिनींवरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, भूमाफियांवर कठोर फौजदारी कारवाई करावी तसेच अवैध जमीन बळकावणे हा अजामीनपात्र गुन्हा घोषित करावा, अशा मागण्याही निवेदनात करण्यात आल्या आहेत.

दोन भिन्न धर्मीय व्यक्तींमधील मोठ्या जमीन व्यवहारांसाठी जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाची पूर्वपरवानगी बंधनकारक करण्याची मागणीही शिवसेनेकडून पुढे करण्यात आली. राज्यभरातील जमीन व्यवहारांचे विशेष ऑडिट करून 'Land Protection Cell' स्थापन करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. अकोला आणि राज्यातील अनेक भागांत मोठ्या प्रमाणावर 'लॅन्ड जिहाद' सुरू असून काही घटक जाणीवपूर्वक जमिनी विकत घेऊन त्या केवळ विशिष्ट समाजालाच देत आहेत. भविष्यात ही स्थिती गंभीर सामाजिक आणि आर्थिक संकट निर्माण करू शकते, असा दावा शहरप्रमुख रमेश गायकवाड यांनी केला.दरम्यान, जिल्हाधिकारी यांनी निवेदनातील मागण्यांची गंभीर दखल घेण्याचे आश्वासन दिल्याचे गायकवाड यांनी सांगितले. यावेळी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अतुल एडणे, उपजिल्हाप्रमुख अमोल ढोकने, उपशहर प्रमुख शिवम पुतोहित, विशाल धोटे, रितेश दुबे, उमेश लांडगे, देव मिश्रा यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. तसेच संपर्क प्रमुख तथा माजी आमदार राजन साळवी आणि उपनेते गोपीकिशन बाजोरिया यांच्या सूचनेनुसार हे निवेदन देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# अवैध दारू विक्रेत्यांवर अकोला पोलिसांचा धडक प्रहार

## एकाच दिवसात ७० कारवाया; दहा लाखांचा मुद्देमाल नष्ट

**अकोला :** अवैध गावठी व हातभट्टी दारू व्यवसायाविरोधात अकोला पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत जिल्हाभर एकदिवसीय विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या मोहिमेत महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत तब्बल ७० केसेस दाखल करण्यात आल्या असून सुमारे १० लाख ६१ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम २१ मे रोजी पहाटे १२ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत राबविण्यात आली. जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांत विशेष पथके तयार करून अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर एकाचवेळी धाडी टाकण्यात आल्या. कारवाईदरम्यान देशी दारू तसेच गावठी हातभट्टी दारूचे मोठे साठे उध्वस्त करण्यात आले. पोलिसांनी जिल्ह्यातील विविध भागांत ७० ठिकाणी छापे टाकून अवैध धंदे करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली. अवैध गावठी दारूमुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत असून अनेकदा कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर अकोला पोलिसांनी कठोर भूमिका घेत अवैध धंद्यांवर अंकुश आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. दरम्यान, अवैध दारू विक्री अथवा निर्मितीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा किंवा तात्काळ ११२ क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे.

# वाशिममध्ये हेल्थ सेक्टर रोजगार मेळावा उत्साहात

## ७ उमेदवारांची अंतिम तर २७ जणांची प्राथमिक निवड

- ५० रिक्त पदांसाठी १०७ उमेदवारांची उपस्थिती
- गायकवाड हॉस्पिटलमध्ये ७ जणांना मिळाला थेट रोजगार

■ प्रतिनिधी | वाशिम ■



आरोग्य क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (वाशिम), 'माँ गंगा स्कूल ऑफ नर्सिंग' आणि 'सन्मती नर्सिंग कॉलेज' यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. २० मे रोजी वाशिम येथे 'हेल्थ सेक्टर' अंतर्गत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात उमेदवारांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आरोग्यक्षेत्रातील एकूण ५० रिक्त पदांसाठी आयोजित या मेळाव्यात १०७ उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखती दिल्या.

### २७ उमेदवारांची प्राथमिक निवड; ७ जणांना नियुक्तीपत्र

या रोजगार मेळाव्यामध्ये जिल्ह्यातील नामांकित ३ मोठे एम्प्लॉयर्स (नियोक्ता) सहभागी झाले होते. त्यांच्या वतीने ५ प्रतिनिधींनी उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतल्या. अत्यंत पारदर्शक पद्धतीने झालेल्या या प्रक्रियेत २७ उमेदवारांची प्राथमिक फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. वाशिम येथील नामांकित 'गायकवाड हॉस्पिटल' तर्फे ७ उमेदवारांची सर्व निकष पूर्ण केल्याबद्दल थेट 'अंतिम निवड' करून त्यांना रोजगाराची संधी बहाल करण्यात आली.

### तरुणांनी रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा: प्रवीण खंडारे

या मेळाव्याच्या अनुषंगाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे मा. सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे यांनी उमेदवारांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, सध्याच्या काळात आरोग्य (हेल्थ) सेक्टरमध्ये कुशल मनुष्यबळाची मोठी गरज आहे. शासकीय यंत्रणा आणि खाजगी संस्था यांच्या वतीने युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळवून देण्यासाठी हे प्रयत्न केले जात आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७५ ■ शनिवार, २३ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### वर्ध्यात मृत्यूचा ब्लॅक फ्रायडे

# जिल्ह्यात तीन भीषण अपघातांत चार ठार, आठ जखमी

## हिंगणघाट, पुलगाव आणि पवनार परिसर हादरला; आठ जण जखमी

**वर्धा । हिंगणघाट । पुलगाव :** जिल्ह्यात शुक्रवारी घडलेल्या तीन भीषण अपघातांनी नागरिकांना हादरवून सोडले. हिंगणघाट, पुलगाव आणि पवनार परिसरात झालेल्या अपघातांत चार जणांचा मृत्यू झाला असून आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. विशेष म्हणजे हिंगणघाट तालुक्यातील जांगोणा येथे अधिकमासानिमित्त सुरू असलेल्या धार्मिक कार्यक्रमावरच काळाने घाला घालत दाम्पत्यासह सहा वर्षीय मुलीचा बळी घेतल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



पवनार



हिंगणघाट



पुलगाव

समुद्रपूर तालुक्यातील कुर्ला-उमरी येथील गजानन मधुकर वानखेडे हे पत्नी पल्लवी आणि जुळ्या मुली मोनाली व आरोही यांना घेऊन जांगोणा येथे सासरे राजू पंजाब काकडे यांच्या घरी अधिकमासाच्या सामूहिक कार्यक्रमासाठी आले होते. घरात धार्मिक कार्यक्रमाची लगबग सुरू असतानाच मोनाली या सहा वर्षीय मुलीची प्रकृती अचानक बिघडली. त्यामुळे गजानन (४५) यांनी पत्नी पल्लवी (३८) आणि मुलगी मोनाली (६) दुचाकीवर बसवून हिंगणघाट येथील रुग्णालयाकडे धाव घेतली.

मात्र, छोटी वणी परिसरातील तनवीर ढाब्याजवळ भरधाव टिप्परने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात गजानन वानखेडे, पत्नी पल्लवी आणि चिमुकली मोनाली यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर टिप्पर चालक वाहनासह फरार झाला. हिंगणघाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविले. या घटनेमुळे जांगोणा येथील धार्मिक कार्यक्रमावर शोककळा पसरली असून वानखेडे व काकडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दरम्यान, घटनास्थळी पोलिस कर्मचारी संजय त्रिपाठी यांनी मृतांच्या अंगावरील दागिने आणि रोकड सुरक्षितपणे ताब्यात घेऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर कुटुंबीयांकडे सुपूर्द केली. फरार टिप्पर नंतर पोलिसांनी ताब्यात घेतला असून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी घटना वर्धा-पुलगाव मार्गावरील कॅम्प परिसरात घडली. नागपूरकडून येणाऱ्या ट्रेलरने तवेरा वाहनाला दिलेल्या जोरदार धडकेत ट्रेलरचा कंटेनर थेट तवेरा वाहनावर कोसळला. या अपघातात आशा अनिलराव केचे (वय ६०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर चेतन काडे, बेबी जानोस्कर, मारोती जानोस्कर, वैशाली जानोस्कर आणि निर्मला जानोस्कर हे गंभीर जखमी झाले. सर्व जखमींवर वर्धा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुलगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.

तिसरा अपघात नागपूर-तुळजापूर महामार्गावर पवनारजवळ मामा-भांज्या दर्गाह परिसरात घडला. नागपूरहून नांदेडकडे जाणाऱ्या बसने रोलरला मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की रोलरचे दोन तुकडे झाले. या अपघातात रोलर चालक कन्नाके, बस चालक आणि पवनार येथील प्रीतम बोरकर (वय २६) गंभीर जखमी झाले. प्रीतम बोरकर हे दुचाकीने वर्धेकडे जात असताना या अपघातात सापडले. जखमींना तातडीने सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. एका दिवसात घडलेल्या या सलग अपघातांमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील भरधाव वाहनांवर नियंत्रणाची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

## अधिक मासाच्या स्नानाला काळाचा ग्रहण; वडिलांच्या डोळयांसमोर चिमुकलीचा नदीत अंत

**भिडी जनमाध्यम :** अधिक मासाचे पुण्य मिळवण्यासाठी वर्धा नदीत स्नानाला गेलेल्या एका कुटुंबावर काळानेच झडप घातली. वडिलांसोबत पवित्र स्नानासाठी आलेल्या दहा वर्षीय चिमुकलीचा नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने कोटेश्वर परिसर हळहळला. मुलगी माझ्यासोबतच नदीत पडली होती... असे सांगताना वडिलांचा फुटलेला आक्रोश उपस्थितांच्या काळजाला चिरून गेला.



ही दुर्दैवी घटना शुक्रवारी (२२ मे) श्री क्षेत्र कोटेश्वर येथे घडली. भक्ती तावडे (वय १०, रा. प्रियदर्शनी कॉलेज परसिर, वर्धा) असे मृत चिमुकलीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज तावडे हे अधिक मासानिमित्त मुलगी भक्तीला सोबत घेऊन कोटेश्वर येथे दर्शन व नदी स्नानासाठी आले होते. सध्या अधिक मासामुळे कोटेश्वर येथे भाविकांची मोठी गर्दी होत असून नदीकाठावरही मोठी वर्दळ आहे.

मनोज तावडे आणि चिमुकली भक्ती नदी पात्रातील सिमेंटच्या पायऱ्यांवर उतरले. मात्र पाण्यात शेवाळ साचल्याने दोघांचाही अचानक तोल गेला आणि ते नदीच्या खोल पाण्यात पडले. काही क्षणांतच आनंदाचे वातावरण किंकाळ्यांनी भरून गेले. वाचवा... वाचवा... असा आक्रोश सुरू झाला.

नदीत कुणीतरी बुडत असल्याचे दिसताच परिसरातील नागरिकांनी जीवाची पर्वा न करता नदीत उड्या घेतल्या. नागरिकांच्या अथक प्रयत्नांनंतर मनोज तावडे यांना बाहेर काढण्यात आले. शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी घाबरलेल्या अवस्थेत 'माझी मुलगी... भक्ती कुठे आहे, असा टाहो फोडला. त्यानंतर नागरिकांनी पुन्हा नदी पात्रात शोध सुरू केला.

काही वेळाने भक्तीला पाण्याबाहेर काढण्यात आले. तिला तातडीने भिडी येथील रुग्णालयात आणण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. चिमुकलीच्या मृत्यूची बातमी कळताच परिसरात शोककळा पसरली.

दरम्यान, अधिक मासानिमित्त कोटेश्वर येथे मोठ्या प्रमाणात भाविक येत असताना नदी परिसरात कोणतीही ठोस सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नदीकाठावर ना सुरक्षारक्षक, ना इशारा फलक, ना जीव वाचविण्याची साधने... प्रशासन मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एका क्षणात हसते-खेळते कुटुंब उद्ध्वस्त करणाऱ्या या घटनेमुळे कोटेश्वर परिसर सुन्न झाला असून पुण्य मिळवायला आले आणि लेकरू गमावून परतावे लागले, अशी हळहळ सर्वत्र व्यक्त होत आहे.

## बालकाचे अपहरण : करवून घेतली टरबूज विक्री

### आरोपी अटकेत; देवळी पोलिसांची तत्पर कारवाई

**पुलगाव जनमाध्यम :** घरासमोर खेळत असलेल्या नऊ वर्षीय बालकाचे अपहरण करून त्याला पुलगाव येथे नेत टरबूज विक्रीचे काम करून घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी देवळी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याच्याविरुद्ध अपहरण व बालमजुरी प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भिडी येथील चंद्रशेखर नागपुरे यांचा नऊ वर्षीय भाचा १८ मे रोजी सकाळी घराबाहेर खेळत होता. मात्र काही वेळाने तो अचानक बेपत्ता झाल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला. गावासह परिसरात शोध घेऊनही मुलाचा ठावठिकाणा लागला नाही.

दरम्यान, चौकशीदरम्यान टरबूज विक्रेता अक्षय झोरे हा मुलाला सोबत घेऊन गेल्याची माहिती समोर आली. चंद्रशेखर नागपुरे यांनी झोरे याच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता तुझा भाचा माझ्याकडे आहे, उद्या परत आणतो, असे त्याने सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

यानंतर नागपुरे हे देवळी येथे आरोपीच्या घरी गेले असता त्यांचा भाचा तेथे आढळून आला. मुलाने नातेवाईकांना सांगितले की, त्याला जबरदस्तीने पुलगाव बाजारात नेऊन टरबूज विक्रीचे काम करून घेण्यात आले. मुलाला परत आणल्यानंतर त्याची प्रकृती खालावल्याने प्रथम भिडी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

प्रकरणाची माहिती मिळताच ठाणेदार संदीप कापडे यांच्या मार्गदर्शनाखाली देवळी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी अक्षय झोरे याला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## धूमस्टाईलला पोलिसांचा ब्रेक ; अल्पवयीनांच्या ३० दुचाकी जप्त

### कारंजा पोलिसांची धडक मोहीम; पालकांनाही बसला दंडाचा दणका

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** शहरातील रस्त्यांवर 'धूमस्टाईल' भरधाव दुचाकी चालवत स्वतःसह इतरांच्या जीवाशी खेळणाऱ्या अल्पवयीनांना कारंजा पोलिसांनी जबर दणका दिला आहे. मुख्य रस्ते, चौक आणि बाजारपेठ परिसरात धडक मोहीम राबवत पोलिसांनी तब्बल ३० दुचाकी ताब्यात घेतल्या. एवढ्यावरच न थांबता संबंधित अल्पवयीनांच्या पालकांनाही पोलिस ठाण्यात बोलावून प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

शहरात मागील काही दिवसांपासून अल्पवयीन मुलांकडून विनापरवाना आणि भरधाव वेगात दुचाकी चालविण्याचे प्रकार वाढले होते. काही जण 'स्टंटबाजी' करत रस्त्यांवर दहशत निर्माण करीत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पालक प्रतिष्ठेच्या नादात लेकरांच्या हातात वाहन देतात आणि निष्पापांच्या जीवाशी खेळ सुरू होतो, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर कारंजाचे ठाणेदार प्रल्हाद मदन यांनी विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला. २२ मे रोजी शहरातील मुख्य मार्ग, बाजारपेठ, सर्व्हिस रोड आणि गर्दीच्या भागांमध्ये पोलिसांनी अचानक नाकाबंदी करत तपासणी मोहीम सुरू केली. या कारवाईदरम्यान अल्पवयीन मुलांकडून चालविण्यात येणाऱ्या तब्बल ३० दुचाकी जप्त करण्यात आल्या.



पोलिसांनी सर्व दुचाकी थेट पोलिस ठाण्यात जमा केल्या. त्यानंतर संबंधित अल्पवयीनांच्या पालकांना पोलिस ठाण्यात पाचारण करण्यात आले. सुरुवातीला पोलिसांनी पालकांचे समुपदेशन करत अल्पवयीनांच्या हातात वाहने देण्याचे गंभीर परिणाम समजावून सांगितले. त्यानंतर प्रत्येक पालकाकडून ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. दंड भरल्यानंतर दुचाकी परत करण्यात आल्या.

ठाणेदार प्रल्हाद मदन यांनी स्पष्ट इशारा देताना सांगितले की, पालकांनी आपल्या अल्पवयीन पाल्यांच्या हट्टापायी किंवा प्रतिष्ठेसाठी त्यांच्या हातात वाहने देऊन त्यांच्यासह इतरांच्याही जीवाला धोका निर्माण करू नये. अल्पवयीन मुलांना वाहन चालवू देणे हा कायद्याने गुन्हा आहे. भविष्यात असा प्रकार आढळल्यास अधिक कठोर कारवाई केली जाईल. ही मोहीम ठाणेदार प्रल्हाद मदन, वाहतूक पोलिस पुरुषोत्तम कुंभरे आणि कोमल वानखेडे यांनी राबविली. शहरातील वाढत्या बेशिस्त वाहनचालकांना आळा घालण्यासाठी पोलिसांची ही मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## दलपतपूरात विवाहितेची आत्महत्या

### म्हात्रे कुटुंबावर शोककळा : पतीला शेतावर पाठवल्यानंतर टोकाचे पाऊल; कारण अस्पष्ट

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील दलपतपूर येथे शुक्रवारी (दि. २२ मे) घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला. सौ. रुपाली भास्कर म्हात्रे (वय ३८) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे म्हात्रे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रुपाली म्हात्रे यांनी सकाळी नेहमीप्रमाणे घरातील कामे आटोपली. पती शेतातील कामासाठी जाणार असल्याने त्यांनी त्यांच्यासाठी जेवणाचा डबा तयार करून दिला. त्यानंतर पती शेताकडे रवाना झाले. काही वेळाने मुलाने आईला दूरध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र वारंवार फोन करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने त्याने शेजाऱ्यांना माहिती दिली. शेजाऱ्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता रुपाली यांनी घरातील फाट्याला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. ही बाब समोर येताच कुटुंबीयांसह ग्रामस्थांना मोठा धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, घटनेची माहिती पोलीस पाटील यांनी ठाणेदार जोशी यांना दिली. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास आष्टी पोलीस करीत आहेत.

## गॅस गळतीने संसार भस्मसात

### धान्य, रोख रक्कम, संसारोपयोगी साहित्य जळून खाक

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील किन्ही (खर्डा) येथे गॅस गळतीमुळे लागलेल्या भीषण आगीत एका कुटुंबाचा संसार अक्षरशः राखरांगोळी झाला. शुक्रवारी (२२ मे) पहाटे सहाच्या सुमारास घडलेल्या या घटनेने गावात एकच खळबळ उडाली. सुदैवाने जीवितहानी टळली; मात्र घरातील धान्य, कपडे, रोख रक्कम आणि संसारोपयोगी साहित्य आगीत जळून खाक झाल्याने हिवरकर कुटुंब उघड्यावर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, किन्ही येथील आनंद हिवरकर यांच्या घरी सकाळी स्वयंपाक सुरू असताना अचानक गॅस सिलिंडरमधून गळती होऊन आग लागली. क्षणार्धात आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण घराला कवेत घेतले. घरातून धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा बाहेर पडताच परिसरात घबराट पसरली.



आनंद हिवरकर यांच्या कुटुंबीयांनी आरडाओरड केल्यानंतर गावकरी मदतीला धावले. नागरिकांनी जीवाची पर्वा न करता शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत घरातील धान्य, कपडे, पैसे, मौल्यवान वस्तू तसेच इतर संसारोपयोगी साहित्य पूर्णपणे जळून कोळसा झाले होते. या आगीत आनंद हिवरकर व खेमराज हिवरकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिस ठाण्यातील ज्योती राऊत, राहुल मानकर आणि वाघमारे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अचानक लागलेल्या आगीमुळे कुटुंबाचे मोठे हाल झाले असून राहण्यासाठीही संकट निर्माण झाले आहे.

दरम्यान, गावातील पोलिस पाटील चंद्रकांत धोटे, सरपंच प्रवीण जायदे, पंकज लिहितकर, सुनील वाघ आणि योगेश भेंडे यांनी शासनाकडे तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. एका क्षणात कुटुंबाचा संसार जळून खाक झाला. शासनाने तात्काळ मदतीचा हात द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या घटनेनंतर गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून गॅस सिलिंडर वापरताना अधिक सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात येत आहे.


### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर M1740367 वरील माझे ANANDKUMAR KANKARIYA असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील ANAND TRILOKCHAD KANKARIYA हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- चित्रकूट लेआऊट हिंगणघाट वर्धा ४४२३०१**



तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय महात्मा गांधी पुतळ्याजवळ, सिव्हिल लाईन, वर्धा

क्र. महसुल सहायक/गृह/कावि १५०/२०२६ दिनांक २०.०५.२०२६

वाचाः १. भारत सरकार विधी व न्यायविभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र २. जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ (२०२३ चा २०) च्या खंड १ ३. मा. जिल्हादंडाधिकारी ३. मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचे आदेश क्रमांक कक्ष-२ब/म. सहा/गृह / कावि-७५०/२०२४, दिनांक २४/०५/२०२४

### जाहिरनामा

अर्जदार अल्हास कृष्णराव सुरकार रा.तळेगांव (टा) यांनी अर्जामध्ये नामे कृष्ण उल्हास सुरकार यांचा जन्म कस्तुरबा हॉस्पीटल सेवाग्राम येथे झालेला नामे कृष्ण उल्हास सुरकार या नावाने जन्मा नोंद वर्धा येथे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नोंद घेण्याकरीता जन्म नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नूसार जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

अर्जदार यांचा बहीनीचा जन्म/मृत्यु दिनांक ०१.११.२००९ रोजी मौजा-तळेगांव टा येथे झाला आहे असे अर्जदाराने अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थि मी तालुका दंडाधिकारी, वर्धा उपरोक्त वाचा क्रमांक १ व २. नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत/मृत्युबाबत' नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनामा प्रसिध्दी पासून १५ दिवसांचे आंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. विवित मुदतीत आक्षेप/हरकतींचा पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन प्रस्तावित जन्म/मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात विचार केल्या जाणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**तहसिलदार वर्धा**


## एमडीचा काळाबाजार; 'नशेच्या धंद्यात' दाम्पत्याला बेड्या

**वर्धा जनमाध्यम :** शहरात तरुणाईला नशेच्या विळख्यात ओढणाऱ्या एमडी (मेफेड्रॉन) विक्रेत्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत सराईत गुन्हेगार दाम्पत्याला रंगेहात पकडले. मॉडेल हायस्कूल परिसरातील अशोकनगर तारफैल भागात सुरू असलेल्या या 'नशेच्या अड्ड्या'वर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात मेफेड्रॉनसह तब्बल १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. वाढत्या एमडीच्या तस्करीमुळे वर्ध्यातील तरुणाई उद्ध्वस्त होत असताना पोलिसांनी उचललेले हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.



गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २१ मे रोजी वर्धा शहरातील मॉडेल हायस्कूलजवळील अशोकनगर तारफैल परिसरात छापा टाकला. यावेळी शेख रहिम शेख रशीद (वय ४२) आणि त्याची पत्नी शहाणा जाफीर शेख (वय ३६) हे दोघे संगनमताने एमडीची विक्री करताना पोलिसांच्या जाळ्यात अडकले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत चौकशी केली असता त्यांना एमडीचा पुरवठा वसीम अहमद खान पठाण याच्याकडून होत असल्याची माहिती पुढे आली. त्यानंतर पोलिसांनी ४.५० ग्रॅम मेफेड्रॉन जप्त केले. या कारवाईत एकूण १८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून तिन्ही आरोपींविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, शहरातील शैक्षणिक परिसराच्या जवळच नशेचा हा काळाबाजार सुरू असल्याचे उघड झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

## कार्यकर्ते नाराज, नेते आक्रमक; वर्धा कॉंग्रेसमध्ये राजकीय भूकंपाचे संकेत

### कॉंग्रेसमध्ये 'सृजन' नव्हे तर 'विसर्जन'?

**वर्धा जनमाध्यम :** एकेकाळी जिल्ह्यावर निर्विवाद वर्चस्व गाजवणारी कॉंग्रेस आज स्वतःच्या घरातील गटबाजीने पोखरली जात असल्याचे चित्र वर्ध्यात पाहायला मिळत आहे. जिल्हाध्यक्षपदी सुनील कोल्हे यांच्या नियुक्तीनंतर कॉंग्रेसमध्ये नाराजीचा स्फोट झाला असून संघटन सृजन अभियानावरच आता कार्यकर्त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हे संघटन सृजन नसून कॉंग्रेसच्या अस्तित्वाचे विसर्जन आहे, अशी जहरी टीका कॉंग्रेसचे नेते शैलेश अग्रवाल यांनी केल्याने पक्षातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.

जिल्हाध्यक्षपदासाठी शेखर शेंडे शैलेश अग्रवाल उदय मेघे यांच्यासह अनेकांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू होती. कार्यकर्त्यांमध्ये मजबूत पकड, आक्रमक भूमिका आणि संघटनावर प्रभाव शेखर शेंडे यांच्यात असल्याने शेखर शेंडे यांनाच संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र पक्षश्रेष्ठींनी सुनील कोल्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याने अनेक कार्यकर्त्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

रणजीत कांबळे स्वतः अध्यक्ष झाले असते तर कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला असता, अशी चर्चा कॉंग्रेसच्या गोटात उघडपणे सुरू आहे.


### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, वर्धा

उन्हाळी पाणी टंचाई २०२६ अंतर्गत खालील नमुद २ गावांकरीता नळ पाणी पुरवठा विशेष दुरुस्ती व कामाची २ स्वतंत्र ई-निविदा मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे.

| ई-निविदा सूचना क्र. | गावाचे नांव | कामाची अंदाजित किंमत (रुपये) |
|---|---|---|
| ई-निविदा सूचना क्र.३ सन २०२६-२७ | उमरी मेघे | २०५३२३६.०० |
| ई-निविदा सूचना क्र.४ सन २०२६-२७ | मसाळा | २०५४६८८.०० |
| **एकुण अंदाजित किंमत** | | **४१०७९२४.००** |

**कामाची एकुण अंदाजित किंमत रु.४१,०७,९२४/- आहे.** सदर निविदेचा वेबपोर्टलवर सविस्तर तपशील दिनांक २३.०५.२०२६ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, वर्धा**

**(क्र.जिमाका-वर्धा/४२/२०२६-२०२७)**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जगातील सर्वात ऊष्ण २२ शहरे भारतातील

## यूपीमधील १३ शहरे; ३५ शहरांमध्ये रात्रीही ऊष्ण वारे वाहिले







**नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर/लखनौ/वृत्तसंस्था :** पुढील ३ दिवस देशाला ऊष्णतेपासून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. AQI वेदरनुसार, शुक्रवारी दुपारी ३ वाजता जगातील २२ सर्वात ऊष्ण शहरांमध्ये पारा ४७स्ब पेक्षा जास्त नोंदवला गेला. ही सर्व शहरे भारतातील आहेत. यापैकी १३ शहरे उत्तर प्रदेशातील आहेत. ओडिशातील बोलांगीर आणि बिहारमधील सासाराम सर्वाधिक ऊष्ण राहिले.

**शुक्ररु वारी देशातील ३५ शहरांमध्ये रात्रीचा पारा ३०°C च्या वर होता.**

बिहारमधील पाटणा आणि गयाजी येथे ऊष्णतेमुळे २२ ते २६ मे पर्यंत ५वी पर्यंतच्या शाळा बंद करण्यात आल्या आहेत. तर, राज्यातील मधेपुरा आणि सहरसा येथे गुरु वारी पाउस झाला, यावेळी वीज पडून ३ लोकांचा मृत्यू झाला. यूपीच्या प्रयागराजमध्ये २१ मे रोजी दिवसाचे तापमान ४५°C पेक्षा जास्त होते. या भाजून काढणा-या ऊष्णतेत दोन मजूर टोपलीने डोके झाकताना दिसले.

**राजस्थानमध्ये** तीव्र ऊष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. रात्रीही ऊष्ण राहतील. छत्तीसगड, हरियाणा, दिल्ली, मध्य प्रदेश, पंजाब, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातही ऊष्णतेची लाट राहील. आसाम, मेघालय, केरळम, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे. बिहार, दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, पंजाब, राजस्थान आणि तेलंगणामध्ये ऊष्णतेची लाट कायम राहू शकते. पश्चिम बंगाल, ओडिशा आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये ऊष्ण आणि दमट हवामान कायम राहू शकते. केरळम, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये मुसळधार पाउस पडू शकतो. आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि झारखंडमध्ये ५०-६० किमी प्रतितास वेगाने वादळी वा-यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**राज्यांमधील हवामानाची स्थिती-** मध्य प्रदेश: राज्यातील ४ जिल्ह्यांमध्ये ऊष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट, तापमान ४६°C च्या वर जाउ शकते; पुढील १० दिवस ऊष्णता शिगेला पोहोचेल. मध्य प्रदेशात पुढील १० दिवस म्हणजेच ३१ मे पर्यंत तीव्र ऊष्णता कायम राहील. हवामान विभागाने आज निवाडी, छतरपूर, पन्ना आणि सतना येथे ऊष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी केला आहे. येथे कमाल तापमान ४६°C पर्यंत जाउ शकते.

**उत्तर प्रदेशः** राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये ऊष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट, बांदा सलग ५ व्या दिवशी देशातील सर्वात ऊष्ण शहर, तापमान ४७.६स्ब उत्तर प्रदेशातील बांदा, चित्रकूट, कौशांबी, प्रयागराजसह १० जिल्ह्यांमध्ये ऊष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील बांदा गुरु वारी सलग पाचव्या दिवशी देशातील सर्वात ऊष्ण शहर ठरले, येथे तापमान ४७.६°C पर्यंत पोहोचले. याशिवाय प्रयागराजमध्ये ४६.६स्ब, वाराणसीमध्ये ४५.६°C, हमीरपूर आणि सुलतानपूरमध्ये ४५.२°C तापमान नोंदवले गेले.



**राजस्थानः** राज्यात आज वादळी वा-यासह पावसाचा इशारा, श्रीगंगानगर ४५.१°C तापमानासह राज्यात सलग दुस-या दिवशी सर्वात ऊष्ण शहर. हवामान विभागाने आज आणि उद्या अलवर, भरतपूर, जयपूर, दौसा, सीकर आणि झुंझुनूंमध्ये वादळी वा-यासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. याव्यतिरिक्त, संपूर्ण राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये ऊष्णतेची लाट वाढण्याचा इशाराही दिला आहे. गुरु वारी सलग दुस-या दिवशी श्रीगंगानगर ४५.१°C तापमानासह राज्यातील सर्वात ऊष्ण शहर ठरले.

**छत्तीसगडः** राज्यात ५ दिवस ऊष्णतेच्या लाटेचा इशारा, पुढील ४ दिवसांत कमाल तापमानात १°C ते ३°C वाढण्याचा अंदाज. छत्तीसगडमध्ये हवामान विभागाने ५ दिवसांसाठी ऊष्णतेच्या लाटेचा इशारा जारी केला आहे. यासोबतच कमाल तापमान १°C ते ३°C पर्यंत वाढू शकते. रायपूरच्या माना परिसरात गुरु वारी कमाल तापमान ४५°C नोंदवले गेले.

**बिहारः** राज्याच्या १० जिल्ह्यांचे तापमान ४०°C पेक्षा जास्त, आज १४ जिल्ह्यांमध्ये ऊष्णतेच्या लाटेचा इशारा; पाटण्यात शाळा बंद. गुरु वारी बिहारमधील १० जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान ४०°C होते. रोहतासमध्ये ४४.६°C, कैमूरमध्ये ४४.४°C, बक्सरमध्ये ४३.४°C औरंगाबादमध्ये ४३.३°C आणि पाटणामध्ये ४२°C तापमान नोंदवले गेले. गयाजी आणि जहानाबादमध्ये ५वी पर्यंतच्या शाळा बंद करण्यात आल्या आहेत. आज राज्याच्या १४ जिल्ह्यांमध्ये ऊष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**हरियाणाः** राज्यात ३८ वर्षांनंतर सर्वात ऊष्ण रात्र, भिवानीमध्ये तापमान ३६.६°C होते, सिरसाचे कमाल तापमान ४५.८ °C. हरियाणात ऊष्ण रात्रीचा ३८ वर्षांचा विक्रम मोडला. गुरु वारी भिवानीमध्ये रात्रीचे तापमान ३६.६°C होते, जे १९८८ मध्ये ३४.८°C होते. याशिवाय, राज्यातील सिरसा हे सर्वात ऊष्ण शहर राहिले, येथे कमाल तापमान ४५.८ °C होते.

**उत्तराखंड**: ६ जिल्ह्यांमध्ये ऊष्णतेच्या लाटेचा इशारा, मसुरीसह हिल स्टेशन्समध्ये पारा ३०स्ब च्या वर; नैनितालमध्ये शाळांची वेळ बदलली. उत्तराखंडमधील ६ जिल्ह्यांमध्ये आज ऊष्णतेची लाट आणि ५ जिल्ह्यांमध्ये पावसाचा अलर्ट आहे. मसूरी, नैनिताल आणि लॅन्सडाउनसारख्या हिल स्टेशनमध्येही कमाल तापमान ३०°C पेक्षा जास्त पोहोचत आहे. आज नैनितालमध्ये शाळांची वेळ बदलण्यात आली आहे.

**पंजाबः** जालंधर, लुधियाना आणि पठाणकोटमध्ये पावसामुळे तापमानात घट; पुढील २ दिवस तीव्र ऊष्णतेच्या लाटेचा (सीवियर हीट वेव) अलर्ट- पंजाबमधील जालंधर, लुधियाना आणि पठाणकोटमध्ये पाउस झाल्याने तापमानात घट झाली आहे. येथे जोरदार वा-यासह पाउस झाला. मात्र, गुरु वारी बठिंडामध्ये सर्वाधिक ४४.६°C तापमान नोंदवले गेले.

**हिमाचल**: कांगडा-सुजानपूरमध्ये पावसामुळे ऊष्णतेपासून दिलासा मिळाला, आज गारपिटीचा ऑरेंज अलर्ट- हिमाचल प्रदेशातील कांगडामध्ये आज सकाळी पाउस झाला. हमीरपूरमधील सुजानपूर आणि बडसरमध्येही पाउस झाला. आज किन्नौर आणि लाहौल स्पीती वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये गारपिटीचा ऑरेंज अलर्ट आहे.

### भारतातील जगातील २२ सर्वात उष्ण शहरे

| शहर | राज्य | तापमान |
|---|---|---|
| बलांगिर | ओडिशा | ४७°C |
| सासाराम | बिहार | ४७°C |
| बिलासपूर | छत्तीसगड | ४७°C |
| वाराणसी | उत्तर प्रदेश | ४७°C |
| बक्सर | बिहार | ४७°C |
| जौनपूर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| महासमुंद | छत्तीसगड | ४७°C |
| मुरादाबाद | उत्तर प्रदेश | ४७°C |
| सीतापूर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| रायपूर | छत्तीसगड | ४७°C |
| मिर्झापूर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| प्रयागराज | उत्तर प्रदेश | ४७°C |
| पिलीभीत | उत्तर प्रदेश | ४७°C |
| भिलाई | छत्तीसगड | ४७°C |
| रुद्रपूर | उत्तराखंड | ४७°C |
| गाझीपूर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| दुर्ग | छत्तीसगड | ४७°C |
| शाहजहाँपूर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| रामपूर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| बिजनौर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| अकबरपूर | उत्तर प्रदेश | ४७°C |
| बरेली | उत्तर प्रदेश | ४६°C |

टीप:- हे तापमान २२ मे दुपारी ३ वाजेपर्यंतचे आहेत.

**मुंबईत मान्सूसपूर्व पावसाच्या सरी:** उकाड्यामुळे हैरान झालेल्या जनतेला दिलासा, हिंगोली, सोलापुरातही सरी; विदर्भातील ऊष्णतेची लाट कायम-गत काही दिवसांपासून वाढत्या तापमानाने मुंबईकरांच्या अंगाची अक्षरशः लाही - लाही होत होती. अल निनोच्या प्रभावामुळे यंदा मुबलक पाउसपाणी होणार किंवा नाही? या चिंतेने नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. लोक चातक पक्षाप्रमाणे पावसाची वाट पाहत होते. त्यातच आज सकाळी मुंबईतील काही भागांत मान्सूनपूर्व सरींनी हजेरी लावल्यामुळे उकाड्यामुळे हैरान झालेल्या मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला. दरम्यान, विदर्भात ऊष्णतेची लाट अजून कायम असून, नागरिकांना अजूनही ऊन्हाच्या तीव्र झळांचा सामना करावा लागत आहे


# इंधनाची साठेबाजी करू देउ नका

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्वच जिल्हाधिका-यांना इंधनाच्या साठेबाजीवर बारीक लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले. सध्या काही ठिकाणी इंधनाअभावी तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. पण ती सर्वदूर नाही. सरकारने या प्रकरणी सर्वच जिल्हाधिका-यांना निर्देश जारी केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित इमॅजिन नेक्स्ट-२०२६ या कार्यक्रमाला हजेरी लावली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपण एआय तंत्रज्ञानाला टाळू शकत नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, इमॅजिन नेक्स्ट हा एक अत्यंत महत्त्वाचा इव्हेंट येथे होत आहे. एआय व टेक्नालाजीशी संबंधित लोकांना येथे निमंत्रित करण्यात आले होते. मी या कार्यक्रमाला एआयच्या ॲडोप्शन संदर्भात महाराष्ट्र काय करत आहे, याची माहिती दिली. कारण, आपल्याला माहिती आहे की, एआयची लाट आता कुणीही थांबवू शकत नाही. पण आपण त्या लाटेवर स्वार होउन आपल्या सामाजिक व आर्थिक लढाईला गती देउ शकतो. तोच प्रयत्न इंडिया एआय मिशनच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. तोच प्रयत्न महाराष्ट्रात आपण करत आहोत. या प्रकरणी आपली रणनीती काय आहे हे आम्ही सांगण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे. सध्याचा आपला विकास दर पुढील २-३ वर्षे कायम ठेवला, तर आपण सिंगापूर व यूएईला मागे टाकू शकतो अशी स्थिती आहे. पंतप्रधानांचे जे मिशन आहे तेच आमचे मिशन आहे. तेच मिशन आम्ही महाराष्ट्रातही राबवत आहोत. कारण, सध्या देश जगाच्या अशा वळणावर उभा आहे की, आत्ता नाही तर कधीच नाही. आम्ही अशा विकासाच्या मार्गावर चालत आहोत. त्यामुळे २०४५ विकसित महाराष्ट्र व विकसित भारत बनेल. मुख्यमंत्र्यांनी यावेळी पेट्रोल-डिझेलच्या सद्यस्थितीवरही भाष्य केले. ते म्हणाले, सरकारने या प्रकरणी सगळ्या जिल्हाधिका-यांना सूचना दिल्या आहेत. पेट्रोल-डिझेल विशेषतः डिझेल सध्या शेतीसाठी वापरले जात आहे. त्यामुळे आपण जिल्हाधिका-यांना यात जातीने लक्ष घालून यासंबंधी नीट प्लॅनिंग करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी कुणालाही साठेबाजी करू देउ नका असे सांगितले आहे. सर्वांना गरजेनुसार डिझेल मिळाले पाहिजे असा सरकारचा प्रयत्न आहे. काही ठिकाणी निश्चितच तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. पण ती सर्वदूर नाही. एखाद्या ठिकाणी एखादी घटना घडते आणि तिचा गाजावाजा होतो. पण तो ही होउ नये याचा प्रयत्न सरकार करेल.



# पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध
## भीतीपोटी अनावश्यक खरेदी टाळावी

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे पेट्रोल-डिझेलच्या दरांमध्ये चढ-उतार पाहायला मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात इंधनटंचाई निर्माण होण्याच्या अफवा पसरविल्या जात आहेत. मात्र, महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. माध्यमांशी संवाद साधताना भुजबळ म्हणाले की, राज्यात कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नाही. त्यामुळे नागरिकांनी भीतीपोटी अतिरिक्त पेट्रोल-डिझेल खरेदी करू न साठवणूक करू नये. गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणी गरजेपेक्षा अधिक इंधन खरेदी होत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे मे महिन्यात नेहमीच्या तुलनेत सुमारे २० टक्के अधिक पेट्रोल-डिझेलची विक्री झाल्याची माहिती त्यांनी दिली. केंद्र व राज्य शासन प्रत्येक नागरिकाला पुरेशा प्रमाणात इंधन उपलब्ध करू न देण्यास सक्षम आहेत. त्यामुळे अफवा किंवा भीतीच्या वातावरणामुळे अतिरिक्त साठा करण्याची आवश्यकता नाही, असे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केले. यावेळी त्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमधील गेल्या काही दिवसांतील इंधन विक्रीची आकडेवारीही माध्यमांसमोर मांडली. नागरिकांनी संयम बाळगून आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.



# गोवंश तस्करीवर आता मकोका

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गोवंशाची अवैध वाहतूक आणि बेकायदा कत्तल रोखण्यासाठी गृह विभागाने गुरु वारी कठोर पावले उचलली आहेत. यापुढे वारंवार आणि संघटितरीत्या गोतस्करी करणा-या टोळ्यांवर थेट मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.या नव्या नियमांची आणि सूचनांची काटेकोर अंमलबजावणी न झाल्यास संबंधित भागाचे पोलिस आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनाच थेट जबाबदार धरले जाईल व त्यांना नियमित आढावा घ्यावा लागेल. राज्यात गोवंश तस्करी आणि अवैध वाहतुकीच्या मुद्यावरू न अनेकदा तणाव निर्माण होउन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत होता. या वाढत्या घटना आणि विविध संघटनांकडून सातत्याने येणा-या तक्रारींची गंभीर दखल घेत, या संघटित गुन्हेगारीला मुळासकट मोडून काढण्यासाठी राज्य सरकारने थेट मकोका लावण्यासारखा मोठा निर्णय घेतला आहे.



**सीमावर्ती भागांत संयुक्त नाकेबंदी-** परराज्यांतील तस्करी रोखण्यासाठी राज्याच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिका-यांच्या नेतृत्वाखाली पोलिस, परिवहन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि पशुसंवर्धन विभागाची संयुक्त तपासणी चौकी आणि ठिकठिकाणी संयुक्त भरारी पथके तैनात केले जातील. डायल ११२ वरू न त्वरित प्रतिसाद : नागरिकांनी डायल ११२ या हेल्पलाईनवर गोतस्करीची माहिती दिल्यास पोलिस यंत्रणेला त्यावर तात्काळ कारवाई करणे आता बंधनकारक असणार आहे. सर्व पोलिस अधीक्षक कार्यालये, आयुक्तालये आणि पशुसंवर्धन विभागात स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त केले जातील. नागरिकांच्या सोयीसाठी त्यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करू न दिले जातील. सर्व महापालिका, नगर परिषदा आणि ग्रामपंचायतींनी आपापल्या हद्दीतील अनधिकृत कत्तलखाने शोधून कारवाई करायची आहे. याशिवाय परिवहन विभागाने संशयित वाहनांची नियमित तपासणी करायची आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४८ मधील तरतुदींनुसार गायी, वासरे आणि दुभत्या जनावरांचे जतन व संरक्षण करणे अपेक्षित आहे. याच घटनात्मक आधारावर हे नवे परिपत्रक काढण्यात आले आहे. मुंबई मनपा अधिनियम, १८८८ नुसार धार्मिक कारणांसाठी आयुक्तांच्या लेखी परवानगीने उभारलेल्या तात्पुरत्या पशुवधगृहात स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य व जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचे पालन सक्तीचे राहील.

# राज्य सेवा हक्क आयोगाच्या नागपूर आयुक्त पदाची संदीप देशमुख यांनी घेतली शपथ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी संदीप जगन्नाथ देशमुख यांना महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या नागपूर आयुक्त पदाची तसेच गोपनीयतेची शपथ दिली. मंत्रालयासमोरील नवीन प्रशासन भवनाच्या ७ व्या मजल्यावरील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात शपथविधी सोहळा संपन्न झाला. यावेळी कोकण विभागाचे आयुक्त बलदेव सिंग, अमरावती विभागाचे आयुक्त अरुण डोंगरे उपस्थित होते. तसेच दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त डॉ. किरण जाधव, नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी आणि पुणे विभागाचे आयुक्त सुधाकर तेलंग सहभागी झाले होते. संदीप देशमुख हे अपर आयुक्त तथा विशेष निबंधक सहकारी संस्था (सेवानिवृत्त) म्हणून कार्यरत होते. त्यांच्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाचा लाभ आयोगाच्या कार्याला होणार असल्याचे मुख्य आयुक्त श्रीवास्तव यावेळी म्हणाले. जनतेच्या अधिकारांचे संरक्षण करणे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमच्या अंमलबजावणी संदर्भात क्षत्रीय अधिका-यांवर देखरेख ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे तसेच कामकाजाचा आढावा घेणे ही राज्य सेवा हक्क आयुक्त पदाची मोठी जबाबदारी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यपाल जिष्णु वर्मा यांनी मनु कुमार श्रीवास्तव यांना संदीप जगन्नाथ देशमुख यांना राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर पदाची शपथ देण्यासाठी प्राधिकृत केले होते. माजी राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे दिलीप शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी आयोगाच्या सचिव वैशाली राज चव्हाण उपस्थित होत्या.



## महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप, युनिकॉनची राजधानी

# पुढील दोन वर्षात महाराष्ट्र सिंगापूर आणि युएई ला मागे टाकणार-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवतंत्रज्ञानाच्या साह्याने महाराष्ट्र सर्वच क्षेत्रांमध्ये देशात आपला ठसा उमटवित आहे. संशोधन, नवोपक्रम, पायाभूत सुविधा, आर्थिक उत्पन्न या क्षेत्रात महाराष्ट्राच्या जवळपास देशातील कुठलेही राज्य नाही. नवीन उद्योग, तंत्रज्ञानातरीत व्यवसाय आणि डाटा सेंटर आधारित उद्योग स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र ही मजबूत परिसंस्था बनत आहे. त्यामुळे संशोधन, नवोपक्रम आणि जागतिक अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र भरारी घेत असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



जिओ वर्ल्ड सेंटर येथे इमॅजिनेक्स २०२६ या कार्यक्रमात रिपब्लिक मीडिया नेटवर्कचे संपादक अर्णब गोस्वामी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली.महाराष्ट्र एक ट्रिलियन डालर अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टा बाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप आणि युनिकार्नची राजधानी आहे. २०१५ मध्ये महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुमारे १४ लाख कोटी रु पयांची होती, जी आज ५४ लाख कोटी रु पयांवर पोहोचली आहे. गेल्या १० वर्षांत आपण अर्थव्यवस्थेचा आकार तिपटीहून अधिक वाढवला आहे.देशातील इतर अनेक राज्ये १ ट्रिलियन ड?लर अर्थव्यवस्था बनण्याबाबत बोलत आहेत, परंतु सध्या केवळ महाराष्ट्रच या उद्दिष्टाच्या सर्वात जवळ आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सध्या ६६० बिलियन ड?लरवर आहे. महाराष्ट्राचा सामान्य वृद्धी दर १० टक्के राहिला आहे. याच गतीने प्रगती कायम राहिल्यास, २०२५-२०२६ या वर्षातील 'अल् निनो'सारख्या नैसर्गिक आव्हानांमुळे थोडा फरक पडला तरी, आपण २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट नक्कीच साध्य करेल. अर्थव्यवस्थेच्या व्याप्तीबाबत महाराष्ट्र भारतातील इतर कोणत्याही राज्याशी स्पर्धा करत नसून, जगातील ३० वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. पुढील २ ते ३ वर्षांत महाराष्ट्र सिंगापूर आणि युएई च्या अर्थव्यवस्थेलाही मागे टाकणार आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे 'फोर्स मल्टिप्लायर' म्हणून काम करत आहेत. भौगोलिक माहिती प्रणाली, डेटा ट्रॅकिंग आणि डेटा पूलचा प्रभावी वापर यात केला जात आहे. हे उद्दिष्ट केवळ कागदावर नसून, त्यासाठी एक 'आर्थिक सल्लागार समिती' स्थापन करण्यात आली आहे. या समितीने प्रत्येक क्षेत्राच्या विकासाचा आराखडा तयार केला आहे. याशिवाय, 'विकसित महाराष्ट्र २०४७' हे व्हिजन तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये २०३० पर्यंत अल्पकालीन २०३५ पर्यंत मध्यकालीन आणि २०४७ पर्यंत दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी यांनी सांगितले.

# ऊमर खालिदला 3 दिवसांचा अंतरिम जामीन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २०२० मधील दिल्ली दंगलीतील कथित मोठ्या कटप्रकरणातील आरोपी आणि माजी विद्यार्थी नेता उमर खालिद याला त्याच्या आईच्या शस्त्रक्रियेसाठी दिल्ली उच्च न्यायालयाने तीन दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला आहे. आईच्या प्रकृतीचा विचार करू न न्यायालयाने सहानुभूतीपूर्वक भूमिका घेत हा दिलासा दिला. न्यायालयाने खालिदला १ जून रोजी सकाळी ७ वाजल्यापासून ३ जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला. यासाठी त्याला १ लाख रु पयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर मुक्त करण्यात येणार आहे. जामीनाच्या कालावधीत उमर खालिदला राष्ट्रीय राजधानी क्षेत्र सोडता येणार नाही, तसेच त्याने आपल्या घरी राहावे आणि केवळ रु ग्णालयात जाण्याचीच परवानगी असेल असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले आहेत. सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, यापूर्वीही कौटुंबिक समारंभांसाठी उमर खालिदला अंतरिम जामीन देण्यात आला होता आणि त्या वेळी त्याने न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटींचे काटेकोर पालन केले होते. दरम्यान, दिल्ली दंगलीतील कथित कटप्रकरणात उमर खालिद हा मुख्य सूत्रधारांपैकी एक असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. मात्र त्याच्या आईची प्रकृती आणि होणारी शस्त्रक्रिया लक्षात घेउन मर्यादित कालावधीसाठी अंतरिम जामीन मंजूर करण्यात आल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.



# कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर; मुंबई टेक वीक अधिक भव्य असेल-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे भविष्यातील परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात AI स्वीकारण्याची आवश्यकता आहे. मुंबई टेक वीकसारख्या उपक्रमांमुळे AI मधील संधी युवकांपर्यंत पोहोचतील आणि महाराष्ट्र देशातील AI नवोन्मेषाचे अग्रगण्य केंद्र बनेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई टेक वीक (MTW) २०२६ ची घोषणा सह्याद्री अतिथिगृहात केलीत्यावेळी ते बोलत होते. टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबई (टीम ) तर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने, आयडीएफसी बँक आणि मेटा यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम दि २९ आणि ३० मे रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे. इंडिया : आय इन एक्शन या थीमअंतर्गत आयोजित मुंबई टेक वीक २०२६ मध्ये विविध क्षेत्रांतील एआयच्या प्रत्यक्ष वापराचे सादरीकरण होणार असून मेटा , एंथ्रापिक , ओपेनाई , गूगल क्लाउड आणि नेसा यांसारख्या कंपन्यांचा सहभाग असेल.यावेळी मुंबई टेक वीक लोगोचे अनावरण करण्यात आले.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासन ए आय चा विविध विभागांमध्ये वापर करत आहे,AI च्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम आणि परिणामकारक होत आहे. शासन या परिवर्तनात सर्वात मोठा भागधारक म्हणून सक्रिय भूमिका बजावत आहे.मुंबई टेक वीकसारख्या व्यासपीठांमुळे AI संदर्भातील अनुभव लोकांपर्यंत अधिक व्यापक पातळीवर पोहोचतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी या कार्यक्रमात शासनाच्या AI उपक्रमांचे अनुभवात्मक सादरीकरण करण्याची सूचनाही केली.टीम च्या वाढत्या विस्ताराचे कौतुक करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अधिकाधिक तरु ण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक या उपक्रमाशी जोडले जात आहेत, ही सकारात्मक बाब आहे. महाराष्ट्र शासन AI क्षेत्रातील नवोन्मेष आणि उद्योगवृद्धीसाठी सदैव तुमच्या पाठीशी उभे आहे. गेल्या वर्षापेक्षा अधिक भव्य आणि प्रभावी मुंबई टेक वीक आयोजित करू या आणि महाराष्ट्रातील युवकांना AI क्षेत्रातील नव्या संधींशी जोडून त्यांना जागतिक पातळीवरील संधी उपलब्ध असेल.

## 29 आणि 30 मे रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे 'मुंबई टेक वीक' होणार

मुंबई टेक वीक (MTW बाबत टीम चे सह-अध्यक्ष आणि गव्हर्निंग कौन्सिल सदस्य हर्ष जैन म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य आणि मुंबई टेक वीकच्या संकल्पनेवरील त्यांच्या विश्वासाबद्दल आम्ही आभारी आहोत. टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबई (टीम ) तर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने, आयडीएफसी बँक यांच्या सहकार्याने आणि मेटा यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम २९ आणि ३० मे रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे पार पडणार आहे. इंडिया : आय इन एक्शन या थीमअंतर्गत आयोजित मुंबई टेक वीक २०२६ मध्ये विविध क्षेत्रांतील ए आय च्या प्रत्यक्ष वापराचे सादरीकरण होणार असून मेटा , एंथ्रापिक , ओपेनाई , गूगल क्लाउड आणि नेसा यांसारख्या कंपन्यांचा सहभाग असेल. एमटीयू २०२६ हे केवळ चर्चांपुरते मर्यादित न राहता उद्योगांचे स्वरूप कसे बदलत आहे आणि प्रत्यक्ष आर्थिक संधी कशा निर्माण करत आहे, हे दाखवण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सुरक्षेला प्राधान्य

देशभरात गहन प्रश्न बनलेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला ताजा निकाल हा मानवी सुरक्षेचा मूलभूत अधिकार आणि प्राण्यांविषयी असलेली करुणा यांमधील संघर्षाला पूर्णविराम देणारा आहे. शाळा, रुग्णालये, उपहारगृहे आदी सर्वदूर वाढलेला भटक्या कुत्र्यांचा वावर आणि त्यांच्याकडून होणाऱ्या हल्ल्यांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने मानवी जीवाला सर्वोच्च प्राधान्य देत घेतलेली भूमिका अत्यंत व्यावहारिक आणि काळाची गरज अधोरेखित करणारी आहे. राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला मिळालेल्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारामध्ये श्वानदंशाच्या किंवा हल्ल्याच्या भीतीशिवाय मुक्तपणे वावरण्याच्या अधिकाराचाही समावेश होतो, हे न्यायालयाने स्पष्टपणे मांडले. याचा अर्थ प्राण्यांविषयीचा दयाभाव बाळगताना मानवी जीवनाची सुरक्षा पणाला लावता येणार नाही, हा घटनात्मक समतोल न्यायालयाने योग्य रीतीने विषद केला. या निकालाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे न्यायालयाने पहिल्यांदाच रेबिजग्रस्त, असाध्य रोगाने आजारी किंवा अतिशय आक्रमक आणि धोकादायक भटक्या कुत्र्यांना कायदेशीर चौकटीत राहून दयामरण देण्याची परवानगी दिली. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता, न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने ७ नोव्हेंबर २०२५च्या आदेशाविरोधातील पुनर्विचार आणि सुधारणा याचिका फेटाळल्या. देशातील श्वानप्रेमींना न्यायालयाची ही भूमिका कठोर वाटू शकते; परंतु जमिनी स्तरावरील भीषण वास्तवाचा विचार करता याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नव्हता. लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिक हे भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांचे बळी ठरत आहेत. अशावेळी केवळ नसबंदी आणि लसीकरणावर अवलंबून न राहता समाजासाठी थेट धोका बनलेल्या श्वानांबाबत ठोस निर्णय घेण्याचे धाडस न्यायालयाने दाखवले. अर्थात, हा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना किंवा प्रशासनाला अनियंत्रितपणे वापरता येणार नाही, तर अर्हताप्राप्त पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्याने आणि १९६० च्या प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्याच्या अधीन राहूनच ही प्रक्रिया राबवावी लागणार आहे. न्यायालयाने भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मानक कार्यपद्धतीची वैधता मान्य करत प्राणी हक्क कार्यकर्त्यांच्या पुनर्विचार याचिका फेटाळून लावल्या. शाळा, रुग्णालये आणि सार्वजनिक वाहतुकीच्या ठिकाणांवरून भटक्या कुत्र्यांना हटवून त्यांचे आश्रयगृहांमध्ये पुनर्वसन करण्याचे नोव्हेंबर २०२५ चे निर्देश न्यायालयाने कायम ठेवले. पकडलेल्या कुत्र्यांना पुन्हा त्याच परिसरात सोडण्यास मज्जाव करून न्यायालयाने या समस्येच्या कायमस्वरूपी निर्मूलनासाठी दिशा दाखवली. आता खरी जबाबदारी राज्य सरकारे, महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनाची आहे. २०१९ मधील पशुधन जनगणनेनुसार भारतात १.५३ कोटी भटकी कुत्री आहेत. कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी एबीसी म्हणजेच ॲनिमल बाईट सेंटर योजना आहे; पण तिच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत ठणठणाट आहे. दरवर्षी भारतात ८० लाखांहून अधिक लोक कुत्र्यांच्या हल्ल्यांना बळी पडतात. भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याने रेबिज हा घातक आणि विषाणूजन्य आजार होण्याची शक्यता असते. जगात रेबिजमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी ३६ टक्के मृत्यू एकट्या भारतात होतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, दरवर्षी भारतात २० हजारहून अधिक लोक रेबिजमुळे मृत्युमुखी पडतात. देशात काही घटनांमध्ये कुत्र्यांनी लहान बालकांचे लचके तोडले, तर काही ठिकाणी दुचाकीस्वारांच्या मागे लागल्यामुळे अपघातात नागरिकांचा जीव गेला. गेल्या आठवड्यात भुसावळ येथे कुत्र्याच्या हल्ल्यात नऊ वर्षांच्या मुलाच्या चेहऱ्यावर तब्बल ८० टाके पडले. मुंबईत उपचारावेळी त्याची प्राणज्योत मालवली. देशात कुत्र्यांच्या चाव्याने होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी ९९ टक्के प्रकरणांमध्ये रेबिजचा प्रसार झालेला असतो. रेबिजवर औषध नाही. यावर एकमेव उपाय म्हणजे लसीकरण आणि जनावरांच्या संख्येवर नियंत्रण; मात्र भारतातील ८० टक्क्यांहून अधिक भटक्या कुत्र्यांचे लसीकरण झालेलेच नसते. त्यामुळे संसर्गाचा धोका अधिक वाढतो. जागतिक आरोग्य संघटनेने २०३० पर्यंत भारताला रेबिजमुक्त करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर लोकसहभागासह सार्वजनिक लसीकरण मोहीम सुरू करणे अत्यावश्यक आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत लस दिली गेली पाहिजे. न्यायालयाच्या या ऐतिहासिक आदेशाची प्रभावी आणि एकसमान अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासन कितपत गांभीर्य दाखवते, यावर परिणामांची दिशा आणि यश अवलंबून आहे. आजवर पायाभूत सुविधांचा अभाव आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची कमतरता यामुळे ही समस्या चिघळत गेली. उघड्या कचराकुंड्या, अन्न कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आणि अपुऱ्या आश्रयव्यवस्था यामुळेच भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली. अनेक शहरांमध्ये 'कचराकुंडी मुक्त शहर' मोहिमेत कचराकुंड्या हटवल्या; परंतु नागरिकांकडून कचरा उघड्यावर टाकणे थांबले नाही. परिणामी, कचऱ्याभोवती भटक्या कुत्र्यांचे कायमचे वास्तव्य निर्माण होते. अनेक श्वानप्रेमी निवासी भागांत, सोसायट्यांच्या प्रवेशद्वारांवर किंवा रस्त्यांवर भटक्या कुत्र्यांना अन्न खाऊ घालतात. यामुळे एकाच ठिकाणी कुत्र्यांची टोळकी तयार होतात. कुत्रे त्या परिसराला स्वतःचा प्रदेश मानू लागतात आणि तिथे येणाऱ्या अनोळखी नागरिकांवर किंवा वाहनांवर हल्ले करतात. कुत्र्यांचा प्रजनन दर अत्यंत जास्त असल्याने एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर नसबंदी झाली नाही, तर कुत्र्यांची संख्या नियंत्रणात येत नाही. दयामरण हा अंतिम आणि अपवादात्मक उपाय असला, तरी त्यासोबत व्यापक प्रतिबंधात्मक यंत्रणा उभारणे तितकेच आवश्यक आहे. वेळेवर योग्य पावले उचलली नाहीत, तर ही समस्या आणखी भयावह रूप घेऊ शकते. निर्देशांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिल्यामुळे प्रशासनाला गांभीर्याने पावले उचलावीच लागणार आहेत. मानवी सुरक्षा आणि प्राण्यांचे कल्याण या दोन्ही आघाड्यांवर समतोल राखताना सार्वजनिक आरोग्याला आणि सुव्यवस्थेला प्राधान्य देणारा हा निकाल देशातील नागरी जीवनाला भयमुक्त करण्यासाठी मैलाचा दगड ठरणारा आहे.

# दुहेरी संकटाच्या चक्रव्यूहात जग

**एका नवीन वैज्ञानिक अभ्यासानुसार हवामान धोरणांमध्ये ठोस बदल न झाल्यास या शतकाच्या अखेरीस पृथ्वीवरील सुमारे २८ टक्के म्हणजेच सुमारे २६० कोटी लोक उष्णता आणि दुष्काळाच्या दुहेरी संकटाचा सामना करत असतील.**

✍ मिलींद बेंडाळे

जगात तीव्र उष्णता आणि दुष्काळाचा धोका आजच्या तुलनेत पाचपटींनी वाढणार आहे. हे केवळ हवामानाशी संबंधित संकट नाही, तर जीवन, उपजीविका आणि भविष्यावर एकाच वेळी झालेला हा हल्ला आहे. गेल्या दोन दशकांमधील कल पाहिला तर या बदलाचे संकेत स्पष्ट दिसू लागले आहेत. २००१ ते २०२० दरम्यान, जगाने दरवर्षी सरासरी चार वेळा अशी परिस्थिती अनुभवली आहे, जेव्हा भीषण उष्णता आणि दुष्काळाच्या संकटाशी एकाच वेळी सामना करावा लागला. ही आकडेवारी औद्योगिक कालखंडापूर्वीच्या (१८५० ते १९००) काळाच्या तुलनेत दुप्पट आहे. या पार्श्वभूमीवर शास्त्रज्ञांनी अशी भीती व्यक्त केली आहे, की परिस्थिती अशीच राहिली, तर या शतकाच्या अखेरीस दरवर्षी अशा घटना सुमारे दहा वेळा घडू शकतात आणि प्रत्येक घटना दोन आठवड्यांपर्यंत लोकांना होरपळून टाकू शकते. हा केवळ हवामानातील बदल नाही, तर जीवनाचा वेग थांबवून टाकणारे संकट आहे. शास्त्रज्ञांच्या मते, उष्णता आणि दुष्काळ एकमेकांना वाढवतात आणि ते दोन्ही एकत्र येतात, तेव्हा त्यांचा फटका अनेक पटींनी वाढतो. शेतातील उभी पिके सुकतात, पाण्याचे स्त्रोत आटतात, जंगले पेटू लागतात आणि बाजारपेठेत अन्नधान्याच्या किंमती झपाट्याने वाढतात. याचा सर्वाधिक फटका उघड्या अवकाशाखाली काम करणाऱ्यांना बसतो. त्यात मजूर, शेतकरी आणि बांधकामक्षेत्राशी संबंधित लोकांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी ही केवळ गैरसोय नसून जीवन-मरणाचा प्रश्न बनतो.

**शास्त्रज्ञांचे परिस्थितीवर विश्लेषण**

या शतकाच्या अखेरीस परिस्थिती कशी बदलू शकते, हे समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी आठ हवामान मॉडेल्सवर आधारित १५२ सिम्युलेशनचे विश्लेषण केले आहे. यामध्ये लोकसंख्येतील वाढ आणि 'ग्लोबल वॉर्मिंग'च्या विविध परिस्थितींचा समावेश करण्यात आला आहे. त्याचा तपशील 'आयपीसीसी च्या सहाव्या मूल्यांकन अहवालात नमूद केला आहे. या अभ्यासात 'उष्णता दुष्काळ'च्या घटनांची व्याख्या अशा दिवसांच्या रूपात केली आहे, जेव्हा तापमान त्याच्या सामान्य पातळीच्या वरच्या दहा टक्क्यांमध्ये असते आणि सोबतच किमान मध्यम स्तराचा दुष्काळही असतो. ही तुलना १९६१ ते १९९० च्या आधारभूत कालावधीच्या आकडेवारीशी केली गेली आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष 'जिओफिजिकल रिसर्च लेटर्स' या नामांकित आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. या संकटाचे सर्वात कटू सत्य म्हणजे त्यातील विषमता. ज्या देशांनी हरितगृह वायूंचे सर्वात कमी उत्सर्जन केले, म्हणजेच जे हवामान संकटासाठी सर्वात कमी जबाबदार आहेत, त्यांनाच या दुहेरी हल्ल्याचा सर्वाधिक सामना करावा लागणार आहे. यात विशेषतः कमकुवत आणि उष्ण कटीबंधीय क्षेत्रात राहणाऱ्या लोकांचा समावेश आहे.

**संकटात वेगाने वाढ**

एसी-कुलरसारखी साधने उपलब्ध नसलेल्या तसेच आरोग्यसेवाही मजबूत नसलेल्या लहान देशांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजात हे संकट दैनंदिन जीवन अधिक कठीण करेल. पाणी संपल्यानंतर दुसरा कोणताही पर्याय नसणे, हा या धोक्याचा सर्वात भयानक पैलू आहे. शास्त्रज्ञांचा अंदाज आहे, की २०३० मध्ये ६.६ टक्के लोकसंख्या या धोक्याच्या छायेत असेल, तर २०९० पर्यंत हा आकडा २८ टक्क्यांवर पोहोचेल. म्हणजेच येणाऱ्या वर्षांमध्ये हे संकट वेगाने वाढणार असून कोट्यवधी लोकांना कचाट्यात घेणार आहे. एका सरासरी श्रीमंत देशातील नागरिकाचे आयुष्यभराचे कार्बन उत्सर्जन दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला या धोकादायक उष्ण कोरड्या परिस्थितीमध्ये ढकलू शकते. ही आकडेवारी जागतिक विषमता अधिक स्पष्ट करते. जगातील



देशांनी आपली हवामानविषयक आश्वासने गांभीर्याने पाळल्यास हा धोका मोठ्या प्रमाणात कमी केला जाऊ शकतो. अशा स्थितीत शतकाच्या अखेरीस प्रभावित लोकसंख्या कमी होऊन सुमारे १८ टक्के राहू शकते. म्हणजेच १७० कोटी लोकांना या दुहेरी संकटाचा सामना करावा लागेल. हा फरक सांगतो, की आज घेतलेले निर्णय येणाऱ्या काळात अब्जावधी जीव सुरक्षित किंवा असुरक्षित करू शकतात. आकाशातून बरसणारी झळाळती उष्णता आणि जमिनीखाली लपून बसलेली पाण्याची टंचाई ही केवळ ऋतूंची चक्रे उधळल्याची चिन्हे नाहीत, तर मानवी सभ्यतेसमोर उभ्या ठाकलेल्या नव्या संकटाची चाहूल आहे.

**दुष्काळाची तीव्रता**

हवामानबदलाच्या वेगाने वाढणाऱ्या परिणामांमुळे आज उष्णतेच्या लाटा आणि दुष्काळ या दोन स्वतंत्र आपत्ती राहिलेल्या नाहीत; त्या एकमेकांना पूरक ठरत अधिक तीव्र, व्यापक आणि घातक स्वरूप धारण करत आहेत. या दुहेरी संकटव्यूहाचा वेध घेताना केवळ पर्यावरणाचा नव्हे, तर अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि सामाजिक न्याय यांचा विचार अपरिहार्य ठरतो. जगभरात गेल्या काही दशकांमध्ये तापमान वाढीचा वेग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसतो. उष्णतेच्या लाटा आता अप वाद राहिले ल्या नाहीत, तर नियमित होत चालल्या आहेत. त्याच वेळी पर्जन्यमानातील अनियमितता आणि पाण्याच्या स्त्रोतांवरील ताण वाढल्याने दुष्काळाची तीव्रता वाढत आहे. या दोन्ही घटना एकाच वेळी घडतात, तेव्हा परिणाम अनेकपटींनी वाढतो. उष्णतेमुळे जमिनीतील आर्द्रता वेगाने कमी होते, तर दुष्काळामुळे पाण्याची उपलब्धता घटते. परिणामी, तापमान आणखी वाढते आणि दुष्काळ अधिक तीव्र बनतो, असे एक दुष्टचक्र निर्माण होते. या दुहेरी संकटाचा सर्वात पहिला आणि तीव्र फटका शेतीला बसतो. भारतासारख्या देशात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या शेतीवर अवलंबून असताना उष्णता आणि दुष्काळाचा संगनमताने होणारा परिणाम अत्यंत गंभीर ठरतो. पिकांची वाढ खुंटते, उत्पादन घटते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर थेट परिणाम होतो. अन्नधान्याची उपलब्धता कमी झाल्याने बाजारात किमती वाढतात. त्याचा परिणाम शहरातील ग्राहकांवरही होतो. अशा परिस्थितीत अन्नसुरक्षेचा प्रश्न अधिक तीव्र बनतो.

**पाण्याच्या उपलब्धतेवर चिंताजनक परिणाम**

पाण्याच्या उपलब्धतेवर होणारा परिणामही तितकाच चिंताजनक आहे. नद्या, तलाव आणि भूजलस्तर यांवर आधीच ताण आहे. उष्णतेमुळे बाष्पीभवनाचा दर वाढतो, तर दुष्काळामुळे पाण्याची भर पडत नाही. परिणामी, पाण्याचा तुटवडा अधिक तीव्र होतो. शहरी भागांमध्ये पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो, तर ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष वाढतो. भविष्यात 'पाणी युद्धांची भीती व्यक्त केली जाते, ती या पार्श्वभूमीवर निराधार नाही. या संकटाचा सर्वाधिक फटका समाजातील सर्वात असुरक्षित घटकांना बसतो. उघड्यावर काम करणारे मजूर, शेतकरी, बांधकाम कामगार यांच्यासाठी उष्णतेच्या लाटा केवळ अस्वस्थता निर्माण करत नाहीत, तर आरोग्या साठी घातक ठरतात. उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या वाढतात. दुष्काळामुळे रोजगाराच्या संधी कमी होतात, स्थलांतर वाढते आणि सामाजिक अस्थैर्य निर्माण होते.

अशा वेळी या घटकांसाठी ही परिस्थिती जीवन-मृत्यूचा प्रश्न बनते. या दुहेरी संकटाची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे जागतिक असमानता. हवामानबदलासाठी सर्वाधिक जबाबदार असलेले विकसित देश आणि त्याचा सर्वाधिक फटका सहन करणारे विकसनशील देश यांच्यातील दरी अधिकच वाढत आहे. उष्णकटिबंधीय प्रदेशातील गरीब देशांकडे ना पुरेशी साधने आहेत, ना तांत्रिक क्षमता. त्यामुळे ते या संकटाला सामोरे जाण्यात अधिक असुरक्षित ठरतात. ही परिस्थिती केवळ पर्यावरणीय नव्हे, तर नैतिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण करते. तथापि, या गंभीर चित्रात काही सकारात्मक शक्यतादेखील दडल्या आहेत.

**दीर्घकालीन दृष्टिकोनाची आवश्यकता**

हवामानबदलावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक स्तरावर विविध करार आणि उपक्रम राबवले जात आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करणे, नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे आणि टिकाऊ विकासाच्या संकल्पनांचा स्वीकार करणे या उपाययोजनांमुळे या संकटाची तीव्रता कमी करता येऊ शकते; मात्र उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी अत्यंत गरजेची आहे. स्थानिक पातळीवरही अनेक उपाय करता येऊ शकतात. जलसंधारण, सूक्ष्म सचन, पिकांच्या पद्धतींमध्ये बदल आणि हवामानस्नेही शेती उपाययोजनांमुळे दुष्काळाचा परिणाम कमी करता येतो. शहरी भागात हरितक्षेत्र वाढवणे, उष्णता कमी करणारी पायाभूत सुविधा उभारणे आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करणे यावर भर देणे आवश्यक आहे तसेच आपत्ती व्यवस्थापनाची सक्षम यंत्रणा उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शासनाच्या धोरणांमध्ये दीर्घकालीन दृष्टिकोन असणे आवश्यक आहे.

नियोजनबद्ध पद्धतीने पायाभूत सुविधा उभारणे, संशोधन आणि विकासावर भर देणे आणि लोकजागृती करणे या बाबींचा समन्वय साधणे गरजेचे आहे तसेच सर्वात असुरक्षित घटकांसाठी विशेष योजना राबवणे आवश्यक आहे. उष्णता आणि दुष्काळाचा हा दुहेरी संकटव्यूह आपल्याला एक स्पष्ट संदेश देतो, तो म्हणजे मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलन ढासळले आहे.

या संतुलनाची पुनर्स्थापना करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, येणाऱ्या पिढयांसाठी आपण अधिक कठीण आणि अस्थिर जग सोडून जाऊ.

# भारतातील शेतकऱ्यांवर हा अन्याय नाही का?


**आदरणीय श्री नरेंद्र मोदी,**
**पंतप्रधान, भारत सरकार दिल्ली**

**विषय-** पाकिस्तानमध्ये कापसाच्या बिया ४०० रुपये प्रति किलो दराने उपलब्ध असताना भारतातील शेतकऱ्यांना मात्र तंत्रज्ञानाच्या दृष्टीने कनिष्ठ दर्जाच्या बियांच्या बदल्यात २,००० रुपये प्रति किलो मोजावे लागत आहेत हा अन्याय नाही का? याबाबत २४ एप्रिल २०२६ रोजी पत्र दिले होते या पत्राचे उत्तर १५ दिवसात आले पण हे उत्तर आहे की टाळाटाळा आहे?

**विनम्र अभिवादन,**

या संदर्भात २४ एप्रिल २०२६ रोजी आपणास एक पत्र सादर केले होते. आपल्या कार्यालयाने अत्यंत तत्परतेने कार्यवाही केली आणि आम्हाला ८ मे २०२६ रोजीचे उत्तर-पत्र प्राप्त झाले. त्याबद्दल आपले आणि कृषी मंत्रालयाचे मनःपूर्वक आभारी आहोत. हे अधिकृत उत्तर डॉ. राजेश कुमार सिंह, सहाय्यक आयुक्त (बियाणे) यांच्याद्वारे जारी करण्यात आले होते. आपल्या संदर्भासाठी या उत्तराची एक प्रत सोबत जोडली आहे.

१) पाकिस्तानमध्ये ३-जीन युक्त कापसाच्या बिया ४०० रुपये प्रति किलो दराने उपलब्ध आहेत, तर भारतात २-जीन कापसाच्या बियाही सहज उपलब्ध नाहीत. मग, शेतकऱ्यांकडून २,००० रुपये प्रति किलो दर का आकारला जात आहे? आम्हाला या प्रश्नाचे उत्तर हवे आहे.



२) आपल्या सरकारने २०१५ मध्ये सरळ जाती कापसाच्या बिया उपलब्ध करून देण्याबाबत एक निर्देश जारी केला होता. जशी पद्धत पाकिस्तानमध्ये प्रचलित आहे. त्या निर्देशाच्या संदर्भात काही प्रगती झाली आहे का किंवा काही प्रतिसाद मिळाला आहे का?

३) ज्या देशाकडून आपण हे बीटी तंत्रज्ञान स्वीकारले आहे अगदी अमेरिकेतही प्रामुख्याने प्युअर-लाईन कापसाच्या बियांचाच वापर केला जातो; तिथे संकरित कापसाच्या बिया ही प्रमाणित पद्धत नाही. आम्हाला या मुद्द्यावरही उत्तर हवे आहे.

४) आदरणीय महोदय, आमचे हे प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. कारण कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बियाणांच्या उपलब्धतेबाबत दीर्घकाळापासून मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाढत्या मजुरीच्या खर्चामुळे गुजरातमध्ये शुद्ध संकरित कापसाच्या बियांचे उत्पादन करणे अधिकाधिक आव्हानात्मक बनत चालले आहे. परिणामी, शुद्ध बियाणांच्या जागी दुसऱ्या बियाणांची भेसळ करून त्यांची विक्री करण्याच्या प्रकारांना व गैरव्यवहारांना वाव मिळत असून, अशा घटनांमध्ये वाढ होत आहे. अगदी सोप्या आणि स्पष्ट शब्दांत सांगायचे तर कापसाची बियाणे ज्यांचा भाव २००७ मध्ये ४०-५० रुपये प्रति किलो होता ती सध्या २,००० रुपये प्रति किलो दराने विकली जात आहेत. आम्ही माननीय कृषीमंत्र्यांना पत्र लिहून अशी विचारणाही केली होती की, शेतकऱ्याने खरेदी केलेली बियाणे 'एफ१' (शुद्ध) आहेत की 'एफ२' (भेसळयुक्त), हे शेतकरी नक्की कसे ओळखू शकेल? तथापि, या संदर्भात आम्हाला अद्याप कोणतेही ठोस स्पष्टीकरण प्राप्त झालेले नाही.

कापूस लागवडीमध्ये एचडीपीएस अर्थात, प्रति एकर अधिक संख्येने रोपांची लागवड करण्याची पद्धत अवलंबण्याबाबत सध्या शिफारसी केल्या जात आहेत. परंतु, २,००० रुपये प्रति किलो दराने मिळणाऱ्या संकरित बियाणांचा वापर करून ही पद्धत राबवणे आर्थिकदृष्ट्या अजिबात व्यवहार्य ठरणार नाही. त्यामुळेच, आपण साध्या आणि स्थानिक (देशी) वाणांच्या बियाणांचा विकास करण्यावर लक्ष केंद्रित करणे अत्यंत गरजेचे आहे. या संदर्भात आपण योग्य ते निर्देश द्यावेत आणि आम्हाला आवश्यक मार्गदर्शन करावे, अशी आम्ही विनंती करतो.

सरकारी अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची एक प्रत आम्ही यासोबत जोडत आहोत.

आपला नम्र
**विजय जावधिया**
शेतकरी संघटना (कार्यकर्ता)
९४२१७२७९९८

## गोवंश जगला पाहिजे

गोवंशाचे जतन, संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी तसेच गोतस्करी, गोवंशाची अवैध वाहतूक आणि बेकायदेशीर कत्तलखान्यांवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने नवीन मार्गदर्शक सूचना जरी केल्या असून सर्व नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांना त्यांच्या क्षेत्रातील अवैध कत्तलखाने शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संघटीतपणाने वारंवार गोतस्करी करणाऱ्या टोळ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे पोलिसांना देण्यात आले असून परिवहन विभागालाही गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी वाहनांची नियमित तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर हे आदेश देण्यात आले असले तरी याची अमलबजावणी कितपत होईल हे मात्र देवच जाणे. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू करून ११ वर्षे उलटली. २०२४ मध्ये राज्य सरकारने गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला. तरीही राज्यातील गोवंश हत्या कमी झालेल्या नाहीत. बकरी ईदच्या निमित्ताने राज्यात मोठ्या प्रमाणात गोवंश कापला जातो हे सत्य कुणीही नाकारू शकत नाही. कसायाच्या तावडीतून केवळ गोधन वाचवून चालणार नाही तर ते वाचवलेले गोधन जगवायची जबाबदारीही आपलीच आहे हे जाणून गोशाळांना शक्य तितके अर्थसाहाय्य प्रत्येकाने करायला हवे.

**जगन घाणेकर**

## आतंकवाद्यांचे कैवारी

नाशिक मधील टी.सी.एस आस्थापनातील धर्मांतराच्या प्रकरणातील प्रमुख आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजीनगर मधील ए. आय. एम. आय. एम चा नगरसेवक मतीन पटेल यांनी त्याच्या अनाधिकृत घरात आश्रय दिला होता. या प्रकरणी प्रशासनाने पटेल यांचे घर बुलडोझरने पाडले. यावर पक्षाचे नेते इम्तियाज जलील यांनी पाडलेले घर पुन्हा बांधू असे उद्धमपणे सांगत अवैध कृत्याला पाठिंबा दर्शवला. सर्वकाही आमच्या हातात आहे आम्ही म्हणू तो कायदा अशाच अविर्भावात ते बोलत होते. त्यांना ना कायद्याचे भय, ना कोणत्या कारवाईची भीती होती. थोडक्यात काय तर पटेल यांचे सगळे अपराध जलील यांनी पोटात घातले. जलील यांनी केलेल्या विधानाला राजकीय मतपेटीच्या राजकारणाचा तसेच धार्मिक ध्रुवीकरणाचाही दर्प आहे. एकीकडे सहानुभूती दाखवायची आणि तिच्या आडून मतांच्या राजकारणाचा धर्मद्वेषी डाव कसा आखायचा हे ए. आय. एम. आय. एम. पुरते जाणून आहे. प्रत्येक गुन्हेगाराला एखादा राजकीय पक्ष जर पाठीशी घालणार असेल तर देशातील न्याय व्यवस्थेला महत्त्वच राहणार नाही. सरकार याविषयी कठोर भूमिका कधी घेणार? आणखीन किती काळ हिंदूंना या धर्मविरोधी साखळीत अडकून राहावे लागणार? ए. आय. एम. आय. एम चे महाराष्ट्रातील वाढते सामर्थ्य आणि आक्रमक भूमिका पाहता हिंदूंसाठी ही धोक्याची घंटा आहे.

**लीना गाडगीळ**

## पेपर फुटीला सारेच घटक जबाबदार

नुकताच नीट परीक्षेचा पेपर फुटला. मुख्य म्हणजे याची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापासून ते राजस्थान, गुजरातपर्यंत पोहचली आहे. आतापर्यंत सुमारे पाच राज्यात हे लोण पसरले आहे. सीबीआयने तपास वेगाने सुरु केला असून त्याची व्याप्ती मोठी आहे. सध्या खाजगी शिकवणी वर्गाचे पेव फुटले आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थी महाविद्यालयात जात नाहीत. त्याऐवजी ते शिकवणीला जातात. साहजिकच महाविद्यालये नावालाच आहेत. पेपर सेट करणाऱ्या लोकांची सुद्धा भूमिका महत्वाची आहे. त्यांनीच पैशाच्या अमिषाच्या हेतूने व शिकवणी क्लास च्या मदतीने पेपर फोडण्याचे काम केले. यात क्लास चालकांची सहकार्याची भूमिका व पैसे कमावण्याचा धंदा सुरु केला

. एक क्लास चालकाने आपल्या मुलाला पेपर फोडून कारवाई केली. हे त्यांने केवळ मुलाला वैद्यकीय महाविद्यालय काढण्याच्या हेतूने केले असे समोर येत आहे. पेपर सेट करणारे पुण्यातील काही शिक्षकांनी यात हातभार लावून पेपर फोडीस सहकार्य केले. पेपर फुटीमुळे अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. सुमारे २२ लाख विद्यार्थी या परीक्षेला बसले होते.

सरकारने पेपर व्यवस्था अतिशय कडक करावयास हवी. पेपर सेट करणा-यांना पेपर फोडल्यास अतिशय कडक शिक्षेची तरतूद करणे आवश्यक आहे. पेपर सेट केल्यानंतर त्यांना परीक्षेपर्यंत बाहेर संपर्क करण्यास मनाई करावी.

या शिवाय शिक्षण तज्ज्ञांनी जे उपाय सुचविले आहेत ते सुद्धा अमलात आणावेत. आता या पेपर फुटीला जे जबाबदार असतील त्यांना कठोर शिक्षा करावी. देशातील केंद्र सरकारमधील शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा.

**शांताराम वाघ**

# महागावात शेतकऱ्यांचा 'हाहाकार मोर्चा'; जिल्हा प्रशासनाविरोधात संतापाचा उद्रेक!

## जगदीशभाऊ नरवाडे यांनी प्रशासनाला धरले धारेवर; पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांचा गळ्यात पोस्टर अडकवून निषेध

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**महागाव, दि. २२ : तालुक्यातील शेतकऱ्यांसह नागरिकांच्या प्रलंबित मागण्या आणि प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात महागाव येथे शेतकऱ्यांचा आणि महिलांचा अभूतपूर्व संतापाचा उद्रेक पाहायला मिळाला. 'जन आंदोलन आधार संघर्ष समिती'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'हाहाकार मोर्चात' संतप्त शेतकऱ्यांनी आणि महिलांनी जिल्हा प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. तळपत्या उन्हाची तमा न बाळगता हजारो नागरिक या मोर्चात सामील झाले होते.**



पिक विमा,अवैध दारू विक्री,खतांचा काळाबाजार, पाणंद रस्ते,घरकुल योजना यांसह विविध समस्या घेऊन जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीशभाऊ नरवाडे यांच्या नेतृत्वात शेतकरी,घरकुल लाभार्थी महिला यांनी हाहाकार मोर्चा काढत तहसील कार्यालयावर धडक दिली यावेळी नरवाडे यांनी आपल्या घणाघाती भाषणात जिल्हा प्रशासनावर सडकून टीका केली. "महागाव तालुक्यावर सतत अन्याय केला जात असून प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे," असा थेट आरोप त्यांनी केला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या निषेधाचे फलक गळ्यात अडकवून प्रशासनाचा तीव्र निषेध केला. तप्त उन्हातही महिला भगिनींचा वाढता सहभाग या मोर्चाचे मुख्य वैशिष्ट्य ठरले. यावेळी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना तातडीने आणि सरसकट पीक विमा मंजूर करण्यात यावा, बाजारात मिळणारे बोगस खत, बियाणे आणि औषधांची कृषी विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी,

'लाडकी बहीण' योजनेचा मोबदला महिलांना तत्काळ आणि विनाअडथळा मिळाला पाहिजे, तालुक्यात 'गाव तिथे दारूबंदी' लागू करा, घरकुल योजनांचे प्रश्न सोडवा, पांदण रस्ते तात्काळ तयार करा आणि कलगाव येथील स्मशानभूमीसाठी तातडीने रस्ता उपलब्ध करून द्या.या मागण्या प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या. यावेळी तहसीलदार गजानन पराते, गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम,पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड, तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी आपापल्या विभागाची निवेदने स्वीकारली. यावेळी या हाहाकार मोर्चात तालुक्यातील अनेक प्रमुख नेते आणि समाजसेवक खांद्याला खांदा लावून उतरले होते. यामध्ये जगदीश नरवाडे, नागोराव पाटील कदम, गोविंदराव देशमुख, संजय गरुड, मंगेश पाटील वानखेडे, स्वप्निल नरवाडे, आकाश चव्हाण अमोल चंदापुरे, अमोल वानखेडे, ओम कुसुंगवार, बापूराव देशमुख, दिलीप सुरोशे, केदार जोशी, दादाराव ठाकरे दिगंबर गाडबैले यांच्यासह , सुवर्णा देशमुख, देवकाबाई राठोड मेहजबिन पठाण यांच्यासह विविध गावांतील नागरिक, शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा जाहीर सभेतून देण्यात आला असून, या 'हाहाकार मोर्चा'ने प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत.

# आचारसंहिता लागू शहरात राजकीय बॅनर्स-होर्डिंग्ज कायम..?

## प्रशासनाची कारवाई कागदावरच? जिल्ह्यात आचारसंहिता लागू, तरी मुख्य चौकांमध्ये नियमांना हरताळ

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २२ :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून जिल्हा प्रशासनाने राजकीय पोस्टर्स, बॅनर्स आणि होर्डिंग्ज तात्काळ हटविण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी जारी केलेल्या पत्रकात शासकीय इमारती, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसरात कोणत्याही राजकीय पक्षाचे प्रचार साहित्य अथवा नेत्यांची छायाचित्रे प्रदर्शित न करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मात्र प्रत्यक्षात शहरातील अनेक मुख्य मार्ग, चौक आणि सार्वजनिक ठिकाणी राजकीय पक्ष, स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत विविध व्यक्तींचे मोठ्या प्रमाणात बॅनर्स व होर्डिंग्ज अद्यापही झळकत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रशासनाच्या आदेशानंतरही नगरपरिषद प्रशासन या कारवाई कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे का असा सवाल उपस्थित होत आहे.हे फलक कायम असल्याने आचारसंहितेची अंमलबजावणी नेमकी कितपत प्रभावी सुरू आहे,




असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे "महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विद्रूपीकरण प्रतिबंध अधिनियम" अंतर्गत अशा प्रकारच्या प्रचार साहित्यावर कारवाईची स्पष्ट तरतूद असताना संबंधित यंत्रणा अद्याप सक्रिय झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कारवाई निवडक पद्धतीने केली जात आहे का, अशीही चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शक होण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. आचारसंहिता जाहीर झाल्यानंतरही शहरात नियमबाह्य बॅनर्स आणि होर्डिंग्ज कायम असल्याने संबंधित विभागांनी तातडीने कारवाई करून सर्व फलक हटवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# एचएसआरपी नंबर प्लेटसाठी ३० जूनपर्यंत अंतिम मुदतवाढ

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २२ :** जिल्ह्यातील वाहनधारकांना वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसविण्यासाठी परिवहन विभागाकडून अंतिम मुदतवाढ देण्यात आली असून आता ३० जून २०२६ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यापूर्वी ही मुदत १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत होती. जिल्ह्यात एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी रोसमेर्टा सेफ्टी सिस्टिम लिमिटेड या एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. वाहनधारकांना ऑनलाइन बुकिंग करून त्यांच्या सोयीप्रमाणे वेळ निश्चित करता यावी यासाठी mhhsrp.com हे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. या पोर्टलवर नोंदणी करून अपॉइंटमेंट घेता येणार आहे. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल सूर्यवंशी यांनी वाहनधारकांनी विहित शुल्क भरून वेळेत एचएसआरपी प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन केले आहे. १ जुलै २०२६ नंतर एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## घटना-घडामोडी

### यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेचा कहर..!

**२४ मे ला रेड अलर्ट, प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचे आवाहन**

**पांढरकवडा :** भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या अंदाजानुसार



यवतमाळ जिल्ह्यात पुढील काही दिवस उष्णतेची तीव्र लाट राहण्याची शक्यता असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हवामान अंदाजानुसार २२ ते २३ मे दरम्यान ऑरेंज अलर्ट, २४ मे रोजी रेड अलर्ट तर २५ ते २६ मे दरम्यान पुन्हा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. वाढत्या तापमानामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सामान्य नागरिकांनी पुरेसे पाणी पिणे, दुपारी १२ ते ४ वाजेदरम्यान उन्हात बाहेर पडणे टाळणे, डोक्यावर टोपी किंवा रुमाल वापरणे तसेच लहान मुले,ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींची विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामगारांनी उन्हाच्या वेळेत काम टाळून सावलीत विश्रांती घ्यावी, ORS जवळ ठेवावा आणि उष्मघाताची लक्षणे दिसल्यास तात्काळ वैद्यकीय मदत घ्यावी, असे प्रशासनाने सांगितले आहे. पशुपालकांनी देखील जनावरांसाठी पाणी व सावलीची व्यवस्था करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांना "सावध रहा – सुरक्षित रहा – उष्णतेपासून बचाव करा" असा संदेश दिला असून आपत्कालीन परिस्थितीत १०७७ या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### पुसदमध्ये गुरुदेव सेवा मंडळाकडून 'ग्रामगीता' ग्रंथाचे मोफत वाटप

**पुसद :** घराघरांत 'ग्रामगीता' पोहोचावी आणि राष्ट्रसंत तुकडोजी



महाराज यांचे विचार समाजात रुजावेत, या उद्देशाने गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखा पुसदच्या वतीने गुरुवारी 'ग्रामगीता' ग्रंथाचे मोफत वाटप करण्यात आले. जिजामाता चौक, देशमुखनगर येथील साप्ताहिक सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थनास्थळी हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष प्रा. प्रकाश लामणे होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पणाने झाली. यावेळी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व राष्ट्रसंतांची खंजिरी भजने सादर करण्यात आली. त्यानंतर उपस्थित गुरुदेव अनुयायांना मान्यवरांच्या हस्ते 'ग्रामगीता'चे वाटप करण्यात आले. राष्ट्रीय कीर्तनकार भीमराव महाराज पवार यांनी 'सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मंडळाचे पदाधिकारी, महिला प्रतिनिधी व अनेक अनुयायी उपस्थित होते. आभार रमेश बोरकर यांनी मानले.

# मराठा सेवा संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**महागाव, दि. २२ :** मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार घेऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत असते.

यावर्षीही असाच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मातोश्री विद्यालय महागाव येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीच औचित्य साधून उत्साहात संपन्न झाला. या गुणगौरव सोहळ्याचे उद्घाटक व मार्गदर्शक महागाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री दत्तात्रय कदम, अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे,मार्गदर्शक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यशवंत देशमुख, प्रमुख पाहुणे काँग्रेस कमिटीचे माजी तालुकाध्यक्ष डॉ. अरुण पाटील, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष आशिष



गावंडे होते. या गुणगौरव सोहळ्याची सुरुवात राजमाता,राष्ट्रमाता, जिजाऊ व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब लिखित मराठा सेवा संघाने महाराष्ट्राला काय दिले? ही पुस्तिका देऊन करण्यात आले. यानंतर सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते महागाव तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२६ इयत्ता दहावी व बारावी मध्ये तालुक्यातून प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या व प्रत्येक शाळेतील पहिल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा घाटंजी येथे पात्र झालेल्या तीन विद्यार्थ्यांचा अशा एकूण १२५ गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा गौरवपत्र, मराठा सेवा संघाची शिवधर्म दिनदर्शिका, पुष्पगुच्छ व पेन देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. गटविकास अधिकारी श्री दत्तात्रय कदम यांनी विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या कर्तुत्वानुसार आपल्या जीवनाचे सार्थक करावे असे सांगितले तसेच मराठा सेवा संघाचा हा स्तुत्य उपक्रम असून सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक श्री यशवंत देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आत्मविश्वास बुलंद ठेवावा, येणाऱ्या आव्हानांना तोंड द्यावे तसेच छत्रपती संभाजी महाराजांचा कर्तृत्ववान वारसा जपावा असे सांगितले तसेच संस्कारामुळे आलेले श्रीमंती टिकून असते व संस्काराशिवाय आलेली श्रीमंती ही विकाऊ असते असे सांगितले. या गुणगौरव सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे,सहसचिव अमोल जगताप, तालुका अध्यक्ष उदयभाऊ नरवाडे,तालुका सचिव पंकज देशमुख,तालुका सदस्य चतुर्वेद अडकिने, स्वप्निल नरवाडे,तेजस नरवाडे, श्री अभ्यासिका व श्री कम्प्युटर चे संचालक मंगेश पाटील वानखेडे, शिक्षक अमोल शिंदे,रवी भांगे, विजय कदम,अंकुश शिंदे, किशोर सोळंके यांनी प्रयत्न केले.

# डिझेल टंचाईवरून शेतकरी संतप्त..!

## ४८ तासांत निर्णय न झाल्यास रास्ता रोकोचा इशारा

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**पुसद, दि. २२ :** खरीप हंगाम तोंडावर असताना पुसद तालुक्यात शेतकऱ्यांना ट्रॅक्टरच्या मशागतीसाठी कॅनमधून डिझेल मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. पेट्रोल पंप चालकांकडून "कलेक्टरांची परवानगी आणा" असे सांगत डिझेल नाकारले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटना व गोर सेनेने आक्रमक भूमिका घेत तहसीलदारामार्फत शासनाला निवेदन सादर केले. जिल्हाध्यक्ष मनीष जाधव व जय राठोड यांनी सांगितले की, अनेक गावांतील शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसह ५० किलोमीटरपर्यंत अंतर कापून पंपावर जावे लागते. डिझेलअभावी नांगरणी, वखरणी आणि मशागतीची



कामे ठप्प झाली असून पेरणी लांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना रात्री उशिरापर्यंत पंपांवर ताटकळत उभे राहावे लागत असल्याने त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याचा मुद्दा निवेदनात मांडण्यात आला. प्रशासनाने ४८ तासांत सर्व पेट्रोल पंपांना शेतकऱ्यांसाठी कॅनमधून डिझेल देण्याचे लेखी आदेश द्यावेत, अन्यथा तहसील कार्यालयावर बेमुदत आंदोलन व रास्ता रोको छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# दारव्हा पंचायत समितीच्या कारभारा विरोधात अर्धनग्र भंडारा आंदोलन तीव्र

## पोतराज बनलेले ईश्वर राठोड ठरले चर्चेचा विषय

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**दारव्हा, दि. २२ :** पंचायत समितीतील कथित अनागोंदी कारभार, भ्रष्टाचार आणि प्रभारी अधिकाऱ्यांच्या मनमानी विरोधात दारव्हा तालुक्यातील नागरिकांनी पंचायत समिती कार्यालयासमोर अर्धनग्न भंडारा आंदोलन करत तीव्र संताप व्यक्त केला. तालुक्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक या आंदोलनात सहभागी झाले होते.

आंदोलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथून करण्यात आली. मोर्चा बसस्थानक मार्गे गोळीबार चौकातून तहसील कार्यालयावर पोहोचला. यावेळी तहसीलदारांना विविध मागण्यांचे



निवेदनात प्रभारी गटविकास अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांच्या

निवेदन सादर करण्यात आले. त्यानंतर पंचायत समिती कार्यालयासमोर आंदोलन करत प्रशासनाकडून दुर्लक्षित तक्रारींचे लाऊड स्पीकरवर वाचन करण्यात आले. या आंदोलनाचे विशेष आकर्षण म्हणजे ईश्वर राठोड यांनी पोतराजाचा वेश धारण करून प्रशासनाविरोधात अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. हातात भंडारा घेऊन त्यांनी पंचायत समितीच्या कारभारावर जोरदार टीका केली. त्यांच्या या भूमिकेची तालुकाभर चर्चा रंगली. अनुपस्थितीमुळे रखडलेली कामे, मनरेगा योजनांतील कथित अनियमितता, वैयक्तिक सिंचन विहीर योजनेतील बोगस लाभार्थी, घरकुल योजनांतील त्रुटी, पशुसंवर्धन विभागातील आर्थिक पिळवणूक आणि स्वच्छ भारत अभियानातील गैरप्रकार यांसह अनेक गंभीर मुद्दे मांडण्यात आले. या प्रकरणी तातडीने कायमस्वरूपी अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, दोषींवर चौकशी करून कारवाई करावी, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आंदोलकांनी

# दिग्रस मध्ये बोगस बियाण्यांचा बाजार जोरात..!

## ४८ तासांत कारवाई नाही तर शिवसेना स्टाईल आंदोलनाचा इशारा

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. २२ :** खरीप हंगाम तोंडावर आलेला असताना दिग्रस तालुक्यात बोगस, निकृष्ट व मुदतबाह्य बियाण्यांच्या विक्रीचा सुळसुळाट झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेत तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करत ४८ तासांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, बाजारात अप्रमाणित कंपन्यांची बियाणे चढ्या दराने विकली जात असून त्यांची उगवण क्षमता अत्यंत कमी आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांवर



दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली असून एकरी ७ ते ८ हजार रुपयांपर्यंत आर्थिक फटका बसत आहे. तसेच महाडीबीटी पोर्टलअंतर्गत 'BBM-२०२५' योजनेत पात्र ठरलेल्या हजारो शेतकऱ्यांना अद्याप अनुदानित बियाणे मिळाले नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. कृषी विभागाकडून "साठा उपलब्ध नाही" असे कारण दिले जात असताना तेच बियाणे खासगी दुकानांमध्ये दुप्पट दराने उपलब्ध असल्याने शासन योजनांमध्ये काळाबाजार होत असल्याचा आरोप करण्यात आला. तालुक्यातील सर्व बियाणे विक्री केंद्रांची भरारी पथकांमार्फत तपासणी करून बोगस साठा जप्त करावा, दोषींवर गुन्हे दाखल करून परवाने रद्द करावेत, तसेच शेतकऱ्यांना पेरणीपूर्व बियाणे उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी तालुकाप्रमुख रविंद्र अरगडे यांनी "शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष झाल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन उभारू," असा इशारा दिला.

# "रस्ता सुरक्षा हीच जीवन सुरक्षा"

## यवतमाळमध्ये चालकांना वाहतूक नियमांचे धडे..

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २२ :** वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहन चालकां मध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी स्थानिक व्हेनेशियन हॉल येथे रस्ता सुरक्षा जनजागृती सेमिनारचे आयोजन करण्यात आले. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय व जिल्हा वाहतूक शाखा, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात सुमारे ३५० वाहन चालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे चालक, स्कूल बस चालक, खाजगी बस



३५० वाहन चालकांचा उत्स्फूर्त सहभाग

चालक तसेच रिक्षा चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल सूर्यवंशी यांनी केले. प्रमुख वक्ते किशन सिंह, सेव लाईफ फाउंडेशन, दिल्ली यांनी सुरक्षित वाहन चालविण्याचे नियम, मद्यपान करून वाहन चालविण्याचे दुष्परिणाम, हेल्मेट व सीट बेल्टचे महत्त्व तसेच वाहतूक नियमांचे पालन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी चित्रीकरणाच्या माध्यमातून वाहन चालकांना विविध बाबी प्रभावीपणे समजावून सांगितल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्वतःच्या अनुभवातून रस्ते अपघातांबाबत जागरूकता निर्माण केली. तर जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे डॉ. उमेश मडावी यांनी 'गोल्डन अवर्स'चे महत्त्व सांगत सीपीआरचे प्रात्यक्षिक सादर केले व आपत्कालीन क्रमांकांची माहिती दिली. पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांनीही रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.यावेळी उपस्थित चालकांनी "वाहतुकीचे नियम पाळू, वेगावर नियंत्रण ठेवू

# पाटण येथील सचिवावर गैरव्यवहाराचा आरोप

## ग्रामस्थांची गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार चौकशीची मागणी

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**झरी, दि. २२ :** पाटण ग्रामपंचायतीमध्ये सरपंच व सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर आणि प्रशासक नियुक्त होण्यापूर्वीच्या कालावधीत ग्रामपंचायत सचिवाने नियमबाह्य आर्थिक व्यवहार केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भात चंद्रशेखर बोनगिरवार यांनी सोमवारी १८ मे रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती झरी जामणी यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित कालावधीत कोणतीही लोकप्रतिनिधी संस्था अथवा प्रशासकीय मान्यता अस्तित्वात नसताना ग्रामपंचायत




**विविध कामांच्या नावाखाली ग्रामपंचायतीच्या खात्यातून**

**"माझ्यावर केलेले आरोप आकसापोटी केलेले असून सर्व आरोप बिनबुडाचे आहे. चौकशी अंती केलेले आरोप खरे की खोटे हे निष्पन्न होईलच."**

**- तुषार यमजलवार,**
**ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय पाटण.**

सचिवाने अंदाजे ३५ ते ४० लाख रुपयांचे आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच या व्यवहारांबाबत ग्रामस्थांना कोणतीही माहिती देण्यात आली नसून खर्चाशी संबंधित कागदपत्रे दाखविण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. शासनाच्या वित्तीय नियमांचे उल्लंघन करून निधीचा अपव्यय व भ्रष्टाचार झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करावी तसेच ग्रामपंचायतीच्या निधीची झालेली हानी संबंधितांकडून वसूल करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. दरम्यान, ही तक्रार गावाच्या हितासाठी व सार्वजनिक निधीच्या संरक्षणासाठी करण्यात आल्याचे तक्रारदार चंद्रशेखर बोनगिरवार यांनी म्हटले आहे.

# ‘स्थानिक स्वराज्य’चे बिगुल वाजताच नगरसेवकांची ‘खर्चा’वर चर्चा!

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा होताच राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे.मात्र,या निवडणुकीत नगरसेवकांमध्ये सध्या उमेदवारांच्या गुणवत्तेपेक्षा स्वतःला निवडणुकीत लागलेल्या ‘खर्चा’चीच चर्चा अधिक रंगताना दिसत आहे. ‘आम्हाला निवडून येण्यासाठी खूप मोठा खर्च लागला आहे,’ असे म्हणत अनेक लोकप्रतिनिधी आता या निवडणुकीच्या

## आता वसुली की गणिताची जुळवाजुळव




निमित्ताने आपली गणिते मांडताना दिसत आहेत.

खर्चाच्या ओझ्याखाली दबलेले लोकप्रतिनिधी महानगरपालिका असो वा नगरपालिका, गेल्या निवडणुकांमध्ये उमेदवारांना पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागला होता.अनेक नगरसेवकांनी आपली मालमत्ता गहाण ठेवून किंवा उसनवारी करून निवडणूक लढवली होती. आता स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक लागल्याने, हेच नगरसेवक आता मतदार म्हणून निर्णायक भूमिकेत आहेत.आपला तोटा भरून काढण्यासाठी किंवा पुढील राजकीय वाटचालीसाठी ही निवडणूक एक ‘संधी’ असल्याचे मत काही जण खासगीत व्यक्त करत आहेत.चर्चा नेमकी कशाची?शहरातील राजकीय कट्ट्यांवर आणि नगरसेवकांच्या विशेष बैठकांमध्ये सध्या एकच सूर उमटत आहे की, ‘आम्ही लोकांसाठी खर्च केला, आता आमचा विचार कोण करणार?’ निवडणुकीत लागणारा रसद, कार्यकर्त्यांचा फौजफाटा आणि मतदारांना दिलेली आश्वासने पूर्ण करताना झालेली दमछाक, याचा पाढाच जणू या चर्चेतून वाचला जात आहे. काही नगरसेवकांच्या मते, पक्षनिष्ठेपेक्षा प्रत्यक्ष मदतीचा हात देणाऱ्या उमेदवाराकडे त्यांचा कल राहण्याची शक्यता आहे.

**■ नगरसेवकांचा थाटच न्यारा;खर्चाचे आकडेही वाढले**

निवडणूक जाहीर होताच गल्लीतील नगरसेवक ‘टाईट कॉलर’ करून फिरणाऱ्या या लोकप्रतिनिधींच्या बोलण्या-चालण्यात आता मोठा फरक जाणवू लागला आहे.विशेष म्हणजे, मागील नगरपरिषद निवडणुकीत आपल्याला किती खर्च आला,याचे पाढे आता नगरसेवकांनी स्वतःहून वाचायला सुरुवात केली आहे. दिवसागणिक हा खर्चाचा आकडा फुगवून सांगितला जात असून, विधान परिषदेच्या रिंगणात उतरणाऱ्या इच्छुकांकडून आपली ‘किंमत’ वसूल करण्याची तयारीच जणू यामागे असल्याचे बोलले जात आहे.

## अत्याचार करणाऱ्या नराधमास शिक्षा

**अमरावती/का.प्र.**

सात वर्षांच्या अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला दर्यापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणाचा निकाल २० मे २०२६ रोजी देण्यात आला.

अजय धर्मा वानखडे उर्फ अजय बापूराव तेलगोटे (३३) असे शिक्षा झालेल्या नराधमाचे नाव आहे. रहिमापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत चार वर्षांपूर्वी ही घटना घडली होती. पीडित मुलगी तिच्या आजीकडे राहत होती. तिची आई त्यांना सोडून निघून गेली होती. वडिलांनी दुसरे लग्न केले होते. पीडित मुलीची आजी शेतमजुरी करून आपल्या नातीचा सांभाळ करत होती. घटनेच्या दिवशी पीडितेची आजी शेतात कामासाठी गेली होती. त्या वेळी अजय धर्मा वानखडे उर्फ अजय बापूराव तेलगोटे याने मुलीला बोलावून तिच्यावर अत्याचार केला. आजी घरी परतल्यावर पीडित मुलीने घडलेला सर्वप्रकार तिला सांगितला. त्यानंतर आजीने मुलीसह रहिमापूर पोलिस स्टेशन गाठले. तिने तक्रार दाखल केली.पोलिसांनी तातडीने तपास पूर्ण केला. त्यांनी आरोपीविरुध्द बलात्कार तसेच पोक्सो अंतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.न्यायालयात सरकारी पक्षाने ७साक्षीदार तपासले. सादर केलेले पुरावे आणि सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राहय धरून, दर्यापूर येथील जिल्हा न्यायाधीश (क्रमांक२) एम.आय. लोकवानी यांच्या न्यायालयाने आरोपीला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. १५ हजार रुपये दंडही ठोठावला. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे ॲड. सोनाली एस. क्षीरसागर यांनी काम पाहिले.

## ग्राहकांना पूर्वसूचना न देता देखभाल दुरूस्ती केल्यास होणार कारवाई

### वीज ग्राहकांचे फोन उचलणे, गणवेश परिधान करणे आणि मुख्यालयी राहणे बंधनकारक

**अमरावती/का.प्र.**

वीज ग्राहकांना दर्जेदार आणि जबाबदार सेवा देण्याच्या उद्देशाने मुख्यालयात राहत नसलेल्या, वीज ग्राहकांना पूर्वसूचना न देता वाहिनी देखभाल-दुरुस्तीची कामे करणाऱ्या, ग्राहकांचे फोन न उचलणाऱ्या तसेच गणवेश परिधान न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करा असे स्पष्ट आदेश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना दिले आहे.

सध्यास्थितीत ४५° पार गेलेल्या तापमानात तांत्रिक अडचणीमुळे आपात्कालिन खंडित होणार वीज पुरवठा व देखभाल दुरूस्तीसाठी बंद करण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्याच्या पार्श्वभूमिवर ग्राहकाभिमुखता वाढविण्यासाठी ही भूमिका घेण्यात आली आहे. अनेकदा नियोजित देखभाल-दुरुस्तीच्या कामांमुळे वीजपुरवठा खंडित होतो. मात्र, ग्राहकांना पूर्वकल्पना न दिल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी निर्माण होत असल्याने अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना कठोर निर्देश देण्यात आले आहेत.

विशेषतः, अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मुख्यालयात वास्तव्यास राहणे बंधनकारक असून आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे अपेक्षित आहे. मुख्यालयात राहत नसल्याने तक्रारींना विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. वीज ग्राहकांनी संपर्क साधल्यानंतर फोन न उचलणे किंवा प्रतिसाद न देणे ही गंभीर बाब मानण्यात येणार आहे. कामकाजादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निर्धारित गणवेश परिधान करणेही अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे ग्राहकांना संबंधित कर्मचाऱ्यांची ओळख पटण्यास मदत होणार आणि सेवेत पारदर्शकता वाढण्यास मदत मिळेल असा विश्वास व्यक्त करतांना मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी ग्राहकसेवेत कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असा स्पष्ट इशारा दिला आहे.

## जनगणनेच्या कामात प्रगणकांला हलगर्जीपणा भोवणार?

### तहसीलदारांची ‘कारणे दाखवा’ नोटीस

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

राष्ट्रीय जनगणनेच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या कामात हयगय व निष्काळजीपणा करणे एका प्रगणकाला चांगलेच महागात पडले आहे. जनगणनेच्या कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी तहसीलदार तथा जनगणना चार्ज अधिकारी यांनी प्रगणक सतीश बहादुरे यांना ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावली आहे. या कडक भूमिकेमुळे तालुक्यातील जनगणना कामात नियुक्त कर्मचाऱ्यांच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

जनगणना हा एक अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय उपक्रम आहे. या मोहिमेसाठी प्रशासनाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून प्रत्येक प्रगणकावर विशिष्ट जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तालुक्यातील सैदापुर, रत्नापुर येथे १९ मे रोजी प्रगणक म्हणून सतिश बहादुरे यांची नेमणूक करण्यात आली. मात्र सतीश बहादुरे यांनी आज रोजी प्रयत्न आपल्या वाट्याला आलेल्या कामात प्रचंड हलगर्जीपणा आणि हयगय केल्याची धक्कादायक बाब समोर आली. वरिष्ठ स्तरावरून वारंवार सूचना देऊनही कामात सुधारणा न झाल्याने अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

तहसीलदार तथा जनगणना चार्ज अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. जनगणनेच्या कामात अडथळा निर्माण करणे किंवा सोपवलेली जबाबदारी पार न पाडणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. या पार्श्वभूमीवर, संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध ‘जनगणना अधिनियम १९४८’ मधील कलम ५ आणि ११ नुसार कायदेशीर कारवाई का करण्यात येऊ नये? अशी विचारणा या नोटिशीद्वारे करण्यात आली आहे. ‘जनगणना हे केवळ शासकीय काम नसून तो एक राष्ट्रीय उपक्रम आहे. यात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. जर कोणत्याही कर्मचाऱ्याने कर्तव्यात कसूर केली, तर त्यांच्यावर कडक फौजदारी कारवाई करण्यात येईल,’ असा इशारा तहसीलदार तथा जनगणना चार्ज अधिकाऱ्यांनी दिला आहे.या कारवाईमुळे कामात टाळाटाळ करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून, आता तालुक्यातील जनगणनेच्या कामाला वेग येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## चांदूर रेल्वे शहरातून दुचाकी चोरी

चांदूर रेल्वे/वार्ताहर

शहरातील श्रीकृपा हॉस्पिटलजवळून होंडा शाइन दुचाकी भरदिवसा चोरून नेल्याची घटना रविवारी घडली. या प्रकरणी बुधवारी (ता. २०) चांदूर रेल्वे पोलिसांत अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेतील दोन संशयित चोरटे हॉस्पिटलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून त्यातील एका आरोपीचा चेहरा स्पष्ट दिसत असल्याने पोलिसांसमोर आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.फिर्यादी तनवीर अहमद खान अकील खान पठाण यांचे श्रीकृपा हॉस्पिटलजवळ आमीर ऑटो गॅरेज आहे. रविवारी (ता. १७) दुपारी सुमारे ३.४० वाजता त्यांनी त्यांची दुचाकी ( MH 27 BY 2859) गॅरेजजवळ उभी करून जेवणासाठी दुसरी गाडी घेऊन घरी गेले. त्या वेळी गॅरेजवर कोणीही उपस्थित नव्हते. काही वेळाने परत आल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे लक्षात आले. आजूबाजूच्या नागरिकांना व दवाखान्यातील कर्मचाऱ्यांना विचारपूस करूनही दुचाकीचा काहीच पत्ता लागला नाही. याबाबत बुधवारी चांदूर रेल्वे पोलिसांत तक्रार देण्यात आली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

## शकुंतला रेल्वेच्या पुनरुज्जीवनासाठी सर्वेक्षण अंतिम टप्प्यात

**दर्यापूर/वार्ताहर**

विदर्भातील ऐतिहासिक शकुंतला रेल्वेच्या पुनरुज्जीवनाच्या दृष्टीने मध्य रेल्वेकडून अंतिम लोकेशन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणामध्ये रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर, त्यासाठी लागणारी जमीन, खर्च, स्थानकांची संख्या तसेच भविष्यातील प्रवासी व मालवाहतुकीची क्षमता यांचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे.

नॅरोगेज रेल्वे ही ब्रॉडगेज होणे काळाची गरज सुमारे १८८ किलोमीटर लांबीचा हा मार्ग देशातील एकमेव खासगी रेल्वेमार्ग मानला जातो. विशेष मूर्तिजापूर ते यवतमाळ आणि यवतमाळ ते अचलपूर असा म्हणजे, स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनंतरही या रेल्वेचे मालकी हक्क ब्रिटिश कंपनी सीपीआरसीकडे असल्याची बाब चर्चेचा विषय ठरत आहे. रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात सरकारी, खासगी व वनजमिनींचा अभ्यास, डोंगराळ व जंगल भागातील अडचणी तसेच मार्गाच्या विकासासाठी लागणाऱ्या खर्चाचा अंदाज घेतला जाणार आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील ग्रामीण भागाला रेल्वे कनेक्टिव्हिटीचा मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यापूर्वी रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी शकुंतला रेल्वे मार्गाची पाहणी केली होती. महाराष्ट्र शासनानेही या प्रकल्पासाठी सहकार्याची भूमिका घेतल्याचे सांगितले जात आहे. मात्र, रेल्वे मार्गाच्या विकासासाठी



ब्रिटिश कंपनीकडून अधिकार विकत घेण्याची गरज भासू शकते, त्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढण्याची शक्यता आहे. अंतिम सर्वेक्षणाचा अहवाल रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात येणार असून, त्यानंतर प्रकल्प मूल्यांकन समितीकडून त्याची छाननी होईल. पुढे हा प्रस्ताव नीती आयोगाकडे मंजुरीसाठी पाठविला जाणार आहे. एकेकाळी पश्चिम विदर्भाची शान असलेली शकुंतला रेल्वे आज दुर्लक्षित अवस्थेत असली तरी, या प्रकल्पामुळे तिच्या पुनरुज्जीवनाच्या आशा पुन्हा निर्माण झाल्या आहेत.

### स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियानांतर्गत

## पर्यावरणपूरक सीड बॉल कार्यशाळा

### महानगरपालिकेचा पुढाकार;पर्यावरण संरक्षणाचा संदेश

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका यांच्या वतीने स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण संवर्धन आणि वृक्षलागवडीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पर्यावरणपूरक सीड बॉल तयार करण्याची विशेष कार्यशाळा शहीद स्मारक कस्तुरबा उद्यान, नेहरू मैदान, राजकमल चौक, अमरावती येथे उत्साहात आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला अधिकारी, कर्मचारी तसेच पर्यावरणप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेदरम्यान उपस्थितांनी प्रत्यक्ष सहभाग घेत माती, शेणखत आणि विविध वनस्पतींच्या बियांचा वापर करून सीड बॉल तयार केले. या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती होण्यास मदत होत असून,



नागरिकांमध्ये वृक्षलागवडीबाबत सकारात्मक भावना निर्माण होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. शहर हरित आणि स्वच्छ ठेवण्यासाठी वृक्षलागवड हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून, सीड बॉलसारखे उपक्रम लोकसहभाग वाढविण्यासाठी प्रभावी माध्यम ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेच्या माध्यमातून स्वच्छ भारत अभियान आणि माझी वसुंधरा अभियानाचा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड आणि संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी केले.कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, नितीन बोबडे, मनोज शहाळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, पशुशल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे, उपअभियंता श्रीरंग तायडे, अभियंता राजेश आगरकर, स्वच्छ भारत मिशन शहर समन्वयक श्वेता बोके, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक, स्वास्थ्य निरीक्षक, मनपा कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यशाळेत इंजि. हरिहर बोचरे, अध्यक्ष, वृक्ष संवर्धन फाऊंडेशन महाराष्ट्र, राजनंदिनी फाऊंडेशन, पर्यावरण मित्र मानेकर,रश्मी नावंदर तसेच निसर्गप्रेमी संतोष ठाकूर यांनी सहभाग घेऊन पर्यावरणीय कार्यात योगदान दिले.सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, उद्यान निरीक्षक श्रीकांत गिरी, महेश जोशी तसेच उद्यान विभागातील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### राजीव गांधी यांना मनपातर्फे अभिवादन



**अमरावती-**महानगरपालिकेमध्ये दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसा निमित्य दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा घेण्यात आली. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्य मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेस हारार्पण करुन विनम्र अभिवादन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, नगरसेवक बबलु शेखावत, मिलींद चिमोटे, नगरसेविका सुनिता भेले, ललिता रतावा, डॉ. अर्चना आत्राम, राजश्री जटाळे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मनोज भेले, सुरेश रतावा, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिवसानिमित्त शपथ कार्यक्रम

**अमरावती-**भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी २१ मे रोजी ‘दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस’साजरा केला जातो. यानिमित आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंदा दानेज यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची अधिकारी-कर्मचाऱ्यांना शपथ दिली. दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### धनराज बारबुध्दे यांची नियुक्ती

**कुऱ्हा-**अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची धामणगांव रेल्वे येथे झालेल्या बैठकी मध्ये जिल्हा कार्यकारिणीची नियुक्ती



पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहरराव सुने, यांच्या अध्यक्षतेखाली तर केद्रीय कार्याध्यक्ष युसुफखान, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कैलाशबापू देशमुख, सरचिटणीस राजेंद्र भुरे, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप जोशी, राष्ट्रीय चिटणीस अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे, राजीव शिवणकर जिल्हा अध्यक्ष संतोष वाघमारे आदी पत्रकार संघाच्या उपस्थितीत घेण्यात आली.बैठकी मध्ये गुरुकुंज (मोझरी) येथील गेल्या अनेक वर्षापासून, वृत्त प्रतिनिधी म्हणुन काम करणारे आणि पत्रकार संघटनेशी एकनिष्ठ असणारे धनराज दैलतराव बारबुध्दे यांची सर्वानुमते जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.या निवडी बद्दल अमरावती जिल्हा पूर्व आणि सर्व येणाऱ्या तालुक्यातील पत्रकार संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले असून अमरावती जिल्हा पूर्व मधील सर्व तालुक्याची बांधणी करिता यांचे कडून अपेक्षा पत्रकार संघटना करित आहे.

### रविराज देशमुख यांच्या उपस्थितीत बैठक

**नांदगाव खंडेश्वर -** भारतीय जनता पार्टीच्या नांदगाव खंडेश्वर शहर व ग्रामीणच्या वतीने आयोजित संघटनात्मक आढावा व मार्गदर्शन बैठक भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात झाली. यावेळी भाजपा अमरावती जिल्हा ग्रामीण प्रभारी अविनाशजी देव यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत संघटन मजबुती,बूथ सक्षमीकरण आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.बैठकीदरम्यान भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला. नांदगाव खंडेश्वर शहर व ग्रामीण भागातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथप्रमुख तसेच शक्ती केंद्रप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी धामणगाव रेल्वे विधानसभा प्रमुख रावसाहेब रोडे,जिल्हा सरचिटणीस सुमित पवार, जिल्हा कोषाध्यक्ष राम जोशी, देवानंद देशमुख, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अनिता तिखिले, राजेश पाठक, नगरसेवक संजय पोकळे, नगरसेवक अक्षय पारस्कर,नगरसेवक योगेश चव्हाले, तालुकाध्यक्ष निकेत ठाकरे, तालुकाध्यक्ष पंकज मेटे, शहराध्यक्ष रणजीत खंडाळकर, पारवे, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष छत्रपती ढेपे, अजगर पठाण, विशाल मेश्राम, वाल्मीक इंगळे, शालिना भगत, सुरेखा अडसपुरे, जगदीश नरखेडकर, दीपक तिखिले, शाम राऊत, अजय निर्मळ, भाऊराव भारसाकडे, अमोल इंगोले, विजय बिसने, दीपक लोकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### कुमकुम मोहोड हिचा सत्कार

**अमरावती -** चीनमधील शांघाय येथे नुकत्याच पार पडलेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-२ स्पर्धेत कुमकुम मोहोड हिने अप्रतिम व नेत्रदीपक कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण जागतीक स्तरावर प्रथम क्रमांक मिळवत तिने अमरावती शहरासह राज्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत आगामी सप्टेंबर २०२६ मध्ये जपान येथे होणाऱ्या एशियन गेम्ससाठी भारतीय संघात तिची निवड करण्यात आली आहे, तसेच यासाठी ती, स्पेन, टर्की, जपान या देशांमध्ये स्पर्धेकरिता जाणार आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल दि. गुजराती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुरेश राजा सर्व पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली देव तसेच शिक्षकवृंद यांनी कुमकुम मोहोड हिचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन जाहीर सत्कार केला तसेच तिचे वडील अनिल मोहोड व आई यांचाही सत्कार केला.

### मंगला वानखडे यांचे निधन

**कुऱ्हा/वार्ताहर**



आर्वी तालुक्यातील देऊरवाडा येथील जेष्ठ नागरिक तथा अंबिका देवी संस्थान कौंडण्यपूरचे विश्वस्त दिनेशराव यशवंतराव वानखडे यांच्या धर्मपत्नी मंगलाबाई दिनेशराव वानखडे यांचे वयाच्या ५६ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पती, दोन मुलं, स्नुषा, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व. मंगलाबाई वानखडे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली देण्यात आली.

# झुरळ झाले सरळ...




✍डॉ. प्रवीणकुमार राऊत

भारताचे युवक हे झुरळ आणि परजीवी आहेत असे उद्गार भारताच्या सर्वोच्च न्यायाल याचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी १५ मे २०२६ रोजी काढले. त्यावर अमेरिकेत गेलेल्या तीस वर्षाच्या भारतीय महाराष्ट्रीयन युवक अभिजित दीपके याने उपहास म्हणून सी जे पी म्हणजे कॉक्रोज जनता पार्टी ची स्थापना समाज माध्यमावर केली.अर्थात BJP बद्दलचा अप्रत्यक्ष असंतोष CJP या अर्थाने असावा असा अंदाज आहे. कारण AB नंतर ण हा इंग्रजी शब्द येतो.त्यामुळे नेक्स्ट म्हणजे पुढील असा प्रकार म्हणून CJP आहे. कॉक्रोज मध्ये ण येतो हे यातील संयोग आहे.

खरे तर C पासून चेंज असा प्रकार CJP निमित्ताने दिसून येत आहे. कारण अवघ्या सहा दिवसात जवळपास दीड कोटी फॉलोवर झपाट्याने कॉक्रोज जनता पार्टीचे निमित्ताने जुळले आणि भाजपच्या समाज माध्यमाच्या फॉलोवरला लगेच मागे टाकून रेकॉर्ड मोडल्या गेला.

समाज माध्यम हे युवा शक्तिंचे हस्तक आणि मस्तक दोन्ही आहे. आय.आय.टी. चे ज्ञान आणि तंत्रज्ञानाने उपलब्ध झालेली संसाधने याचा उपयोग युवापिढी झपाट्याने करून आपल्या विचाराचे मंथन कमी अधिक प्रमाणात करीत आहे.ज्या मंथनातून सरकार,व्यवस्था,यंत्रणा या बद्दलचा असंतोष झपाट्याने बाहेर येत आहे.

CJP चे वाढते चाहते बघून भारतीय मिडिया(गोदी) व समाज मिडिया यांनी दखल घेऊन संवाद सुरू तर केलेत.शिवाय मुलाखतीमधून सुद्धा देशाच्या परिस्थितीत 'झेन जी' ची क्रांती बीजरोपण करीत आहे असा इशारा सुद्धा विश्लेषक देत आहे.त्यामुळे धाकात असलेली राजकीय व्यवस्था समाज माध्यमांवर बंदी घालण्याचे घाट घालत आहे. सी जे. पी. चा जाहीरनामा प्रसिद्ध होताच समाज माध्यमाने एक्स खाते बंद करून टाकले. प्रत्येकाच्या मोबाईलवर सर्रास...'गद्दार से आझादी' हे वाक्य रिंगटोन म्हणून ऐकवत आहे.तसेच सुशिक्षित बेरोजगारीचे दडपण ठेऊन जगणारे युवाशक्तीचे प्रतिनिधी पद वाटप आणि सदस्य नोंदणी करीत आहे.

ज्यामध्ये वकील,स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे अनुभव संपन्न युवक मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहे.त्यांनी आज जमिनीवरचे सर्व नियोजन मांडले आहे.परिवर्तनाचे सर्व मार्ग गांधीपद्धतीने स्वीकारल्यामुळे अहिंसा परम धर्म असून,आंदोलन असो की संप किंवा बदल घडवून आणण्यासाठी कायदेभंग,असहकार सत्याग्रह अशा पद्धतीने नियोजन करण्याचे ठरले आहे.

'गांधी अभी जिंदा हैं' ही टॅग लाइन सुद्धा जागतिक स्तरावर दिसून येईल.कारण गांधी,नेहरू यांच्या माध्यमातून भारताने जागतिक पातळीवर जी मूलभूत ओळख निर्माण केली.त्याला अस्सल सोने आणि नकली पितळ याची तुलना करणारे प्रकार सुद्धा एक तप युवकांनी पाहिले. धर्म,पंथ,मंदिर,मस्जिद,सनातन अशा शब्दाने विछीन्न झालेली मानसिकता खऱ्या स्वातंत्र्याच्या मार्गाकडे वळली आहे.

झुरळ सरळ झाले की थांग लागू देत नाही. झुरळ का झालेत?याला कोण जबाबदार?अशा प्रश्नाला आता उत्तर देण्यात वेळ न घालवता झुरळ आता काय करतील याचा विचार सरकारला पडला म्हणून खाते बंदचे आदेश पारित झाले.मधमाश्यांचे पोळ, झुरळाची लोळ एकदा का उठली की सळो की पळो करतात .

'अब तो ये झाकी है, कहाणी अभी बाकी हैं'अशी नारेबाजी देत रस्त्यावर नीट(NEET) सांभाळता नाही आल्याने सुरू झालेली क्रांतीची चाहूल ओळखली;तर कळेल झुरळ सरळ झाल्याने काय होणार ते !!

भारताला नेपाळ करायचे नाही, असे आवाहन संस्थापक करीत असले तरी नेपाळने मंत्र्यांना बदडले ! मात्र राष्ट्रीय किंवा सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केले नाही.श्रीलंका असो की बांगलादेश असो तिथे ही नेत्या पुढाऱ्यांच्या भ्रष्टाचार व अत्याचार वर्तनाला चोख उत्तर दिले.त्यामुळे 'जैसे करणी तैसी भरणी' ही निसर्ग नियमांची दखल सी.जे. पी .नक्की घेणार आहे का?कारण जागतिक युद्धात भारताचा अप्रत्यक्ष समावेश करण्यासाठी भारतीय जनतेने 'हिंदू खतरे में, राम आएंगे,' हनुमान चालीसा कुंभमेळा, कावडयात्रा किंवा वारी,रथयात्रा या सारख्या उपक्रमात खर्च केलेली ऊर्जा जबाबदार आहे. असा निष्कर्ष अमेरिकेत अभ्यास आणि पत्रकारितेवर काम करण्यास गेलेल्या अभिजित दीपके या युवकाने भारतीय जनतेच्या लक्ष्यात आणून दिला.त्यामुळे सर्व झुरळ सरळ झाली आणि पार्टीत सामील झाली.सन्माननीय न्यायाधीश सूर्यकांत यांनी दिलेल्या उपमेने अपमान सहन करून उपहासाने तयार झालेल्या युवाशक्तीच्या मानसिकतेला आता कुणीच रोखू शकत नाही. निसर्गातील वाढते तापमान सुद्धा एका मोठ्या वादळाचे संकेत असतात.त्या वादळातून संतुलित व्यवस्थेचे प्रमाण समजून घेणारे तज्ज्ञ आपली शेती तयार करून ठेवतात.

झेन जी तीच शेती करणारी जमात गेल्या बारा वर्षात तयार झाली आणि झुरळाच्या निमित्ताने सरळ झाली.आता थांबणार नाही.असे किती तरी दीपके अभी जीत म्हणून प्रकाशमान होऊन या भारताचे शुद्धीकरण करण्यासाठी नव्या राजकारणामध्ये शिरकाव झाला आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री नवीन पिढीचे उदाहरण आहे.राहुल गांधी हे महात्मा गांधीचे राजकीय वारस आहे याची हळूहळू येणारी कबुली झुरळ सरळ होत असताना मिळत आहे.

भारत आशावादी आहे आणि तो जगाचे नेतृत्व करण्यासाठी सक्षम आहे.इथले राजकीय अडथळे जागतिक पातळीवरून सुटू शकतात याचे जिवंत उदाहरण म्हणून अमेरिकेमधून सी.जे.पी.ची स्थापना करून,सर्व भारतीय युवकांना अवघ्या काही तासात परिचय देऊन खदखद बाहेर काढण्याचा मार्ग झुरळ सरळ झाल्याने दिसत आहे.

सदस्य हीन्द सेवक संघ
मो.७७९८६४५५६५

# फुटक्या तुणतुण्याचे वाद



✍राजेंद्र पवार

काँग्रेस पक्षाचा राजकीय तमाशाचा फड देशातल्या जनतेने उखडून टाकला. या तमाशाच्या तंबूचे खांबही उखडून फेकले. सत्तेच्या कुरणात चरणारे या तमाशाचे सोंगाडे कलाकार निराश्रीत झाले. मासा जसा पाण्याशिवाय जगू शकत नाही तसे काँग्रेसवाले सत्तेशिवाय जगू शकत नाही हे वास्तव असल्यानेच आपल्या पक्षाची सत्ता गेल्याने पिसाळलेल्या राहुल गांधींना आपण काय बोलत आहोत याचे भान कधीच नसते. पंतप्रधान मोदी यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाला अर्वाच्य शिव्या द्यायच्या,राज्यघटना, लोकशाही धोक्यात आल्याचा शिमगा करायचा, हेच त्यांच्या भाषणाचे एकमेव सूत्र.

गेल्या तीन वर्षात यात काहीही बदल झालेला नाही. पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू या राज्यातल्या विधानसभा निवडणुकात संतप्त मतदारांनी त्यांच्या काँग्रेस पक्षाचा फाटका तुटका तंबू ब्रह्मपुत्रा आणि गंगेच्या प्रवाहात साफ बुडवून टाकला. 'काँग्रेसची अवस्था ढूंढते रह जाओगें' अशी झाली. केंद्रीय निवडणूक आयोग आणि मतचोरी यामुळे आपल्या पक्षाचा पराभव झाल्याचे फुटके तुणतुणे वाजवत ते देशभर भ्रमिष्ट अवस्थेत फिरत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नॉर्वे आणि इटलीसह युरोपिय देशात प्रचंड स्वागत झाले. तिथल्या जनतेने त्यांची प्रशंसा केली.आणि त्यामुळे राहुल गांधींचा पोटशूळ अधिकच वाढला. मोदी म्हणजे देशाचे, जनतेचे, लोकशाहीचे शत्रू असे आपण जगभर टाहो फोडून सांगत असतानाही परदेशातल्या जनतेला ते कसे समजत नाही, अशा भावनेने पिसाळलेले कुत्रे चावल्यासारखे राहुल गांधी पिसाटपणे धिंगाणा घालायला लागले आहेत. रायाबरेली या आपल्या मतदार संघातल्या तथाकथित स्वाभिमान सभेत मोदीसह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजप संघावर आगपाखड करताना त्यांनी थेट मोदी शहा, हे देश विकणारे गद्दार असल्याचे भोंगळ शब्द वापरले आणि आपली खरी लायकी काय आहे याचे दर्शन भारतीय जनतेला घडवले.

नॉर्वेची उथळ पत्रकार हेला लेंग हिने मोदींना उद्देशून काही प्रश्न विचारले तेव्हा मोदी आणि नॉर्वेचे पंतप्रधान जुना स्टोअर यांचे संयुक्त निवेदन संपले होते आणि तेव्हाच या भुरट्या, अपरिपक्व, भडोत्री पत्रकार मुलीने प्रश्न विचारले, तेही मोदी जाता जाता. या घटनेची जगभर चर्चा झाली. भारतातल्या पुरोगाम्यांना, डाव्यांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या तर राहुल गांधींना हर्षवायू झाला आणि त्या बेभान स्थितीत त्यांनी आपल्या शेलक्या भाषेत मोदी पळपुटे, घाबरणारे, उद्योगपतींचे भले करणारे, राज्यघटनेवर हल्ला करणारे, तडजोडवादी, शरण जाणारे या विशेषणाबरोबरच गद्दार अशा शब्दात त्यांची या असभ्य टीकेने मोदी आणि भारतीय जनता पक्षाचे काहीही नुकसान होणारे नाही.

उलट सवंग लोकप्रियतेला सोकावलेल्या राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षाची वाटचाल अधिक रसातळाकडे सुरू झाली आहे. काँग्रेस पक्षाचा पराभव म्हणजे राज्य घटनेवर हल्ला हे काही जनतेला पटले नाही आणि त्यामुळेच त्यांच्या पक्षाला जनतेने एकजुटीने मातीत घातले.


आता आपल्या पक्षाचे थडगे राहुल गांधी आपल्याच तोंडाळ तमाशाने बांधायच्या तयारीला लागले आहेत. लोकसभेत आणि लोकसभेबाहेर राजकीय सोंगाड्याचा वग अखंडपणे सुरू असतो. लोकांची फुकटची करमणूक होते.

सभेला जमलेले लोक टाळ्या वाजवतात आणि या सोंगाड्याला अधिकच चेव चढतो. पण लोकांच्या प्रतिक्रिया मात्र काय महामूर्ख आहे, अशीच असते, हे मात्र काँग्रेसच्या या तमाशाच्या फडाच्या मालकाला समजत नाही. तो अधिकच बेतालपणे शिव्या देत सुटतो आणि संपूर्ण भारतीय जनता आपल्या आणि आपल्या पक्षाच्या पाठीशी असल्याची दिवास्वप्ने पहात देशभर फिरतो. साध्य मात्र काहीही होत नाही.

त्याच्या भोवतीचे खूष मस्करे आणि सामाजिक माध्यमावरचे त्याचे चाहते त्यांच्या या अचरट भाषणांची स्तुती करतात आणि मग राहुल गांधी अधिकच अधिकच बेभान होतात, ते असे!

# प्रश्नपत्रिका गळती रोखण्यासाठी तंत्रज्ञान

"देशातील स्पर्धा आणि प्रवेश परीक्षांमधील प्रश्नपत्रिका गळतीची समस्या आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुरक्षित डिजिटल प्रणालींच्या मदतीने प्रभावीपणे रोखून अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था उभारण्याची गरज आहे."



✍डॉ. दीपक शिकारपूर

अलीकडेच राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेशी संबंधित प्रश्नपत्रिका गळतीच्या वादामुळे पुन्हा एकदा देशभरात संतापाची लाट निर्माण झाली. या घटनेने केवळ सुरक्षेतील त्रुटीच नव्हे तर व्यवस्थेतील जुनी आणि कमकुवत पद्धतीही उघड केल्या. आजच्या डिजिटल युगात ही समस्या थांबवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान प्रभावी उपाय देऊ शकते. योग्य नियोजन, कठोर अंमलबजावणी आणि पारदर्शक तंत्रप्रणाली यांचा वापर केल्यास प्रश्नपत्रिका गळती जवळजवळ अशक्य बनवता येऊ शकते.

पूर्वी प्रश्नपत्रिका छपाई, वाहतूक आणि वितरण या टप्प्यांमध्ये मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात असे. त्यामुळे माहिती बाहेर जाण्याची शक्यता वाढत असे. आता संगणकी कोडिंग तंत्रामुळे प्रश्नपत्रिका पूर्णपणे गुप्त स्वरूपात ठेवता येते. प्रश्नपत्रिका तयार होताच ती अत्यंत सुरक्षित संकेतांमध्ये रूपांतरित केली जाते. योग्य अधिकृत परवानगीशिवाय ती उघडता येत नाही. त्यामुळे मधल्या टप्प्यातील चोरी किंवा प्रतिकृती बनवणे थांबू शकते. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून संशयास्पद हालचाली ओळखता येतात. कोणत्या अधिकाऱ्याने कोणत्या वेळी प्रश्नपत्रिकेची फाईल उघडली, किती वेळ पाहिली किंवा ती इतरत्र पाठवण्याचा प्रयत्न केला यावर सतत नजर ठेवता येते. अचानक अनियमित हालचाल दिसल्यास प्रणाली त्वरित इशारा देते. त्यामुळे गुन्हा घडण्यापूर्वीच त्याला रोखण्याची संधी मिळते.

प्रश्नपत्रिका वितरणासाठी जैविक ओळख प्रणाली देखील महत्त्वाची ठरू शकते. केवळ अधिकृत व्यक्तीचा बोटांचा ठसा किंवा डोळ्यांची ओळख पटल्याशिवाय प्रश्नपत्रिका उघडली जाणार नाही, अशी व्यवस्था तयार करता येते. त्यामुळे बनावट ओळखपत्रे किंवा खोट्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून होणारे गैरप्रकार कमी होतील. अनेक तज्ज्ञांच्या मते, परीक्षा सुरू होण्याच्या काही मिनिटांपूर्वीच प्रश्नपत्रिका केंद्रावर डिजिटल पद्धतीने पोहोचवण्याची प्रणाली अधिक सुरक्षित आहे. यामध्ये देशभरातील केंद्रांना एकाच वेळी प्रश्नपत्रिका पाठवली जाते. त्यामुळे वाहतूक, साठवणूक आणि वितरणातील धोके कमी होतात. प्रत्येक केंद्रावर विशेष संकेताशिवाय प्रश्नपत्रिका उघडताच येणार नाही अशी यंत्रणा असू शकते.

तंत्रज्ञानाबरोबरच नैतिकता आणि जबाबदारीदेखील महत्त्वाची आहे. केवळ संगणक प्रणाली बसवून समस्या सुटत नाही. परीक्षा प्रक्रियेशी संबंधित अधिकारी, शिक्षक आणि कर्मचारी यांना प्रामाणिकपणा आणि डिजिटल सुरक्षा यांचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. कठोर कायदे, त्वरित शिक्षा आणि पारदर्शक चौकशी यामुळेही गुन्हेगारांना आळा बसेल.

भविष्यात परीक्षा व्यवस्थेमध्ये आणखी प्रगत तंत्रज्ञान वापरले जाईल. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वेगवेगळ्या क्रमाने प्रश्न तयार करणारी बुद्धिमान प्रणाली विकसित होऊ शकते. त्यामुळे एकाच प्रश्नपत्रिकेची चोरी करून संपूर्ण परीक्षा बिघडवणे कठीण होईल. आवाज, चेहरा आणि वर्तन ओळखणाऱ्या प्रणालींद्वारे परीक्षा केंद्रांवरील संशयास्पद हालचाली त्वरित पकडल्या जातील. भविष्यात सुरक्षित राष्ट्रीय परीक्षा जाळे उभारले जाऊ शकते, जिथे सर्व परीक्षा केंद्रे थेट नियंत्रित केली जातील. शिक्षण व्यवस्थेला तंत्रज्ञानाची मजबूत जोड दिली तर प्रश्नपत्रिका गळतीसारखे प्रकार इतिहासजमा होतील आणि गुणवत्तेला खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुरक्षित डिजिटल प्रणाली यांच्या सहाय्याने भारत अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि न्याय्य परीक्षा व्यवस्था निर्माण करू शकतो. विद्यार्थ्यांचा विश्वास जपणे हीच खरी शिक्षण व्यवस्थेची सर्वात मोठी जबाबदारी आहे.

# कॉंग्रेसच्या घसरगुंडीचा अन्वयार्थ !



✍अभय गोखले

नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत, केरळचा अपवाद वगळता इतर चार राज्यांत कॉंग्रेसची कामगिरी अतिशय निराशाजनक झाली आहे.केरळमध्ये कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीने,मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीचा पराभव करुन तेथील सत्ता काबीज केली,ही जमेची बाजू.पश्चिम बंगाल मध्ये १९७७ पर्यंत, कॉंग्रेस सत्तेवर होती त्यावर्षी झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीने कॉंग्रेसचा पराभव करून तेथील सत्ता काबीज केली आणि त्यानंतर राज्यात कॉंग्रेसची इतकी घसरगुंडी झाली की,याखेपेच्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला पश्चिम बंगालमध्ये फक्त दोन जागांवर विजय मिळाला आहे.२०२१मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तर कॉंग्रेसला आपले खात उघडता आले नव्हते.१९९८ साली ममता बॅनर्जी यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून जेंव्हा तृणमूल कॉंग्रेस या पक्षाची स्थापना केली,त्यानंतर राज्यात कॉंग्रेस पक्षाच्या घसरगुंडीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.पश्चिम बंगालच्या राजकीय क्षितिजावर भाजपाचा उदय झाल्यानंतर कॉंग्रेसचे बरेच कार्यकर्ते पक्षाचा त्याग करून भाजपात सामील झाले आणि त्यामुळे कॉंग्रेस राज्यात आणखीनच कमकुवत झाली.आता तर कॉंग्रेसचे पश्चिम बंगाल मधील अस्तित्व नगण्य असेच आहे.

आसाम विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला फक्त १९ जागांवर विजय मिळाला आहे.गेल्या खेपेस कॉंग्रेसला २९ जागा मिळाल्या होत्या.याचा अर्थ आसाममध्ये दिवसेंदिवस कॉंग्रेसची अधोगती होत चालली आहे.२०१६ पर्यंत आसाम हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला होता.आसाम गण परिषदेच्या नेतृत्वाखालील सरकारचा अपवाद वगळता आसाममध्ये सातत्याने कॉंग्रेसच सत्तेवर होती.मात्र २०१६ मध्ये झालेल्या आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपाने कॉंग्रेसचा पराभव केल्यानंतर, कॉंग्रेसची राज्यात जी अधोगती सुरू झाली ती अद्याप थांबलेली नाही.२०२१ आणि २०२६ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला पराभव पत्करावा लागला आणि अशाप्रकारे कॉंग्रेसने आसाममध्ये पराभवाची हॅटट्रिक पूर्ण केली.

नुकत्याच पार पडलेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत, द्रमुक बरोबर आघाडी असतानाही कॉंग्रेसची कामगिरी अतिशय निराशाजनक झाली आहे. १९६७ मध्ये झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी कॉंग्रेसचा पराभव करून, द्रमुकने तेथील सत्ता काबीज केल्यानंतर, कॉंग्रेसची राज्यात जी घसरगुंडी सुरू झाली ती अद्याप थांबलेली नाही.त्यानंतर कॉंग्रेसने राज्यात,कधी द्रमुक बरोबर तर कधी अण्णा द्रमुक बरोबर आघाडी करुन निवडणुक लढवल्याने कॉंग्रेसची राज्यात वाढ होऊ शकली नाही.या खेपेच्या निवडणुकीत तर कॉंग्रेसला फक्त पाच जागांवर विजय मिळाला आहे.द्रमुक बरोबर आघाडी करुन निवडणुक लढवल्यानंतर, कॉंग्रेसने, द्रमुकची साथ सोडून,सिनेस्टार विजय याच्या टीव्हीके या पक्षाबरोबर जाण्याचा निर्णय घेतला आणि द्रमुकची नाराजी ओढवून घेतली. कॉंग्रेसच्या या धरसोड वृत्तीमुळे भविष्य काळात कॉंग्रेसचे राज्यात नुकसान होण्याची दाट शक्यता आहे.

उत्तरप्रदेश या देशातील सर्वात मोठ्या राज्यात १९८९ सालापर्यंत कॉंग्रेसची सत्ता होती.मात्र त्यावर्षी समाजवादी पक्षाकडून पक्षाचा पराभव झाल्यानंतर गेल्या ३७ वर्षांत कॉंग्रेस तेथे सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही.१९८९ नंतर २०१७ पर्यंत सपा,बसपा आणि भाजपा हे पक्ष उत्तरप्रदेशात आलटून पालटून सत्तेवर आले.या काळात कॉंग्रेसचा जनाधार मोठ्या प्रमाणात वरील तीन पक्षांकडे सरकला.२०१७ नंतर आजवर, राज्यात भाजपा सत्तेवर असून,पक्ष मजबूत अवस्थेत आहे.कॉंग्रेसला मात्र उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत आपले दहा आमदार निवडून आणण्यासाठी झगडावे लागत आहे.आता बिहारचे उदाहरण घेऊया.बिहारमध्ये १९९० च्या आसपास तेथील सत्ता कॉंग्रेसच्या हातून निसटली.१९६७ साली काही काळ सत्तेवर आलेल्या संयुक्त विधायक दल सरकारचा अपवाद वगळता,बिहारची सत्ता सातत्याने कॉंग्रेसच्या हातात होती

मात्र लालूप्रसाद यादव, नितीशकुमार आणि रामविलास पासवान या त्रयीचा बिहारच्या राजकीय क्षितिजावर उदय झाल्यानंतर कॉंग्रेसच्या हातून राज्याची सत्ता गेली ती कायमचीच.त्यात पुन्हा कॉंग्रेसने सदैव लालूप्रसाद यादव यांच्या सावलीत रहाण्याचा चुकीचा निर्णय घेतल्याने राज्यात कॉंग्रेसची वाढ खुंटली.२०२५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला दहाचा आकडा सुद्धा गाठता आला नाही. २००३ पर्यंत मध्यप्रदेश हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला होता.मात्र त्यानंतर राज्यात कॉंग्रेसची इतकी वाताहत झाली की आता मध्यप्रदेश हा भाजपाचा अभेद्य किल्ला झाला आहे.गुजरातमध्ये १९९५ पर्यंत कॉंग्रेस, सातत्याने सत्तेवर होती. त्यानंतर भाजपाने गुजरातमध्ये आपली स्थिती इतकी मजबूत केली की आता राज्यात कॉंग्रेससमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.२०२२मध्ये झालेल्या गुजरात विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला केवळ १६ जागांवर विजय मिळाला होता.यावरून गुजरातमध्ये कॉंग्रेसची किती वेगाने घसरगुंडी होत आहे,याची कल्पना आपल्याला येईल.आंध्रप्रदेश हा कॉंग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला होता.२००८ साली कॉंग्रेस पक्षाचे आंध्रप्रदेश विधानसभेत १८५ आमदार होते.मात्र आंध्रप्रदेशचे विभाजन झाल्यानंतर, राज्यात कॉंग्रेसला उतरती कळा लागली.२०२४ मध्ये झालेल्या आंध्रप्रदेश विधानसभा निवडणुकीत राज्यात कॉंग्रेसचा सुपडा साफ झाला. ओडिशात २००० च्या अगोदर कॉंग्रेस सातत्याने सत्तेवर होती.मात्र नविन पटनायक यांच्या नेतृत्वाखालील बिजू जनता दलाकडून कॉंग्रेस, पराभूत झाल्यानंतर राज्यात कॉंग्रेसची इतकी घसरगुंडी झाली की भाजपानेही त्यांना मागे टाकले.२०२४ च्या ओडिशा विधानसभा निवडणुकीत भाजपा तेथे सत्तेवर आली आणि राज्यात कॉंग्रेस, तिसऱ्या स्थानावर फेकली गेली.

२००८ सालापासून कॉंग्रेसच्या देशभरातील संख्याबळाचा विचार करता देशात पक्षाचे १२०४ आमदार होते.२०२६ मध्ये ही संख्या ६७६ वर आली आहे.केरळमध्ये कॉंग्रेसचा विजय झाला, ही गोष्ट खरी असली तरी कॉंग्रेसच्या ताब्यात आजघडीला केरळ सकट फक्त चार राज्ये आहेत.कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश ही ती राज्ये आहेत.या पैकी कर्नाटक, तेलंगणा आणि केरळ ही दक्षिणेकडील राज्ये आहेत.त्यामुळे एका अर्थी कॉंग्रेस हा पक्ष आता दक्षिणेकडील राज्यांतील पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.त्याला अपवाद फक्त हिमाचल प्रदेशचा आहे.मात्र हे राज्य अतिशय छोटे आहे.२००८ मध्ये कॉंग्रेस आमदारांची देशपातळीवर जी संख्या होती ती हळूहळू कमी होत गेली.२००८ च्या तुलनेत २०२६ मध्ये कॉंग्रेस आमदारांची संख्या ४४ टक्क्यांनी घटली आहे.त्या तुलनेत भाजपा आमदारांची संख्या संबंधित काळात १०१ टक्क्यांनी वाढलेली दिसत आहे.२००८ मध्ये भाजपा आमदारांची देशपातळीवरील संख्या ८८९ इतकी होती.ती प्रचंड प्रमाणात वाढून २०२६ मध्ये १७८७ इतकी झाली.ही सर्व आकडेवारी लक्षात घेतली तर देशात कॉंग्रेसची किती झपाट्याने अधोगती होत आहे ही गोष्ट प्रकर्षाने आपल्या लक्षात येईल. देशभरात प्रादेशिक पक्षांची पिछेहाट होत असताना, इंडिया आघाडीचे नेतृत्व करणाऱ्या, कॉंग्रेसची ही दारूण अवस्था चिंताजनक म्हणावी लागेल.



# आंदोलनाचा करंट बसताच प्रशासन खडबडून जागे

## सावरगावला नवीन रोहित्र; निलेश कापकर यांच्या प्रयत्नांना यश

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील सावरगाव आणि पहाडसिंगी गावांतील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या वीज समस्यांवर अखेर प्रशासनाला झुकावे लागले. सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेल्या आक्रमक आंदोलनानंतर प्रशासनाने तत्काळ निर्णय घेत सावरगाव येथे नवीन रोहित्र मंजूर केले, तर पहाडसिंगी गावातील घरांवरून गेलेल्या धोकादायक विद्युत तारा हटविण्याच्या कामालाही सुरुवात झाली आहे.

सावरगाव येथे गेल्या दहा वर्षांपासून कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त होते. शेतकरी, व्यापारी आणि घरगुती ग्राहकांना याचा मोठा फटका बसत होता. दुसरीकडे पहाडसिंगी गावात घरांच्या छतांवरून गेलेल्या विद्युत तारांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. ग्रामस्थांनी अनेकदा महावितरण विभागाकडे तक्रारी करूनही समस्या जैसे थेच होती.

अखेर ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्याकडे धाव घेतली. कापकर यांनी महावितरण विभागाला निवेदन देत समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली होती. तसेच २२ मे रोजी आंदोलनाचा इशाराही दिला होता. मात्र प्रशासनाने गांभीर्याने दखल न घेतल्याने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ग्रामस्थांनी घोषणाबाजी करत जोरदार आंदोलन छेडले.

आंदोलनाची धार पाहता प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. सावरगावसाठी नवीन रोहित्र मंजूर करण्यात आले असून प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. तसेच पहाडसिंगी गावातील धोकादायक विद्युत तारा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे दोन्ही गावांतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

### ग्रामस्थांची एकजूट ठरली निर्णायक

रामेश्वर सावंत, दिगांबर शिंदे, काशीराम आडे, शंकर जाधव, सागर लाड, गोपाल बोरकर, राहुल पायघन, देविदास चोंढकर, अमोल राठोड, रामधन जाधव, समाधान राठोड, सचिन जाधव, श्रीचंद पवार, सरपंच प्रवेश सरकटे, गजानन सरकटे, दामोदर राठोड, पांडुरंग चव्हाण, धोंडू चव्हाण, विठ्ठल जाधव, नेमिचंद चव्हाण, संतोष चव्हाण, विनोद चव्हाण, जयसिंग राठोड, पंजाब राठोड, मुलचंद राठोड, मुलचंद सवाई राठोड, दामोदर पवार, मिलिंद सरकटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ आंदोलनात सहभागी झाले होते.

**Change In Name**

I have Changed
My Name Form
**ILIYAS KHA**
**YUSUF KHA**
-TO-
**ILIYAS KHAN**
**YUSUF KHAN**
My residential Address in
Nawab pura, Old City,
Akola 444001.

## विद्यार्थ्यांचा होत आहे सर्वांगीण विकास

**अकोला :** आधुनिक काळाचा विचार करता देव देश धर्म संस्कृती व साधुसंताच्या विचाराकडे दुर्लक्ष करुन तरुण पिढी दुर्व्यसनात्त्या आहारी जाऊन आपल आयुष्य मातीमोल करत आहेत.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**मध्यवर्ती भांडार विभाग**

**निविदा सुचना क्रं. ०१ (सन २०२६-२७)**

अकोला महानगरपालिकेच्या नगर सचिव विभागाकरिता सर्व साधारण सभा आणि स्थायी समिती सभेचे थेट प्रक्षेपणसाठीच्या यादी प्रमाणे उच्च दर्जाचे व्हिडिओ कॅमेरा, फोटो कॅमेरा व ईतर साहित्य खरेदी करून पुरवठा करणेबाबतचे दरपत्रके बोलविण्यात येत असून या बाबतची सविस्तर माहिती खाली दिलेल्या अकोला महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर आणि मध्यवर्ती भांडार विभाग, मनपा मुख्य कार्यालय येथे उपलब्ध असून इच्छुकांनी सदर संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**उपायुक्त (विकास)**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/मभावि/ २५/२०२६,
मध्यवर्ती भांडार विभाग अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २२/०५/२०२६

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पाचशे रुपयांसाठी अठरा एकर शेती जाळली

## - संत्रा, सिताफळ बागांसह लाखोंचे नुकसान
## - दारूसाठी घेतली सुपारी? आरोपी अटकेत



■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

अवघ्या पाचशे रुपयांच्या लालसेपोटी अठरा एकर शेतीला आग लावल्याची धक्कादायक घटना हिवरखेड परिसरात उघडकीस आली आहे. या आगीत संत्रा व सिताफळ बागांसह बांबू, ड्रिप, गोठा आणि इतर साहित्य जळून खाक झाले असून सुमारे दहा लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी हिवरखेड पोलिसांनी आरोपी रमेश मंगल कासदेकर (रा. नवी तलई, ता. तेल्हारा) याला अटक केली आहे.

हिवरखेड येथील प्रयोगशील शेतकरी मुकुंद पुरुषोत्तम अग्रवाल उर्फ पंकज अग्रवाल यांची चिचारी शिवारात, चंदनपुरलगत गट क्रमांक १९/ब, १९/क व १९/ड मध्ये १८ एकर शेती आहे. या शेतात संत्रा, सिताफळ तसेच विविध प्रकारची झाडे असून बांबूची लागवडही करण्यात आली होती. गुरुवारी (दि. २१) दुपारी शेर खान नूर खान यांनी अग्रवाल यांना फोन करून शेतातील बांबू आणि पालापाचोळ्याला एका व्यक्तीने माचिसने आग लावल्याचे सांगितले. संशयिताला पाहताच तो नवी तलईकडे पळून गेल्याची माहितीही त्यांनी दिली.

अग्रवाल यांनी घटनास्थळी धाव घेतली असता मोठ्या प्रमाणात आग लागल्याचे दिसून आले. या आगीत शेकडो संत्रा व सिताफळ झाडे, सुमारे ३५०० बांबू, गोठा, खताची ३० पोती, ड्रिपच्या ३० बंडल नळ्या, स्प्रिंकलरचे ४५ पाइप व १८ पितळी नोजल, चंदन, सागवान, निलगिरीची झाडे तसेच उच्च प्रजातीच्या आंब्याची ६० ते ७० झाडे जळून खाक झाली. कुंपण व झटका मशीनचेही मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच पत्रकार सुरज चौबे यांनी हिवरखेड पोलिसांना कळविले.

### ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला

आग भीषण स्वरूप धारण करत असताना पंकज अग्रवाल, शेर खान नूर खान, अब्दुल कलाम, रामधन अग्रवाल, सुरज चौबे, धिरज बजाज, गणेश पानेरकर, सुरेश मोरे यांच्यासह चिचारी व चंदनपुर येथील ग्रामस्थांनी आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. जेसीबीच्या साहाय्याने दोन्ही बाजूंनी पालापाचोळा हटविण्यात आल्याने आग गावाच्या दिशेने पसरण्यापासून रोखण्यात यश आले.

ठाणेदार गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी रमेश कासदेकर याला ताब्यात घेतले.

पोलिस चौकशीत आरोपीने एका अनोळखी व्यक्तीने ५०० रुपये देऊन आग लावण्यास सांगितल्याचा दावा केला. आग लावल्यानंतर त्या पैशातून दारू प्यायलो, अशी कबुलीही त्याने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पैसे देणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू असून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२६ (फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महसूल व कृषी विभागाकडून पंचनामा

घटनेनंतर दुसऱ्या दिवशी महसूल व कृषी विभागाने संयुक्त पंचनामा केला. तलाठी किशोर गायकी, मंडळ अधिकारी झापे तसेच कृषी विभागाचे अधिकारी यांनी शेताला भेट देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीची मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

### महावितरणचे सहकार्य ठरले निर्णायक

आग लागली त्यावेळी परिसरात भारनियमन सुरू होते. मात्र, आग चिचारी व चंदनपुर गावांपर्यंत पोहोचण्याचा धोका लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते धिरज बजाज यांनी महावितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यानंतर कार्यकारी अभियंता संजय कुटे, सहाय्यक अभियंता आशिष धांडे, लाईनमन उमेश जावकार, ऑपरेटर सुदाम भगत, सागर काळे व इतर कर्मचाऱ्यांनी तातडीने दोन वेळेस वीजपुरवठा सुरू करून आग विझविण्यास मदत केली.

# गोवंश चोरी उघड; पाठलाग करून आरोपी जेरबंद

## दहीहंडा पोलिसांची धडक कारवाई; गोवंशासह वाहन जप्त

■ प्रतिनिधी | अकोट ■

दहीहंडा पोलीस ठाणे हद्दीत गोवंश चोरीच्या घटनेचा पोलिसांनी अवघ्या काही तासांत छडा लावत चोरीस गेलेल्या गोवंशाची सुटका केली. आरोपींच्या वाहनाचा पाठलाग करत पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून, अन्य तिघे अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

ही घटना १६ मे रोजी पहाटे २.३० ते ३.३० वाजताच्या सुमारास घडली. गोपाळखेड येथील आशिष विजय वानखडे (वय २५) यांचा अंदाजे ४० हजार रुपये किमतीचा पांढऱ्या रंगाचा गोरा काही आरोपींनी एमएच ०५ बीजे ९१२९ क्रमांकाच्या चारचाकी वाहनात टाकून चोरून नेला होता. घटनेनंतर फिर्यादीचा भाऊ व मित्रांनी संशयित वाहनाचा पाठलाग सुरू केला. दरम्यान, त्यांना सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील व पोलीस पथक भेटले. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर पथकाने संशयित वाहनाचा वेगाने पाठलाग केला.

अकोट फाईल परिसरातील एका गल्लीत आरोपींच्या वाहनाचे टायर पंचर झाल्याने वाहन थांबले. त्यानंतर आरोपींनी वाहन सोडून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत एका आरोपीला ताब्यात घेतले, तर इतर तिघे पसार झाले. पोलिसांनी वाहनातील गोवंशाची सुखरूप सुटका करत टाटा झेस्ट कारसह अंदाजे १ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दहीहंडा पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बीट अमलदार सपोनि गोपाल ढोरे करीत आहेत.

या धडक कारवाईमुळे गोवंश चोरी व तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## जीपीए ने केला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अकोला :** वैद्यकीय सेवेत असणाऱ्या जनरल प्रॅक्टिशनर असो.च्या वतीने दहावी, बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. गोरक्षण रोड येथील जीपीए सभागृहात संपन्न झालेल्या या गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमात जीपीएचे संस्थापक डॉ चंद्रकांत पनपालीया, डॉ श्याम चांडक पुणे तथा जीपीएचे अध्यक्ष डॉ सतीश उटांगळे प्रामुख्याने यावेळी उपस्थित होते. यावेळी डॉ पनपालिया तथा डॉ उटांगळे यांनी दहावी व बारावी मध्ये उत्कृष्ट गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत त्यांना शुभेच्छा बहाल करीत विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीची क्षेत्रे निवडून शिक्षणाद्वारे या क्षेत्रावर अधिराज्य गाजवण्याचे आवाहन केले.

## अकोटच्या अन्विका धोरणची तिहेरी भरारी

### सैनिक शाळा, नवोदय आणि शिष्यवृत्ती परीक्षेत दैदिप्यमान कामगिरी

**अकोट :** अकोट येथील विद्यांचल द स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या कु. अन्विका धोरण हिने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या अन्विकाने एकाच वेळी तीन महत्त्वाच्या परीक्षांमध्ये यश मिळवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.



राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA) आयोजित अखिल भारतीय सैनिक शाळा प्रवेश परीक्षेत तिने ३०० पैकी तब्बल २४३ गुण मिळवत पात्रता प्राप्त केली. तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवत शहरी भागाच्या प्रतीक्षा यादीत स्थान पटकावले. याशिवाय पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ८१ टक्के गुणांसह ती पात्र ठरली. एकाच वेळी तीनही परीक्षांचा अभ्यास, नियोजन आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर अन्विकाने हे यश मिळवले. तिच्या या कामगिरीमुळे अकोटच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या यशाचे श्रेय अन्विकाने आई सोनाली धोरण, वडील नितीन धोरण, अढाऊ कोचिंग क्लासचे संचालक सदानंद अढाऊ, शिक्षकवृंद आणि शाळा प्रशासनाला दिले. नियमित अभ्यास, अवांतर वाचन आणि कठीण प्रश्नांचा सराव हे यशामागील प्रमुख घटक असल्याचे तिने सांगितले.

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७५२/२०२६ प्रोसेस नं.६५०५/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** १. अमोल रमेश वाढोणकर रा. ए–७, आरबीआय स्टाफ क्वार्टरस, अमरावती रोड, रवी नगर, युनिव्हर्सिटी कॅम्पस, ता. जि. नागपूर. २. अमित रमेश वाढोणकर ३. रमेश विश्वंभर वाढोणकर क. २ व ३ रा. श्रीनाथ विहार, ब्लॉक नं. सी-३, योगराज ट्रेडर्स, न्यू तापडिया नगर, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रमिला रमेश वाढोणकर
**पत्ता :-** रा. श्रीनाथ विहार, ब्लॉक नं. सी-३, योगराज ट्रेडर्स, न्यू तापडिया नगर, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रमिला रमेश वाढोणकर यांचे दि. २७/११/२०२५ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

# इंधन दरवाढीविरोधात वंचितची बैलगाडा मोर्चाची तयारी

■ प्रतिनिधी | अकोट ■

## अकोटमध्ये आढावा बैठक; पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती



इंधन दरवाढ तसेच सत्ताधाऱ्यांच्या दुटप्पी भूमिकेविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या बैलगाडा मोर्चाच्या पार्श्वभूमीवर अकोट येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. शहरातील शासकीय विश्रामगृहात झालेल्या या बैठकीत मोर्चाच्या नियोजनासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, महासचिव मिलिंद इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. अकोला येथे होणाऱ्या बैलगाडा मोर्चासाठी अकोट तालुका व शहरातून मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे नियोजन यावेळी करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडी, युवक आघाडी, महिला आघाडी, सम्यक विद्यार्थी आंदोलन, विद्वत सभा तसेच भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोर्चाबाबत आपले विचार मांडले. जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, महासचिव मिलिंद इंगळे तसेच युवक आघाडीचे महासचिव राजकुमार दामोदर यांनी मार्गदर्शन करत मोर्चाचे नियोजन, सहभाग आणि संघटनात्मक तयारीबाबत सूचना दिल्या.

बैठकीला तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन पुंडकर, संघटक सुरेंद्र ओइबे, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे, महिला तालुकाध्यक्ष सुनिताताई हिरोळे, शहराध्यक्षा लताताई कांबळे, सुरेश गवई, युवक अध्यक्ष आशिष रायबोले, युवक महासचिव अमन गवई यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन पुंडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संदीप सिरसाट व स्वप्निल सरकटे यांनी केले.

# शेवाळयुक्त पाणीपुरवठ्याने झरंडीकर हैराण

## दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात; ग्रामपंचायतीच्या कारभारावर संताप

■ प्रतिनिधी | खेट्री ■



पातुर तालुक्यातील अतिदुर्गम झरंडी गावात गेल्या काही महिन्यांपासून ग्रामस्थांना शेवाळयुक्त व दूषित पाणीपुरवठा केला जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात असताना प्रत्यक्षात मात्र ग्रामस्थांच्या नशिबी दूषित पाणी आले आहे. यामुळे गावकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून ग्रामपंचायतीच्या ढिसाळ कारभाराबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावातील शासकीय विहीर आणि पाण्याच्या टाकीची नियमित साफसफाई केल्याचे कागदोपत्री दाखवून देयके काढली जात आहेत. मात्र प्रत्यक्षात विहीर व टाकीची स्वच्छता होत नसल्याने पाण्यात शेवाळ साचले असून हेच दूषित पाणी नागरिकांना पुरवले जात आहे. परिणामी अनेक ग्रामस्थ आजारी पडत असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. झरंडी गाव अतिदुर्गम भागात असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचारी गावात फिरकत नसल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे ग्रामस्थांना नाईलाजाने शेवाळयुक्त पाणी पिण्याची वेळ आली आहे.

भर उन्हाळ्यात महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास दूषित पाण्यामुळे संसर्गजन्य व गंभीर आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याकडे जिल्हा परिषद प्रशासन व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### सचिव गावाकडे फिरकेना?

गावातील विकासकामांवर देखरेख ठेवणे, ग्रामस्थांच्या समस्या सोडविणे तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेची जबाबदारी ग्रामसेवक व सचिवांवर असते. मात्र झरंडी गाव अतिदुर्गम असल्याने संबंधित सचिव गावात येत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विहीर व पाण्याच्या टाकीची साफसफाई केल्याचे दाखवून केवळ कागदोपत्री कामे केली जात असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

### पुरस्कारासाठी स्वच्छतेचा गवगवा?

गाव स्वच्छ असल्याचे कागदोपत्री चित्र उभे करून विविध योजनांमध्ये पुरस्कार मिळविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रत्यक्षात मात्र गावकऱ्यांना शेवाळयुक्त पाणी प्यावे लागत असल्याने स्वच्छतेच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# निवडणूक निर्णय अधिका-यांनी घेतला आढावा

## विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक - २०२६

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली विधान परिषद स्थानिक प्राधिकारी द्विवार्षिक निवडणूकी करीता विषयनिहाय नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिका-यांची आज (दि. २१) निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, चंद्रपूर वसुमना पंत यांनी बैठक घेऊन आढावा घेतला.



जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला अपर जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) संजीव देशमुख, शुभम दांडेकर, अतुल जटाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादूरकर यांच्यासह दूरदृष्यप्रणालीद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी आशिष (गडचिरोली), संजीव जाधवर (वर्धा) आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या, प्रत्येक नोडल अधिका-यांनी आपापली जबाबदारी अतिशय गांभिर्याने पार पाडावी. तिनही जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी कार्यालय किंवा तहसील कार्यालय येथे, मतदान केंद्र ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने तेथे सीसीटीव्ही, वेब कास्टिंग व इतर व्यवस्था चोख ठेवाव्यात. निवडणुकीच्या कामाकरीता आपापले मनुष्यबळ तपासून घ्यावे.

अचूक मतदार यादी तयार करण्याला प्राधान्य देऊन नावाच्या अग्रक्रमानुसार मतदार यादी त्वरीत चंद्रपूर येथे पाठवावी, अशा सुचना निवडणूक निर्णय अधिकारी तथा चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या.

# विदर्भातील मानवाधिकार लढ्याला नवी धार

## I.H.R.A च्या विदर्भ प्रदेशाध्यक्षपदी डॉ. मंगेश साठे; अण्णा हजारे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

**वर्धा/ जनमाध्यम**

आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवाधिकार संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या इंटरनॅशनल ह्युमन राईट्स असोसिएशन या संघटनेच्या दिल्ली येथे पार पडलेल्या केंद्रीय बैठकीत वर्ध्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. मंगेश साठे यांची विदर्भ प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीमुळे वर्धा जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातील सामाजिक व मानवाधिकार क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मंगेश चोरे (पाटील) यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय समितीकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डेव्हिड राज, केंद्रीय उपाध्यक्ष जोसब मलबारी, जनरल सेक्रेटरी अरविंद बागड़गिरी, राज्याध्यक्ष मंगेश चोरे (पाटील) यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नियुक्तीची औपचारिक घोषणा करण्यात आली. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते डॉ. मंगेश साठे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या साक्षीने पार पडलेल्या या क्षणामुळे कार्यक्रमाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली. यावेळी बोलताना अण्णा हजारे यांनी मानवाधिकारांच्या संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. 'मानवाच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन हा गंभीर अपराध आहे. समाजातील अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरुद्ध लढण्यासाठी अशा संघटनांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने संघर्ष सुरू राहिला पाहिजे, असे ते म्हणाले. राज्याध्यक्ष मंगेश चोरे (पाटील) यांनीदेखील विदर्भातील सामाजिक प्रश्न, अन्याय आणि अत्याचारांविरोधात कायदेशीर लढा उभारण्याचे आवाहन केले. संघटनेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांपर्यंत न्याय पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

नियुक्तीनंतर डॉ. मंगेश साठे यांनी संघटनेच्या केंद्रीय नेतृत्वाचे आभार मानत, विदर्भातील शोषित, पीडित आणि अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच अन्यायग्रस्तांनी निर्धास्तपणे संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, डॉ. मंगेश साठे यांच्या नियुक्तीचे विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांतून स्वागत करण्यात येत असून, त्यांच्या नेतृत्वामुळे विदर्भातील मानवाधिकार चळवळीला नवी दिशा आणि आक्रमक भूमिका मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कृषी कन्यांचा सेंद्रिय उद्योगाचा 'गोड' अनुभव

**वर्धा/ जनमाध्यम**

ग्रामीण भागातील कृषी उद्योग, सेंद्रिय उत्पादन आणि उद्योजकतेचे धडे प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात करण्यासाठी बजाज कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्यांनी पवनी येथील सेंद्रिय गुळ उद्योगाला अभ्यासभेट दिली. या भेटीत विद्यार्थिनींनी गुळ निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया जवळून पाहत आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

बजाज कृषी महाविद्यालय येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत प्रतिभा सेंद्रिय गुळ उद्योग येथे पोहोचल्या होत्या.

उद्योगातील उत्पादन प्रक्रिया, सेंद्रिय ऊस लागवड, गुळ निर्मितीतील स्वच्छता आणि यंत्रसामग्रीचा वापर याबाबत त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थिनींनी उत्पादन विभागाला भेट देत प्रत्यक्ष कामकाजाचे निरीक्षण केले. उद्योग क्षेत्रातील संधी, कृषीपूरक व्यवसाय आणि सेंद्रिय उत्पादनांची वाढती मागणी यावरही चर्चा करण्यात आली. उद्योग व्यवस्थापनाने विद्यार्थिनींच्या प्रश्नांना उत्तरे देत व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्याचे मार्गदर्शन केले.

यावेळी प्रतिभा प्रमोद महाजन यांनी स्वतःचा अनुभव सांगताना घर आणि व्यवसाय यांचा समतोल साधत सेंद्रिय गुळ उद्योग उभारल्याचे नमूद केले. रासायनिक घटकांचा वापर टाळून तयार होणारा सेंद्रिय गुळ आरोग्यासाठी लाभदायक असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण महिलांनीही कृषी उद्योगात पुढे येण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव 'अभियानाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**आर्वी/ जनमाध्यम**

महाराष्ट्र शासन यांच्या वतीने १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या माझं गाव आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत आदर्श ग्राम संसद मिर्झापूर नेरी येथे विविध आरोग्यविषयक उपक्रमांना उत्साहात सुरुवात झाली आहे. या अभियानांतर्गत गुरुवारी पंचायत लर्निंग सेंटरच्या सभागृहात एनसीडी क्लब व स्टेप्स अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

कार्यशाळेत १८ वर्षांवरील नागरिकांची बीपी व शुगर तपासणी करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला. बदलती जीवनशैली, वाढते आजार आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने येत्या काळात विविध उपक्रम राबवून गावातील प्रत्येक



## एनसीडी व स्टेप्स अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा

नागरिकाचे आरोग्य निरामय व सुखकर करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यशाळेत डॉ. मोहिनी गवई, हेमलता मोरे, सुनील लोहे, स्वाती कडू तसेच सार्थक चोरे यांनी आरोग्यविषयक विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच तथा ऊर्जादूत बाळा सोनटक्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय यावले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत कर्मचारी शामराव अटेल, सीआरपी सुषमा कठाणे, प्रल्हाद ठाकरे, स्मिता काळपांडे, मोनाली विरुळकर, सविता इंगळे, सविता कठाणे तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी परिश्रम घेतले. यावेळी सरपंच बाळा सोनटक्के यांनी गावातील सामूहिक भोजन कार्यक्रमांमध्ये सहा पदार्थांपेक्षा अधिक पदार्थ ठेवू नयेत, असा नाविन्यपूर्ण ठराव ग्रामसभेत मंजूर झाल्याचे सांगितले.

यामुळे अन्नाची नासाडी थांबेल, आर्थिक बचत होईल आणि आरोग्यदायी जीवनशैलीलाही चालना मिळेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### अभियान पूर्तीसाठी ग्रामस्थांची सामूहिक शपथ

माझं गाव आरोग्य संपन्न गाव हे अभियान केवळ शासकीय उपक्रम नसून ग्रामविकास आणि निरोगी जीवनाचा पाया आहे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. कोणताही नागरिक आरोग्यसेवेपासून वंचित राहू नये तसेच सर्व शासकीय आरोग्य योजना प्रत्येकापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी ग्रामस्थांनी पंचायत लर्निंग सेंटरमध्ये सामूहिक .




गुन्हेगारी वार्ता

## अतिमद्य प्राशनाने इसमाचा मृत्यू

**हिंगणघाट** - का ४६ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना हिंगणघाट शहरातील काजी वॉर्ड परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतकाचे नाव यादव मडावी असे आहे. माहितीनुसार, यादव मडावी यांना दारूचे व्यसन होते. नेहमीप्रमाणे त्यांनी मद्यप्राशन केले होते. मात्र अतिमद्य सेवनामुळे त्यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यानंतर त्यांना रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या. परिस्थिती गंभीर झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाणे येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. वाढत्या व्यसनाधीनतेमुळे अशा घटना घडत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

## पांजोळ्याच्या कारणातून तिघांकडून मारहाण

**हिंगणघाट** - घरासमोर ठेवलेल्या पांजोळ्याच्या गठ्ठ्यांवरून झालेल्या किरकोळ वादातून एका इसमाला तिघांनी बेदम मारहाण केल्याची घटना गौतम वॉर्ड परिसरात घडली. या मारहाणीत अनिल डोंगरे हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. माहितीनुसार, अनिल डोंगरे यांच्या घरासमोर जगदीश डोंगरे यांनी पांजोळ्याचे गठ्ठे ठेवले होते. त्यामुळे परिसरात डासांचा त्रास वाढत असल्याने अनिल यांनी ते गठ्ठे हटविण्याची विनंती केली. मात्र, या कारणावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर जगदीश, पवन डोंगरे आणि सुमित डोंगरे यांनी अनिल यांना मारहाण केली. या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

## विश्वासाने दिलेला ट्रॅक्टर परतच नाही

**समुद्रपूर** - बँकेचे थकीत हप्ते भरतो, असे सांगून विश्वासाने घेतलेला ट्रॅक्टर परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार दहेगाव परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. दहेगाव येथील प्रमोद मुंगसे यांनी कर्जावर नवीन ट्रॅक्टर खरेदी केला होता. मात्र, अपेक्षित भाडे मिळत नसल्याने ट्रॅक्टरचे चार हप्ते थकीत झाले होते. दरम्यान, लियाकत अयुब खान याने मुंगसे यांचा विश्वास संपादन करून बँकेचे थकीत हप्ते आपण भरतो, असे आश्वासन दिले. त्यानंतर एमएच-३२-एस-६७६३ क्रमांकाचा ट्रॅक्टर त्याच्याकडे देण्यात आला. मात्र, संबंधिताने ना हप्ते भरले ना ट्रॅक्टर परत केला. विचारणा केल्यावर उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. अखेर तक्रारीवरून पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# उकाड्याचा कहर; सेलू तालुक्यात उष्माघाताचा दुसरा बळी

**सेलू/ जनमाध्यम**

विदर्भातील वाढत्या तापमानाने आता जीवघेणे रूप धारण केले असून सेलू तालुक्यात उष्माघाताने आणखी एका वृद्धाचा बळी घेतला आहे. तालुक्यातील सुरगाव येथील भानुदासजी गायकवाड (वय ७०) यांचा उष्माघातामुळे जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. तीन दिवसांतील ही दुसरी घटना असल्याने परिसरात भीती आणि हळहळ व्यक्त होत आहे.



### सुरगाव येथील ७० वर्षीय वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू ; तीन दिवसांत दुसरी घटना

मिळालेल्या माहितीनुसार, गायकवाड हे गुरुवारी रात्री पत्नीसह घराच्या वरच्या मजल्यावर झोपले होते, तर कुटुंबातील इतर सदस्य खालच्या खोलीत होते. रात्री उशिरापर्यंत हवेत प्रचंड उकाडा आणि अस्वस्थता जाणवत होती. रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास उकाडा असह्य झाल्याने ते बेडवरून उठून हवेशीर जागेकडे जाण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, अचानक चक्कर आल्याने त्यांचा तोल गेला आणि ते खाली कोसळले. उष्माघाताच्या तीव्र झटक्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. गेल्या काही दिवसांपासून सेलू परिसरात तापमानाचा पारा सातत्याने वाढत आहे. तीन दिवसांपूर्वी धानोली (मेघे) येथे जन्मतः मुक्या-बहिऱ्या असलेल्या एका वृद्ध महिलेचाही उष्माघाताने मृत्यू झाला होता. ती घटना ताजी असतानाच सुरगाव येथील या घटनेने नागरिकांची चिंता अधिक वाढवली आहे. सलग घडणाऱ्या घटनांमुळे उष्माघाताचा धोका गंभीर बनत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, वाढत्या उष्णते च्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे तसेच घरात हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# वृद्धांच्या पदरात १५०० सरकारच्या तिजोरीत कोट्यवधी

**साहूर/ जनमाध्यम**

एकीकडे शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन सातवा वेतन आयोग लागू करून लाखांच्या घरात पोहोचले, तर दुसरीकडे वृद्ध, निराधार, अपंग आणि घटस्फोटित नागरिकांना आजही केवळ १५०० रुपयांच्या तुटपुंज्या अनुदानावर जगण्याची वेळ आली आहे. वाढती महागाई, औषधोपचाराचा खर्च आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न यामुळे साहूर परिसरातील वृद्ध पेन्शनधारकांचे जीवन अक्षरशः हालअपेष्टांत जात असून शासनाने सातवा वेतन आयोग व महागाई निर्देशांकानुसार वृद्ध पेन्शनमध्ये तातडीने वाढ करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना आणि इंदिरा गांधी निराधार योजनेअंतर्गत हजारो लाभार्थ्यांना शासनाकडून दरमहा अनुदान दिले जाते. पूर्वी केवळ ६०० रुपये मिळणारे अनुदान वाढवून १००० रुपये करण्यात आले आणि आता १५०० रुपये दिले जात असले तरी आजच्या महागाईच्या काळात ही रक्कम अत्यंत अपुरी असल्याचे वृद्धांचे म्हणणे आहे. परिसरातील अनेक वृद्ध नागरिक मुला-सुनांपासून विभक्त राहत असून त्यांना विविध आजारांनी ग्रासले आहे. अशा परिस्थितीत औषधोपचार, अन्नधान्य, घरखर्च आणि दैनंदिन गरजा भागवताना त्यांची अक्षरशः दमछाक होत आहे. त्यातही अनेकदा पेन्शन वेळेवर जमा होत नसल्याने वृद्धांना उधारी, उसनवारी आणि उपासमारीचा सामना करावा लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया लाभार्थ्यांनी व्यक्त केली. सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार महागाईनुसार वाढतात, मग आमच्या पेन्शनकडे शासनाचे दुर्लक्ष का असा प्रश्न वृद्धांनी उपस्थित केला आहे. निवडणुका, जाहिराती आणि शासकीय कार्यक्रमांवर कोट्यवधी रुपये खर्च करणारे सरकार निराधारांच्या प्रश्नांकडे मात्र डोळेझाक करीत असल्याचा आरोपही करण्यात आला.

अच्छे दिन च्या घोषणा करणाऱ्या सरकारने आता तरी वृद्धांच्या जगण्याचा विचार करावा आणि सातवा वेतन आयोग व वाढत्या महागाईनुसार पेन्शनमध्ये मोठी वाढ करावी, अशी मागणी साहूर व परिसरातील वृद्ध निराधारांनी केली आहे.

## कोर्ट विद्यमान श्री समर्थ क्षिरसागर तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी यांचे न्यायालय देवळी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये**

**ज.मृ.नो.र.प्र.क्र.- २३/२०२५-२६**

### जाहीरनामा

ज्याअर्थी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) आणि महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम व फोजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत अर्जदार विशाल बळीरामजी लोखंडे रा. पिंपळगांव (लुटे) ता. देवळी जि. वर्धा यांचा जन्म ०१/०९/१९८७ रोजी मौजा पिंपळगांव (लुटे) ता. देवळी येथे झाला असून त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत पिंपळगांव (लुटे) ता. देवळी येथे उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायत पिंपळगांव (लुटे) ता. देवळी यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत या कार्यालयास ग्रामपंचायत पिंपळगांव (लुटे) ता. देवळी यांचेव्दारे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्याअर्थी सदर व्यक्तीच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप /हरकती असल्यास ते त्यांनी निश्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायीमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून १५ दिवसाचे आत सादर करावे. उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रितीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार देवळी**

**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, नागपूर/ वर्धा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ**
**१ ला मजला, हज हाऊस, गंजीपेठ नागपूर-४४००१८**

संचिका क्र. ६९/३७२/२०२४ क्र. मरावंम/चौकशी/जि.व.का.ना./२८९/२०२६ दिनांक:- २० MAY २०२६

### जाहीर प्रगटन

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**

**वक्फ संस्थेच नाव व पत्ता: Masjid-E-Mohammadiya Darul Uloom, At. Deoli, Village. Deoli, Taluka. Deoli, Dist. Wardha (MSBW/WRD/87/2015)**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. हबीबखाँ दुलेखॉ पठाण यांनी दिनांक २१/०५/२०२४ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ पाच (५) वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित सर्वसाधारण सभेत बोट वर करुन निवडण्यात येईल अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहेः-

| अ.क्र | नाव | पद |
|---|---|---|
| १ | हबीबखाँ दुलेखॉ पठाण | अध्यक्ष |
| २ | सैय्यद सलीम सैय्यद हबीब | उपाध्यक्ष |
| ३ | अब्दुल रहेमान अब्दुल हमीद तवर | सचिव |
| ४ | निसार अजीज शेख | खजिनदार |
| ५ | सैय्यद जावेद सैय्यद शब्बीर | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, नागपूर, १ ला मजला, हज हाऊस, गंजीपेठ, नागपूर-४४००१८ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**(तौसिफ मौलासाहेब नायकवडी)**
**प्र. जिल्हा वक्फ अधिकारी, वर्धा**

# 'ड्रंक अँड ड्राइव्ह'वर पोलिसांचा करडा बडगा

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी 'ड्रंक अँड ड्राइव्ह' करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम सुरू केली असून, दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्या चालकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. या मोहिमेत सिंदी मेघे येथील एका युवकाविरुद्ध कारवाई करण्यात आली असून त्याच्या रक्तात धक्कादायक प्रमाणात अल्कोहोल आढळून आले.

अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रण शाखेकडून संपूर्ण जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत २० मे रोजी वाहतूक शाखेचे कर्मचारी अनिल तिवारी, चंद्रकांत तपासे, दिलीप कामडी आणि प्रदीप कोवळे यांनी पेट्रोलिंगदरम्यान इतवारा चौक परिसरात वाहनांची तपासणी केली. यावेळी विशाल प. गोंडाने (वय २४, रा. सिंदी मेघे) हा युवक दारूच्या नशेत वाहन चालविताना आढळून आला. ब्रेथ ॲनालायझर तपासणीत अल्कोहोल आढळल्याने वाहतूक पोलिसांनी मोटार वाहन कायद्यातील कलम १८५ अंतर्गत त्याच्यावर कारवाई केली.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १७५

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**- atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# बँकेसमोरून रोकड लंपास करणारे ३ विधी संघर्षग्रस्त बालक ताब्यात

## -मुंबईतील पबमध्ये उडविले पैसे, नांदगाव पेठ पोलिसांची कारवाई

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** मंगळवार (दि.१९) दुपारच्या सुमारास येथील भारतीय स्टेट बँकेसमोर घडलेल्या तब्बल ३ लाख १४ हजार रुपयांच्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या तीन दिवसात छडा लावत नांदगाव पेठ पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या प्रकरणात ३ विधी संघर्षग्रस्त बालकांना मुंबई येथून ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून रोख रक्कम, ओला ई-बाईक व मोबाईल असा एकूण २ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अक्षय मोरे रा. बारीपुरा नांदगाव पेठ हे पेट्रोलपंपावर कॅश कलेक्शनचे काम करीत होते. त्यांनी मंगळवारी सावर्डी येथील पेट्रोलपंपावरून १ लाख ५५ हजार ७२० रुपये तसेच कोल्हटकर यांच्या डी.के. ट्रॅव्हलिंग पेट्रोलपंपावरून १ लाख ५८ हजार ४२० रुपये अशी एकूण ३ लाख १४ हजार १४० रुपयांची रोख रक्कम घेऊन बिझीलँड परिसरातील भारतीय स्टेट बँकेत भरण्यासाठी गेले होते.फिर्यादी यांनी वाहन पार्किंगमध्ये उभे करून ते बँकेकडे जात असताना मागून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. आरोपींनी खिशातून घरगुती वापराचा चाकू काढून फिर्यादीवर हल्ला केला. झटापटीत फिर्यादी किरकोळ जखमी झाले. त्यानंतर आरोपींनी त्यांच्या हातातील पैशांची बॅग जबरदस्ती हिसकावून घेतली व तेथून पळ काढला. पळून जाताना आरोपींपैकी एकाने हातातील चाकू घटनास्थळीच फेकून दिला.

घटनास्थळावरून काही अंतरावर निळसर रंगाची इलेक्ट्रिक दुचाकी घेऊन आणखी एक साथीदार उभा होता. त्यावर बसून तिन्ही आरोपी बिझीलँडच्या मुख्य गेटमधून राष्ट्रीय महामार्गाच्या दिशेने पसार झाले. आरोपींनी तोंड बांधले असल्यामुळे त्यांची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.या प्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात अप. क्र. १७६/२०२६ कलम ३०९(६), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.



बँकेसमोरून रोकड लंपास केल्यानंतर आरोपींनी नागपूर व मुंबई येथे पलायन करून क्लब, पबमध्ये मौजमजा करत चोरीच्या रकमेतून मोठ्या प्रमाणात पैसे उधळले. कपडे, बूट व इतर साहित्य खरेदीसह सुमारे १ लाख ३५ हजार रुपये खर्च केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.आरोपींवर गाडगेनगर पोलीस ठाण्यातही गुन्हा दाखल असून, तिन्ही आरोपींची सध्या कसून चौकशी सुरू आहे.

**-दिनेश दहातोंडे,**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक -पो.स्टे. नांदगाव पेठ

तपासादरम्यान पोलिसांना तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी मुंबई येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथक तातडीने मुंबईला रवाना करण्यात आले. अथक परिश्रम व शिताफीने पोलिसांनी या गुन्ह्यातील ३ विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले.तपासात आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्याकडून चोरीतील १ लाख ७९ हजार रुपये रोख रक्कम, गुन्ह्यात वापरण्यात आलेली निळ्या रंगाची ओला ई-बाईक क्रमांक MH 27 DY 6476 तसेच दोन मोबाईल फोन असा एकूण २ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोउपनि गणेश राऊत, पोलीस कॉन्स्टेबल वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुद्दीन सैयद, निलेश साविकार, चालक पोहेका वैभव धुरंदर तसेच गुन्हेशाखेचे सपोनि मनीष वाकोडे व पोलीस अंमलदार यांच्या संयुक्त पथकाने पार पाडली.

# गोठ्याला आग; ४ शेळ्यांसह १० कोंबड्याचा होरपळून मृत्यू

## -तिवसा ते सातरगाव रोडवरील शेतात पहाटे घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** शेतातील गोठ्याला लागलेल्या आगीत खुंट्याला बांधलेल्या ४ शेळ्यासह १० कोंबड्यांचा जागीच होरपळून व तडफडून मृत्यू झाला तर एका गायीचा चेहरा भाजला.तिवसा ते सातरगाव रोडवरील शेतात आज पहाटे ही घटना घडली. ज्यात गोठ्यातील कडबा-कुटारासह ६० प्लास्टिक पाईप,टिनपत्रे अन्य साहित्याची राखरांगोळी झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, तिवसा येथील युवा शेतकरी जयकुमार देशमुख यांचे तिवसा ते सातरगाव रोडवरील जिनिंग प्रेसिंगजवळ शेत आहे. या शेतातील गोठ्यात नेहमीप्रमाणे खुंट्याला बांधून ४ शेळ्या, एक गाय व १० गावरान कोंबड्या होत्या. गोठ्यात ६० नग सिंचन पाईप चे २ सेट व कडबा-कुटारासह अन्य साहित्य ठेवले होते.

आज शुक्रवारी पहाटेच्या सुमारास सदर गोठ्याला अचानक आग लागली व गोठ्यातील मुकी जनावरे ४ शेळ्या, १० कोंबड्या यांचा जागीच होरपळून व तडफडून मृत्यू झाला तर खुंट्याला बांधून असलेल्या गायीने आगीतून खुंटा तोडून पळ काढल्याने ती मात्र बचावली





असली तरी गाईच्या चेहऱ्याचा भाग आगीमुळे भाजल्या गेला.

टीनपत्रे,कुटार व अन्य साहित्य असे अंदाजे दोन ते अडीच लाखाचे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. आगीची माहिती शेतकऱ्याला मिळताच त्याने शेतात धाव घेऊन याबाबत तिवसा नगरपंचायतच्या अग्निशमन दलाला माहिती दिली असता तातडीने अग्निशमनची गाडी घटनास्थळी दाखल झाली व आगीवर नियंत्रण मिळविले मात्र तोपर्यंत गोठ्यातील मुकी जनावरे जळून खाक झाली होती. याबाबत झालेल्या नुकसानीची पाहणी स्थानिक तलाठी यांनी केली असून नैसर्गिक आपत्ती विभागाने याबाबत नोंद घेतली आहे. झालेल्या नुकसानीची भरपाईची मागणी शेतकरी जयकुमार देशमुख यांनी शासनाकडे केली आहे.

# उपराईत मागासवर्गीय वस्तीत पाणी टंचाई

## -प्राधिकरण विभागाचे दुर्लक्ष?

**खल्लार/प्रतिनिधीः-** नजिकच्या उपराई येथील मागासवर्गीय वस्तीमधिल नागरिकांना जिवन प्राधिकरणाच्या दुर्लक्षपणामुळे पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. याबाबत प्राधिकरणाकडे वारंवार निवेदन देऊनही याकडे लक्षच दिले जात नसल्याने या वस्तीतील नागरिक आंदोलनाच्या तयारीत आहेत.



शहानूर प्रकल्पातून गावाला होणारा पाणी पूरवठा होत असून गावात बाकी ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत होतो.

मागासवर्गीय वस्तीत पाणी पूरवठा सुरळीत होण्यासाठी मागिल दोन ते तीन महिन्यापासून पाईपच टाकून ठेवले आहेत.पाणी पुरवठा करण्यासाठी पाईप पडून असल्याने या वस्तीमधिल नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे.

याकडे प्राधिकरण विभागाने लक्ष देऊन नागरिकांना पाण्यासाठी होणारा त्रास थांबवावा अशी मागणी या वस्तीमधिल नागरिकांनीं केली असून याकडे प्राधिकरणाने दुर्लक्ष केल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गावातील मागासवर्गीय वस्तीतील नागरिक, महिलांना ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून प्राधिकरण विभागाकडे वारंवार निवेदन देऊनही दुर्लक्ष केल्या जात आहे.

त्यामुळे या वस्तीमधिल पाणी पूरवठा आठवड्यात नियमित सुरु करण्यात यावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल.

**-निरज नागे**
सरपंच, उपराई

# चाकू घेऊन दहशत पसरविणारे दोघे ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** चाकू हातात घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या दोन आरोपींना गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून चाकू जप्त करण्यात आला आहे. सचिन शामराव वानखडे (वय ४०, लायब्ररी चौक फ्रेजरपुरा) व वैभव अजय बनसोड (वय २६, राहुल नगर बिच्छू टेकडी) असे अटक आरोपींची नावे आहे. माहितीनुसार गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली की, फ्रेजरपुरा ठाणे क्षेत्रात दोन आरोपी हातात चाकू घेऊन दहशत निर्माण करत आहे. या वरून पोलिसांनी तेथे कारवाई करून दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून चाकू जप्त करण्यात आला. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात दोघांवर स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०७२/२०२६
**श्री.प्रवीण अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Pravin Brijmohan Mundhada, Age 67 Yrs. Occu.: Business
C/o Hotel Mehfil-Inn, Camp Road, Amravati.
R/o Kanta Nagar, Opp.Visawa Colony, Old Bypass Road, Camp, Amt.
2. Sanjeev Brijmohan Mundhada, Age 65 Yrs. Occu.: Business
C/o Hotel Mehfil-Inn, Camp Road, Amravati.
R/o Kanta Nagar, Opp.Visawa Colony, Old Bypass Road, Camp, Amt.
3. Madhu W/o Sanjay Jaju, Age 61 Yrs. Occu.: Household
R/o 3rd Floor, Wing-1, Raj Apartment, Near Bitco Point, Nashik Road, Nashik-422101
4. Mamta W/o Umashankar Agiwal, Age 56 Yrs. Occu.: Household
R/o 4/4, Surasadan, House No.23, Road No.4, Contractor Area, Po.Bistupur Kalimali, East Singhbhum, Jamshedpur (Jharkhand)-831001

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **ब्रिजमोहन हेमराज मुंधडा** हे दिनांक **२२.०३.२०२६** व **११.०३.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व **मयत विजया ब्रिजमोहन मुंधडा** ह्या दिनांक **०९.०१.२०२३** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **प्रवीण अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रवीण अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कालदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०९९/२०२६
**राजेश अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.१६.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Rajesh S/o Nandkishor Tapdiya, Age 60 Yrs. Occu.: Business
R/o Balaji Plot, Amravati.
2. Raman S/o Nandkishor Tapdiya, Age 67 Yrs. Occu.: Business & Agri.
R/o Balaji Plot, Amravati.
3. Kalpana W/o Sunilkumar Mundhada, Age 55 Yrs. Occu.: Household
R/o Changani Nagar, Lane No.01, Amravati
4. Mangala W/o Sanjaykumar Tapdiya, Age 58 Yrs. Occu.: Household
R/o Laxmi Vihar, Behind Mohan Marble, Amravati.
5. Vaishnavi D\o Sanjaykumar Tapdiya, Age 28 Yrs. Occu.: Household
R/o Laxmi Vihar, Behind Mohan Marble, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः 1. Ankita W/o Rohit Jaju, Age 33 Yrs. Occu.: Service
R/o Flat No.1204, Rohan Abhilasha Wagholi, Haveli, Pune

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Neetadevi Nandkishor Tapdiya हे दिनांक **२२.०५.२०२३** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rajesh S/o Nandkishor Tapdiya + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rajesh S/o Nandkishor Tapdiya + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५७/२०२६
**श्री.निखील अधिक सहा -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Nikhil Devanand Maldhure, Age 34 Yrs. Occu.: Business
R/o Gurudeo Nagar, Near Mauli Apartment, Kathora Road, Amravati.
2. Jayashri Sumit Khakare, Age 36 Yrs. Occu.: Housewife
R/o 1-B, Near Amravati Railway Station Road, Wali Baba Dasara, Snehgandha Colony, Sai Nagar, Amravati
3. Shilpa Tushar Warhekar, Age 39 Yrs. Occu.: Housewife
R/o Flat No.502] Riviera Bldg. Atharv Nagari 2, Besa Pipla Road, Near Besa Square Pimpla Nagpur
4. Soham Prashant Garde, Age 20 Yrs. Occu.: Education
R/o Warud, Tq. Warud, Dist. Amravati.
5. Yogita Ravi Banait, Age 44 Yrs. Occu.: Housewife
R/.o Ward No.4, Near Kalimata Mandir, Navrang Chowk, Dhamangaon Railway, Tq. Dhamangaon Railway, Dist. Amravati
6. Sarika Pratik Ambadkar, Age 41 Yrs. Occu.: Housewife
R/o Saraswati Nagar, Shivaji College Road, Ward No.30, Akot, Tq. Akot, Dist. Akola
7. Shobha Devanandrao Maldhure, Age 65 Yrs. Occu.: Housewife
R/o Near Ganpati Mandir, Tarkheda, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पुनाजी उदेभान मालधुरे** हे दिनांक 31.01.1981 रोजी **तारखेडा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **तुकाराम उदेभान मालधुरे** हे दिनांक **०४.०६.१९७९** रोजी तारखेडा, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **निखील** + 6 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निखील** + 6 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९६५/२०२६
**लिलाबाई अधिक ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Lilabai Kamalakar Sawalkar, Age 91 Yrs. Occu.: Household
2. Anita Narendra Sawalkar, Age 55 Yrs. Occu.: Household
3. Akash Narendra Sawalkar, Age 34 Yrs. Occu.: Service
4. Harshada Narendra Sawalkar, Age 30 Yrs. Occu.: Household
All R/o Yashoda Nagar No.1, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नरेंद्र कमलाकर सावलकर** हे दिनांक **२१.०२.२०२३** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **लिलाबाई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **लिलाबाई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# जाहीर नोटीस

आम जनतेस सुचित करण्यात येते की, **विजया देविदास भोयर, वैभवी देविदास भोयर, भूषण देविदास भोयर, मनोहर गंगारामजी भोयर, शालिकराम गंगारामजी भोयर, गोपाळराव गंगारामजी भोयर, नारायण गंगामजी भोयर, मंदा नंदकिशोर वाके, छाया हरिचंद्र माळोदे, गजानन भीमराव रडके, पुष्पा मुरलीधरराव मालपे, सुशिला माणिकराव भोयर, अर्चना राजेशराव सावरकर, कांचन उमेशराव यावले, योगिता रुपेशराव कावलकर, प्राजक्ता योगेशराव कुबडे, स्वाती माणिकराव भोयर, सर्व** रा.जिल्हा अमरावती यांनी त्यांचे सामुहिक मालकीचे व ताब्यातील शेत नोंदणी पोट तुकडी मौजे-धानोरा (जोग) प्र.व ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती ग्राम पं.जनुना येथील शेत भूमापन क्र.५, मधील १ हे.६१ आर, भो.वर्ग १, पो.ख.० हे.०४ आर आहे. यापैकी ० हे.८१ आर, आ.रु.६.४० पैसे ज्याचा फेरफार क्र.५५१ आहे. वरील वर्णन केलेली शेतजमीन तदंगभूत वस्तुसह व इतर झाडाझुडपासह कोरडवाहू शेतजमीन ज्याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे--

पुर्वेस - अतुल वाट यांचे शेत
पश्चिमेस - डांबर रस्ता
उत्तरेस - अतुल वाट यांचे शेत
दक्षिणेस - याच शेतीचा उर्वरित भाग.

वरील नमुद मालमत्ता विकण्याचा सौदा केला असून ज्या कुणाला या मालमत्तेचे विक्रीबाबत आक्षेप असतील त्यांनी सदरची बातमी प्रकाशित झाल्याचे ८ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर अथवा मोबाईल क्रमांकावर फोन करुन संपर्क करावा अथवा मूळ कागदपत्रासह आपले म्हणणे कळवावे. त्यानंतर कुणाचाही उजर अथवा म्हणणे ऐकुन घेतल्या जाणार नाही.

**दिनांक**

(ॲड.एन.एच.कथे)
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती
ता.जि.अमरावती
मो.८६६८७१३९५३

---

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी. क्र.१००/२०२६ ने.ता.२५.०६.२०२६

**जाहीरनामा**

अर्जदार ः १. ताजुद्दीन कबीर पिता अजिमोद्दीन काझी,
वय ४२ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
रा.सदनिका नं.ए-६०२, रहेजा विस्टा, मोहम्मदवाडी, पुणे, ता.जि.पुणे
ह.मु.मांजरखेड कसबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार
१. **अबेदाबी** पती काझी अजिमोद्दीन, वय ६९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.२, मांजरखेड कसबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
२. काझी नदिमोद्दीन पिता काझी अजिमोद्दीन, वय ३५ वर्षे, धंदा-व्यापार
रा.वार्ड नं.३, राम मंदिराजवळ, मांजरखेड कसबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. काझी अझोरुद्दीन पिता काझी अजिमोद्दीन
वय ३२ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.वार्ड नं.३, राम मंदिराजवळ, मांजरखेड कसबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **ताजुद्दीन कबीर पिता अजिमोद्दीन काझी व ईतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता मुंबई **रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **काझी अजिमोद्दीन करिमोद्दीन** यांचा मृत्यू दिनांक **०८.०२.२०२०** रोजी मौजा **मांजरखेड**, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार व गैरअर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक ०२ माहे मे, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
चांदूर रेल्वे

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

| | |
|---|---|
| फेरफार अहवाल/अर्ज क्र. | 278/2026 कलम २२ |
| सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक | **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती** **एफ-१२७७३/अमरावती** |
| बाबत अर्जदार - | **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती** |

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.८८५/२०२६
**शिला अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१८.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
१. शिला सुभाष देशमुख वय ७० वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.कृष्णार्पण कॉलनी जवळ, २४, शारदा विहार साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. प्रसन्न सुभाष देशमुख, वय ४० वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.कृष्णार्पण कॉलनी जवळ, २४, शारदा विहार साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
ह.मु.रा.फ्लॅट नं.डी-२, मॉर्निंग ड्यू सोसायटी, धायरी, सर्वे नं.१२५/५ डेस्क रोड, पुणे
३. वासंती आशिष जाधव, वय ४३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.प्लॉट नं.५११, संजीवनी नगर, गुलमोहर पार्क, कच्छपुरा गृह, पौरुवा, त्रिपुरी, जबलपूर

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुभाष आनंदराव देशमुख** यांचे दिनांक **०७.१०.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शिला सुभाष देशमुख अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शिला सुभाष देशमुख अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.८८६/२०२६
**श्रीमती सुनंदा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
१. सुनंदा वासुदेवराव जाधव, वय ६४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. तुषार वासुदेव जाधव, वय ३८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
दोघेही रा.जलपुती कॉलनी, विद्युत नगर, व्हीएमव्ही रोड, अमरावती
३. राहुल वासुदेवराव जाधव, वय ४० वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.जलपुती कॉलनी, विद्युत नगर, व्हीएमव्ही रोड, अमरावता
ह.मु.एफ-१-४०२, गंगा स्कीज सोसायटी, वल्लभ नगर, पीसीएनसी बस स्टॅंडजवळ संत तुकाराम नगर, पिंपरी पुणे

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत वासुदेव पांडुरंग जाधव** यांचे दिनांक **३१.०१.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सुनंदा अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनंदा अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **खा**लील नमुद मालमत्ता खरेदी करण्याचा सौद्यापोटी ईसारचिठ्ठी नंदा प्रॉपर्टीज तर्फे भागीदार **नरेंद्र गोपिंचंद भाराणी**, रा.गोपीनंदन नाशिकर प्लॉट, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्यासोबत करार केला होता. सदर स्थावर मालमत्तेचे (शेतजमीन) वर्णन येणेप्रमाणे--

**स्थावर मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती जि.प.चे हद्दीतील मौजे नांदगांव पेठ भाग-२, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.४८३/१, भो.वर्ग-१, क्षेत्रफळ १ हे.२१ आर, आकार रु.३.५०, खाते क्र.१३५७, फेरफार क्र.४६६९ ही शेतजमीन यात असलेल्या झाडाझुडपासह याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस - नाला
पश्चिमेस - सर्व्हे नं.४८३/१ ठाकूर यांचे शेत
उत्तरेस - नाला
दक्षिणेस - रोड

सदरहू ईसारचिठ्ठल प्रमाणे दिनांक ३०.०४.२०२६ रोजी पर्यंत खरेदी करण्याचे ठरलेले होते. परंतु सदरहू नंदा प्रॉपर्टीज तर्फे भागीदार नरेंद्र गोपिंचंद भाराणी यांनी ईसारचिठ्ठी प्रमाणे आजपर्यंत वर नमुद मिळकतीचे खरेदीखत केलेले नाही व ईसारचिठ्ठीची कोणतीही पुर्तता केली नाही. म्हणून माझ्या पक्षकाराने सदरहू सौदा रद्द केलेला असून त्याची रितसर सुचना पत्र (नोटीस) पाठविलेली आहे व सदरहू नोटीस **नंदा प्रॉपर्टीज तर्फे भागीदार नरेंद्र गोपिंचंद भाराणी** यांना मिळालेली आहे.

तरी सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, **नंदा प्रॉपर्टीज तर्फे भागीदार नरेंद्र गोपिंचंद भाराणी** यांच्यासोबत कोणीही कोणत्याही प्रकारचा वर नमुद शेतजमीन व इतर अकृषक मिळकतीबाबत व्यवहार सौदा केला असेल व भविष्यात सदरहू ईसारचिठ्ठीच्याहक्कावरुन सौदा करणार असेल तर तो सौदा माझ्या पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही व होणाऱ्या नुकसानास व कायदेशीर परिणामास माझे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी. याकरीता सदर जाहीर नोटीस.

अमरावती
**दिनांक २२.०५.२०२६**

(ॲड.एम.के.भंडारी)
अमरावती
मो.९३७२९६४८१०

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शेतकरी आत्महत्याग्रस्तांच्या मदतीत २५ वर्षांनंतरही रुपयाची वाढ नाही

**नागपूर -** शेतकरी आत्महत्येनंतर दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत २००१ पासून कोणतीही वाढ केलेली नाही. मदतीची रक्कम वाढवून शेतकरी कुटुंबांना अधिक आधार देण्याची मागणी केली जात आहे.राज्यात शेतकरी आत्महत्या ही गंभीर सामाजिक आणि आर्थिक समस्या बनली असताना, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या रकमेत गेल्या २५ वर्षांत एक रुपयाचीही वाढ करण्यात आलेली नाही. वर्ष २००१ पासून सुरू असलेली एक लाख रुपयांची मदत आजही कायम असून, वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर याबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.राज्यातील शेतकरी नापिकी, कर्जबाजारीपणा आणि आर्थिक विवंचनेमुळे आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे चित्र सातत्याने समोर येत आहे. देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत असल्याचे विविध अहवालांतून स्पष्ट झाले आहे. हि परिस्थिती रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. यापूर्वी तीन वेळा कर्जमाफी जाहीर करण्यात आली होती. आता पुन्हा दोन लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. तथापि, शासनाच्या उपाययोजना आणि



कर्जमाफीच्या घोषणांनंतरही शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. आत्महत्येनंतर संबंधित शेतकरी कुटुंबांवर मोठे आर्थिक आणि मानसिक संकट कोसळते. अशा कुटुंबांना शासनाकडून एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. मात्र, या मदतीसाठी शासनाने काही विशिष्ट निकष निश्चित केले आहेत.नापिकी, कर्जबाजारीपणा किंवा सावकारांकडून कर्जवसुलीसाठी होणारा जाग या कारणांमुळे आत्महत्या झाल्यासच संबंधित कुटुंब मदतीस पात्र ठरते.दरम्यान, गेल्या दोन दशकांत शेतीचा खर्च, बियाणे, खते, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. मात्र, शेतकरी आत्महत्येनंतर दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत २००१ पासून २५ वर्षात या मदतीत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे मदतीची रक्कम वाढवण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

**'श्वेतपत्रिका काढावी'**

लाख रुपयांच्या मदतीसाठी शेतकरी आत्महत्या करतात, असे अनेकदा म्हटले जाते. त्यामुळे केवळ मदत वाढवावी, असे मी म्हणणार नाही. मात्र, ही मदत दिल्यानंतर त्याचा प्रत्यक्षात काय परिणाम झाला, याबाबत शासनाने श्वेतपत्रिका काढावी, असे मत शेतकरी नेते विजय जावंधिया यांनी व्यक्त केले.

**मदत दुप्पट करा !**

२००१ च्या तुलनेत आज महागाई प्रचंड वाढली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येनंतर दिल्या जाणाऱ्या मदतीच्या रकमेत वाढ करण्याची गरज आहे. ही मदत किमान दुप्पट करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी नेते अॅड. वामनराव चटप यांनी केली.

## अभ्यासिकेत सुविधेसाठी विद्यार्थ्यांचे आ.तायडे यांना निवेदन



**अचलपूर/वार्ताहर**

शहरातील एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिकेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी स्पर्धा परिक्षेची तयारी करतात.मात्र या विद्यार्थ्यांना नविन पुस्तकांची गरज असुन विद्यार्थ्यांना बसण्यासाठी खुर्चाही कमी पडतात. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्या सह इतर सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे या सुविधा निर्माण कराव्या याकरीता अचलपूर मतदार संघाचे आ.प्रविण तायडे यांना विद्यार्थ्यांनी निवेदन देऊन सुविधा निर्माण करण्याची मागणी केली. आ. प्रविण तायडे यांनी अभ्यासिकेसाठी आवश्यक त्या सुविधा तत्काळ उपलब्ध करण्याबाबत आश्वास्त केले.यावेळी निवेदन देतांना पंकज केदार,मोहीत झाडे, ऋषिकेश भागवत, ऋतिक लाडोळे, हरी इंगोले, अक्षय खरडकर, नकुल ठाकरे,पवन साबळे, कुणाल चव्हाण, राम तामसे, इशांत झोंबाडे, जयंत गाठे, करण वानखडे, क्रिष्णा श्रीवास्तव, ओम इंगोले, सक्षम तनपिलवार, श्रेयस डोंगरे, श्याम हेडाऊ, वेदांत गोलाईत, दुर्गेश आवनकर, दर्शन बुंदेले गौरी गाडगे, दिव्या झोंबाडे, सृष्टी सिसट, निकिता इंगोले, पूजा गुळदे, कल्याणी आवनकर, आनंदी कडू, रोहिणी भुस्कटे, मोहसीन खान आदि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती परीक्षेत पं.स.भातकुली जिल्ह्यात अव्वल

### रामेश्वर माळवे साहेब यांच्या नियोजनाला यश

**अमरावती/का.प्र.**

भातकुली-शैक्षणिक सत्र २०२५-२६मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने वर्ग ५वी व वर्ग ८वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन फेब्रुवारी २०२६ मध्ये करण्यात आले होते, या परीक्षेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला.

पं. स. भातकुली ने शिष्यवृत्ती परीक्षेतील आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत, संपूर्ण जिल्ह्यात निकालामध्ये पं. स. भातकुली ने वर्ग ५ वी चा निकाल ५५% व वर्ग ८वी चा निकाल ३४.३६ % असा घेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवत जिल्ह्यात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. पं. स. भातकुली चे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे साहेब यांनी शिष्यवृत्ती परीक्षा संबंधाने केलेले उत्कृष्ट नियोजन,



शिष्यवृत्ती परीक्षा संबंधाने शाळा स्तरावर घेतलेल्या चार सराव परीक्षा व शाळा स्तरावर मुख्याध्यापक,शिक्षकांनी विध्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन व त्यांच्या कडून करून घेतलेला सराव व विध्यार्थी व पालक यांनी घेतलेली मेहनत या सर्व गोष्टीचे हे यश असल्याचे दिसून येते.तसेच शाळेवर विशेष तासिका शिक्षकांनी घेतल्या. शिष्यवृत्ती परीक्षा संबंधाने वर्षभर हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी पंजाबराव पवार (शिक्षण विस्तार अधिकारी), जानराव सुलताने (केंद्रप्रमुख आष्टा),राजेंद्र नकाशे (केंद्रप्रमुख भातकुली)निता सोमवंशी (केंद्रप्रमुख गणोरी )प्रशांत रघुवंशी (केंद्रप्रमुख खारतळेगाव)बाळासाहेब धनस्कर (केंद्रप्रमुख पूर्णानगर) उमेश चुनारकर (केंद्रप्रमुख खोलाप),रविंद्र धरमठोक (केंद्रप्रमुख वाठोडा शुकलेश्वर) शैलेंद्र स. दहातोंडे (केंद्रप्रमुख आसरा ),हर्षवर्धन इंगळे (विषय साधन व्यक्ती/तालुका समन्वयक, शिष्यवृत्ती परीक्षा ), चंद्रकांत कडबे (विषय साधन व्यक्ती ) हेमंत कुंभलवार ( विषय साधन व्यक्ता)श्रीकांत खरबडे(विषय साधन व्यक्ती )मीनाक्षी खरटमोल (विषय साधन व्यक्ती ) सतीश वानखडे (विषय साधन व्यक्ती), सुजाता सोनवणे (विषय साधन व्यक्ती) रुपाली शिरोट पौर्णिमा काकड तसेच सर्व केंद्रास्तरित विशेष शिक्षक यामध्ये अक्षय वैद्य, प्रज्ञा रामटेके, मंदा आंडे,रिता गुडदे, मेघा साबळे, कांचन दुधे व वैशाली शिरभाते यांनी विशेष मेहनत घेतली.उत्तिर्ण विद्यार्थाचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा २७ मेपासून

### एआय-आधारित सीसीटीव्ही निगराणीखाली परीक्षा प्रक्रिया

**अमरावती/का.प्र.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या उन्हाळी मे-जून २०२६ परीक्षांना २७ मेपासून प्रारंभ होत असून अमरावती विभागांतर्गत एकूण ८४ परीक्षा केंद्रांची निश्चिती करण्यात आली आहे. परीक्षा शिस्तबद्ध, पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून यंदा अनेक महत्त्वपूर्ण आणि कठोर उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

कुलगुरू डॉ. राजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, परीक्षा नियंत्रक बटूप्रसाद पाटील तसेच विभागीय संचालक डॉ. जयंत वडते यांच्या सहकार्याने परीक्षा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे.यंदाच्या परीक्षेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे सर्व परीक्षा केंद्रांवर प्रथमच एआय-आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय. या यंत्रणेचे नियंत्रण परीक्षा विभाग, नाशिक तसेच विभागीय केंद्रामार्फत ठेवण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिका डाउनलोड करण्यापासून ते उत्तरपत्रिका सीलिंगपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही देखरेखीखाली राहणार असल्याने परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येणार आहे. विद्यापीठाचा हा निर्णय सर्व स्तरांतून स्वागतार्ह मानला जात असून परीक्षा व्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न मानला जात आहे. मागील जानेवारी-२०२६ हिवाळी परीक्षेदरम्यान काही संवेदनशील केंद्रांवर अमरावती विभागीय केंद्रामार्फत 'बैठे भरारी पथक' संकल्पना राबविण्यात आली होती. या उपक्रमाबाबत विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान, मे-जून २०२६ परीक्षेसाठी भरारी पथकांमध्ये प्राचार्य दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला असून वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून नीट सेट व पीएचडी पात्रता धारकांची नियुक्ती करण्यात आली आहे. उन्हाळी मे-जून २०२६ परीक्षा नियमबद्ध, पारदर्शक, शिस्तबद्ध आणि विद्यार्थीकेंद्रित तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधितांनी सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

**तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर :** यंदाच्या उन्हाळी परीक्षांमध्ये पारदर्शकता, शिस्त व कॉपीमुक्त वातावरण सुनिश्चित करण्यासाठी विद्यापीठाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर प्रथमच एआय-आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून त्याचे थेट नियंत्रण नाशिक परीक्षा विभाग व विभागीय केंद्राकडून राहणार आहे. प्रश्नपत्रिका डाउनलोडपासून ते उत्तरपत्रिका सीलिंगपर्यंत संपूर्ण परीक्षा प्रक्रिया या सीसीटीव्ही निगराणीखाली राहणार आहे. यामुळे कोणतीही अनियमितता होण्यास प्रतिबंध होऊन पारदर्शकता अधिक बळकट होईल. या तांत्रिक उपाययोजनांमुळे परीक्षा व्यवस्थापन अधिक सक्षम, सुरक्षित व विश्वासार्ह होईल, असा विश्वास विद्यापीठ प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## विद्यापीठात आयुष्मान भारत कार्डसाठी २६ व २७ मे रोजी विशेष शिबीर

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ प्रशासनातर्फे कुलगुरू डॉ. मिलिंद बाराते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ परिसरात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण पुढाकार घेण्यात आला आहे. विद्यापीठ आरोग्य केंद्राद्वारे २६ मे २०२६ आणि २७ मे २०२६ रोजी आयुष्मान भारत (PM-JAY) अंतर्गत 'आयुष्मान कार्ड' काढण्याकरिता एका विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे शिबिर विद्यापीठ परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृह येथे आयोजित केले असून, दोन्ही दिवशी दुपारी २.०० ते ५.०० वाजताच्या दरम्यान ही प्रक्रिया पार पडेल.विद्यापीठाच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात आणि कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांना या सुवर्णसंधीचा आणि शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भातील अधिकृत परिपत्रक विद्यापीठाच्या सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागांना जारी करण्यात आले आहे.

**कोणाला घेता येणार लाभ**

विद्यापीठ परिसरात कार्यरत असलेले सर्व शिक्षकेत्तर अधिकारी आणि कर्मचारी, जॉब वर्कर, एकत्रित वेतन धारक (Fixed Pay staff), सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी

**आवश्यक कागदपत्रे**

या शिबिराचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी खालील कागदपत्रांसह उपस्थित राहणे अनिवार्य आहे:


१. आधार कार्ड (मूळ प्रत आणि झेरॉक्स प्रत)

२. मोबाईल क्रमांक (जो आधार कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे)

३. डिजिटल रेशन कार्ड (मूळ प्रत आणि झेरॉक्स प्रत)

## महामार्गावरील कडुलिंबाच्या झाडांना आग

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**



अमरावती–परतवाडा महामार्गावरील हिरव्यागार कडुलिंबाच्या झाडांना आग लावण्याच्या घटना थांबता थांबत नसून शुक्रवारी दिनांक २२ मे ला सकाळी आसेगाव पूर्णा गावाजवळ चार ते पाच झाडांना अज्ञातांकडून आग लावण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पर्यावरणप्रेमींनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी धूर व आगीचे लोळ उठल्याने रस्त्यावर अंधाराचे सावट पसरले होते.यावेळी मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती.उन्हाळ्याचे दिवस व जोरदार वाऱ्यामुळे आग गावाच्या दिशेने पसरली असती तर मोठी दुर्घटना घडली असती. मात्र स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी संजय गायकवाड यांनी प्रसंगावधान राखत अचलपूर व चांदूर बाजार येथील अग्निशमन दलाला तातडीने पाचारण केले. अग्निशमन दलाच्या दोन वाहनांनी घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणली आणि संभाव्य अनर्थ टळला दरम्यान, महामार्गावरील शेकडो वर्षे जुन्या कडुलिंबाच्या झाडांना वारंवार लक्ष्य केले जात असल्याने संबंधित विभागाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणी यापूर्वीही पोलिसांत तक्रार देण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अभय बारब्दे यांनी दिली.

## २३७ दिवस नवीन शालेय सत्रात कामकाज

### १२८ दिवस सुट्ट्या

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्राथमिक शाळांच्या सुट्ट्यांचे नियोजन जाहीर केले आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सतीश मुगल यांनी काढलेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळांना हे नियोजन लागू राहणार आहे.

नियोजनानुसार सार्वजनिक, स्थानिक, दिवाळी, उन्हाळी तसेच विविध विशेष सुट्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. शासनाच्या अधिसूचनेनुसार २४ सार्वजनिक सुट्ट्यांपैकी महाशिवरात्री व लक्ष्मीपूजन या रविवारी आल्याने एकूण २२ दिवस सार्वजनिक सुट्ट्या राहणार आहेत. अमरावती विभागीय आयुक्तांच्या अधिकारातील रक्षाबंधन, पोळा आणि गौरी पूजन अशा तीन विशेष सुट्ट्यांनाही मंजुरी देण्यात आली आहे. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी यात्रा महोत्सव, संत गाडगेबाबा पुण्यतिथी, जिल्हा परिषद व तालुका क्रीडा महोत्सव, शाळा व्यवस्थापन समितीच्या अधिकारातील सुट्टी अशा स्थानिक सुट्ट्यांचाही समावेश आहे. दिवाळी सुट्टी ६ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०२६ दरम्यान राहणार असून उन्हाळी सुट्टी २ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत जाहीर करण्यात आली आहे. विदर्भातील वाढते तापमान लक्षात घेऊन शासनाच्या निर्देशानुसार ही सुट्टी निश्चित करण्यात आली असल्याचे आदेशात नमूद आहे. १५ जून ते २९ जून या कालावधीत सर्व माध्यमांच्या शाळा सकाळ सत्रात सकाळी ७ ते ११.४५ या वेळेत भरतील. त्यानंतर ३० जूनपासून नियमित वेळेत शालेय सत्र सुरू राहणार आहे. एकूण ३६५ दिवसांपैकी १२८ दिवस सुट्ट्या राहणार असून २३७ दिवस शालेय कामकाज होणार आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार आवश्यक शैक्षणिक तास पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे नियोजन करण्यात आले असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

## संक्षिप्त

### गणेश डोळस यांची शिवसेना तालुका प्रमुखपदी निवड



**तिवसा -** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने येणाऱ्या जिल्हा परिषद तसेच नगरपरिषद स्थानिक निवडणूकीच्या अनुषंगाने सर्वत्र पक्ष बांधणी करून कार्यकारणी घोषित करण्यासाठी तिवसा येथील विश्राम गृह येथे जिल्हा प्रमुख आशिष धर्माळे व तिवसा नगरपंचायतचे विरोधी पक्षनेते धनराज थुल यांच्या उपस्थितीमध्ये शहरासह तालुक्यातील शिवसैनिकांचीं बैठक पार पडली. यावेळी होणाऱ्या जिल्हा परिषद व स्थानिक निवडणूका तसेच पक्षातून निघून गेलेल्या पदाधिकारी व इतर विषयावर मंथन करण्यात आले तसेच यावेळी उपस्थित गणेश डोळस यांची तालुका प्रमुखपदी निवड करण्यात आली.यावेळी नगरसेवक आशिष ढोले,माजी नगरसेवक किशोर सातपुते,शहर प्रमुख अजय आमले,रहीम शहा,प्रवीण डहाके,अनिल बाखडे,प्रशांत डहाके,सुमित जाधव,बाळा बिजवे,मनोज गुरड,वैभव इखार,गोविंदा जस्वानी,प्रफुल मकेश्वर,दिनेश पुरी,पंकज लांडगे,संतोष मोरे,सुरज मकेश्वर, सोनू लांडगे,शिवा शापामोहन,उमेश राऊत, मनोज बाखडे,मनोज खाकसे,मंगेश हिमाने यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होतें.

### राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे आदित्य पद्मनेचा सत्कार



**अमरावती-**गोपाल नगर येथील बाळकृष्ण पद्मने यांचा मुलगा आदित्य पद्मने याने वर्ग बारावी मध्ये ९२ टक्के गुण प्राप्त करून श्री समर्थ कनिष्ठ महाविद्यालयामधून प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाशराव शेलापूरकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून सूतगिरणी प्रभागाचे नगरसेवक संजय गव्हाळे, जिल्हा संपर्कप्रमुख पुरुषोत्तम वनस्कर, शिक्षक आघाडीचे विदर्भ अध्यक्ष प्रा.गजानन वानरे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा सचिव पाडूरंग गोंडेकर,सेवानिवृत्त गृहपाल विठ्ठलराव मानकर आदिची उपस्थिती होती.

### मासोद गावातील ई-क्लास जागा हस्तांतरास ग्रामस्थांचा तीव्र विरोध!

**अंजनगाव बारी -** अमरावती तालुक्यातील मासोद गावातील सर्व्हे क्रमांक २६२, २६३ क्षेत्रामधील ई- क्लास प्रकल्पासाठी आरक्षित जागा अन्य ठिकाणी हस्तांतरित करण्याच्या हालचालीविरोधात ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या संदर्भात तहसीलदार कार्यालय, जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासनासह मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत निवेदन सादर करून शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. तहसीलदार अमरावती यांनी काढलेल्या पत्रानुसार काही जमीन ई-क्लास प्रकल्पासाठी दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे दिसून येते. परंतु गावकऱ्यांचे म्हणणे असे की  ही जागा शैक्षणिक विकास, आरोग्य केंद्र, महिला उद्योगाभिमुख उपक्रम, ग्रामविकास कार्ये, महिला बचतगट, पाणीपुरवठा इत्यादींसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील ग्रामविकासाची योजना या जागेवर अवलंबून आहे.शासनाने निर्णय मागे घेतला नाही तर ६ जून २०२६ पासून तीव्र आंदोलन उभारले जाईल.यासाठी प्रशासनाकडे निवेदनाची प्रत मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, खा.बळवंत वानखडे अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त, अमरावती, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, अमरावती, गटविकास अधिकारी ग्रामपंचायत सदस्य व सचिव यांना निवेदन देण्यात आले.

### 'भारत टॅलेंट सर्च' परीक्षेत मनपा शाळेची भरारी

**अमरावती :** महानगरपालिका शाळा क्रमांक १४, वडाळी येथील विद्यार्थ्यांनी 'भारत टॅलेंट सर्च' ही परीक्षा दिली होती. सदर परीक्षेत शाळेतील आठही विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.'टॅलेंट' सिद्ध शाळेमध्ये आयोजित कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. इयत्ता पहिलीमधील ऋषी अनिल मेश्राम, तनिष गोपाळ डोंगरे (जिल्ह्यातून पाचवा क्रमांक), इयत्ता दुसरीमधील स्वरा सचिन तुप्पट, रुद्र आशिष ब्राह्मणकर, इयत्ता तिसरीमधील रोहिणी अतुल बावणे, स्वरांजली सतीश राऊत, गुणश्री गुणवंत बोरकर व ईश्वरी अविनाश माहुलकर यांनी पहिल्याच प्रयत्नात सदर परीक्षा उत्तीर्ण केली. शाळेचे मुख्याध्यापक योगेश पखाले, केंद्र समन्वयक अनुप भारंबे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुनंदा मेहरे, शिक्षिका सुलोचना डाखोळे, करिष्मा गोफने, प्राजक्ता चौधरी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच शाळेतील इयत्ता दहावीमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांनासुद्धा सन्मानित करण्यात आले. महानगरपालिका शाळा क्रमांक १४ वडाळी येथील शिक्षिका स्मिता वानखडे, ज्योत्स्ना गवई, मोनिका पंधरे, वैशाली देशमुख यांनी विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी मार्गदर्शन केले होते. त्यामुळे त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

### आयडीए वाढीसाठी बीएसएनएल पेन्शनधारकांचे धरणे आंदोलन

**अमरावती -** १ जानेवारीपासून देय असलेली आयडीए (औद्योगिक महागाई भत्ता) वाढ तात्काळ लागू करून जानेवारी ते मार्च या कालावधीतील थकबाकी अदा करावी, या प्रमुख मागणीसाठी बीएसएनएल पेन्शनधारकांनी बुधवार, २० मे रोजी शहरातील दूरसंचार भवन परिसरात धरणे आंदोलन केले. महाप्रबंधक टेलिकॉम कार्यालय, दूरसंचार भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात सुमारे १५० पेन्शनधारकांनी सहभाग नोंदविला. यावेळी हक्काची आयडीए वाढ त्वरित लागू करा, थकबाकी द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. हे आंदोलन कमिटी ऑफ बीएसएनएल/एमटीएनएल पेन्शनर्स असोसिएशन्स यांच्या वतीने देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी ऑल युनियन्स अँड असोसिएशन्स ऑफ बीएसएनएल यांनीदेखील मानवी साखळी आंदोलन करत पेन्शनधारकांच्या लढयाला समर्थन दिले. पेन्शनधारकांच्या मते, सार्वजनिक उपक्रम विभागाने २७फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या आदेशातून १ जानेवारीपासून लागू होणारी आयडीए वाढ अधिसूचित करण्यात आली होती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# 'गाजीपूर फाईल्स'चा भूकंप; रातोरात शांत झाले क्रशर!

## -सूर्यास्तानंतर धडाडणारा खनिज पट्टा अचानक बंद -कथित खनिज माफियांसह महसूल प्रशासनात खळबळ

**ॲड.समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर-रुदाळी परिसरात अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या रात्रीच्या गौण खनिज उत्खनन, स्टोन क्रशर, ब्लास्टिंग आणि डंपर वाहतुकीच्या साम्राज्यावर अखेर कालच्या वृत्तानेच जणू घाव घातला आहे. शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या 'गाजीपूर फाईल्स' या वृत्तानंतर अवघ्या काही तासांत संपूर्ण खनिज पट्ट्याचे चित्र बदलल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

नेहमी सूर्यास्तानंतर धुराने, धुळीने आणि ब्लास्टिंगच्या आवाजाने हादरणारा गाजीपूर-रुदाळी परिसर शुक्रवारी रात्री अक्षरशः शांत होता. एकही क्रशर सुरू नव्हते, डंपरची वर्दळ नव्हती आणि रात्रीच्या अंधारात सुरू राहणारी ब्लास्टिंगची धडधडही गायब झाली होती.

त्यामुळे 'वृत्तपत्रात बातमी प्रकाशित केल्यावरच जर सगळे बंद होत असेल, तर इतके दिवस सुरू असलेला खेळ कायदेशीर होता का?' अशी चर्चा परिसरात रात्रीच्या वेळी रंगली होती.

गेल्या अनेक वर्षांपासून पोपटखोड गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या या भागात गौण खनिज उत्खननाचा प्रचंड विस्तार झाला. डोंगर पोखरले गेले, वनक्षेत्रालगतचे भूभाग उद्ध्वस्त झाले, तर रात्रीच्या अवैध उत्खननाने गावकऱ्यांचे जगणे असह्य बनले. रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या क्रशरच्या कर्णकर्कश आवाजामुळे ग्रामस्थांची झोप उडाली होती. धुळीच्या प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार वाढत असल्याची तक्रार होती. ब्लास्टिंगमुळे घरांना तडे जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी अनेकदा केला. मात्र प्रत्येक वेळी प्रशासनाने अर्थपूर्ण कानाडोळाच केल्याची भावना नागरिकांमध्ये होती.

या संपूर्ण प्रकरणात महसूल विभागाच्या भूमिकेवर सर्वाधिक प्रश्न उपस्थित होत आहेत. कारण रात्री सुरू असलेल्या क्रशर आणि डंपर वाहतुकीबाबत ग्रामस्थांकडून अनेकदा तक्रारी करण्यात आल्या होत्या. पर्यावरणप्रेमींनीही नियमभंगाचा मुद्दा उपस्थित केला होता. तर दुसरीकडे या भागातील खनिजाचा वापर अकोट विधानसभा मतदारसंघातील अनेक रस्ते, डांबरीकरण, काँक्रिटीकरण आणि सार्वजनिक बांधकामांमध्ये झाल्याचे बोलले जाते. मात्र अनेक रस्ते अल्पावधीतच खचल्याने निकृष्ट दर्जाच्या खनिजाचा वापर झाला का, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

अकोला-अकोट मार्गाची दुरवस्था अजूनही नागरिक विसरलेले नाहीत. आता सुरू असलेल्या अकोट-दर्यापूर मार्गाच्या कोट्यवधींच्या कामातही याच परिसरातील खनिज वापरले जात असल्याची चर्चा असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या संपूर्ण प्रकरणात लोकप्रतिनिधींच्या मौनाने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. निवडणुकांच्या काळात विकासाचे गोडवे गाणारे नेते आता पर्यावरण, महसूल चोरी आणि आदिवासी भागातील शोषणाच्या प्रश्नावर गप्प का आहेत, असा प्रश्न विचारला जात आहे. 'अकोटचा वाली नेमका कोण?' हा प्रश्न आता गावागावात ऐकू येत आहे.


जनमाध्यम
'गाजीपूर फाईल्स' : प्रशासनाचे मौन अन् लोकप्रतिनिधींनीही घेतले बहिरेपणाचे सोंग
रात्रीच्या काळोखातही सुरू राहते खनिज उत्खनन, प्रक्रिया आणि ब्लास्टिंग

### आदिवासींच्या नावावर खदानी; पैसा दुसऱ्यांच्या खिशात?

सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या या आदिवासीबहुल पट्ट्यात गेल्या काही वर्षांत खनिज माफियांनी मजबूत जाळे उभे केल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. आदिवासींच्या नावावर खदान परवाने घेतले जातात; मात्र प्रत्यक्ष व्यवहार, आर्थिक उलाढाल आणि खनिज वाहतुकीचे नियंत्रण धनदांडग्यांकडे असल्याची चर्चा आहे. स्थानिकांच्या मते, जेव्हा अवैध उत्खननावर दंडात्मक कारवाई होते तेव्हा त्याचा फटका आदिवासींनाच बसतो; तर खरे सूत्रधार मात्र मोकाट राहतात. त्यामुळे या संपूर्ण व्यवस्थेच्या मुळाशी कोण आहे, याची चौकशी व्हावी, अशी मागणी आता तीव्र झाली आहे.

### पर्यावरण धोक्यात; वन्यजीवांनाही फटका-

वनक्षेत्रालगत सुरू असलेल्या अनियंत्रित ब्लास्टिंगमुळे भूगर्भीय संतुलन बिघडत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. ध्वनी आणि वायू प्रदूषणामुळे ग्रामस्थांच्या आरोग्यावर परिणाम होत असून शेती, विहिरी आणि जलस्रोतांनाही धोका निर्माण झाला आहे. वन्यजीवांच्या अधिवासालगत सुरू असलेल्या या कारवायांमुळे वन्यजीव स्थलांतरित होत असल्याची भीतीही व्यक्त होत आहे. मात्र या गंभीर मुद्द्यांवर संबंधित विभागांचे मौन अधिकच गडद होत चालले आहे.


### रात्रीचा खेळ कोणाच्या आशीर्वादाने?

गौण खनिज अधिनियम २०१३ नुसार सूर्योदय ते सूर्यास्त या वेळेतच गौण खनिज उत्खनन आणि प्रक्रिया करण्यास परवानगी आहे. पर्यावरणीय मंजुरी, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, ब्लास्टिंगचे निकष आणि वैध रॉयल्टी बंधनकारक आहे. मात्र गाजीपूर-रुदाळी परिसरात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेले क्रशर, ब्लास्टिंग आणि डंपर वाहतूक यामुळे नियमांचे उघड उल्लंघन होत असल्याचा आरोप सातत्याने होत होता. आता एका वृत्तानंतर रात्रीचा संपूर्ण कारभार अचानक बंद झाल्याने या आरोपांना अधिक बळ मिळत आहे.

# पाण्याच्या शोधात व्याकुळ हरणाच्या पिल्लावर भटक्या कुत्र्यांचा हल्ला

### -गुरुदेवनगर परिसरातील घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील गुरुदेव नगर परिसरात आज (दि.२२) सकाळी सुमारे सहा वाजताच्या दरम्यान वाढत्या उष्णतेमुळे व पाण्याच्या शोधार्थ जंगल परिसरातून बाहेर पडलेल्या एका हरणाच्या पिल्लावर भटक्या कुत्र्यांच्या कळपाने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले.ही घटना गुरुदेव नगर येथील पाण्याच्या टाकीमागील भागात घडली. मिळालेल्या



माहितीनुसार, पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे भटकंती करत असलेल्या हरणाच्या पिल्लाला कुत्र्यांच्या कळपाने घेरले व त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. या दरम्यान कुत्र्यांनी पिल्लाच्या पायाजवळील भागाचे लचके तोडल्याने ते गंभीररीत्या जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व प्राणीप्रेमींनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मोठ्या प्रयत्नांनी जखमी पिल्लाला कुत्र्यांच्या तावडीतून सुरक्षित बाहेर काढले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, उपस्थित नागरिक व प्राणी मित्रांनी तात्काळ तिवसा वन विभागाला सदर घटनेची माहिती दिली. मात्र, तब्बल दीड तास उलटूनही वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी न पोहोचल्याने नागरिकांमध्ये यादरम्यान ☞(पान २ वर)

# नवजात बालिकेच्या मृत्यूप्रकरणात आई-वडिलावर गुन्हा दाखल

### -उन्हात झोपविल्याने जीव गुदमरून मृत्यू झाल्याचे स्पष्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कालीमाता नगरात एका नवजात बालिकेचा मृत्यू झाल्यानंतर तिचा मृतदेह जमिनीत पुरण्यात आला होता. हा प्रकार उघड झाल्यानंतर पोलीसांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला होता. शवविच्छेदन अहवालानंतर त्या बालीकेला उन्हात झोपविल्याने जीव गुदमरून मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणात बडनेरा पोलीसांनी आरोपी आई-वडिलांविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये सूरज महेंद्रसिंग गुजर (वय ४५) आणि एक महिला (वय ४०), दोघेही रा. सावता मैदान, जुनी वस्ती, बडनेरा यांचा समावेश आहे.

साईनगरजवळील खंडेलवाल यांच्या जागेतील कालीमाता नगरात नवजात बालिकेच्या मृत्यू प्रकरणाने खळबळ उडाली होती. या प्रकरणात बडनेरा पोलिसांनी सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती, ☞(पान २ वर)

# गोवंश तस्करीवर पोलिसांची धाड, ११ जनावरांची सुटका

**अमरावती/प्रतिनिधीः-** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर गुन्हे शाखेने गोवंश कत्तलीविरोधात मोठी कारवाई करत ११ गोवंश जनावरांची सुटका केली. या कारवाईत एका संशयिताला अटक करण्यात आली असून तब्बल २ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



शहरात सणासुदीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गाडगेनगर परिसरात गस्तीदरम्यान ही कारवाई केली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आझाद नगर परिसरातील एका टिन शेडमध्ये गोवंश जनावरे संशयास्पदरीत्या बांधून ठेवण्यात आली होती. माहितीची खातरजमा होताच गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने छापा टाकला. छाप्यात ११ लहान-मोठी गोवंश जनावरे आखूड दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आली. पंचनामा करून पोलिसांनी सर्व जनावरे ताब्यात घेतली. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या☞(पान २ वर)

# मध्यरात्री विद्युत पुरवठा खंडित, बुधवारा परिसरात संताप

### महावितरण अधिकाऱ्यांचा फोनवर नो रिस्पॉन्स

**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या काही दिवसापासून शहर आणि जिल्ह्याचे तापमान वाढलेले आहे. गर्मीमुळे नागरिकांच्या जीवाची लाही लाही झालेली आहे. दुपार आणि रात्रीच्या वेळेस तापमान जास्त असल्याने कुलर -एसी शिवाय जगणे मुश्किल झाले आहे. अशात गुरुवारी मध्यरात्री दोन वाजता सुमारास बुधवारा परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाला. यामुळे नागरिकांची दयनीय अवस्था झाली. महावितरणच्या वतीने देण्यात आलेले नंबर वर फोन केल्यावर कोणीही फोन उचलले नाही. अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही. नागरिकांमध्ये प्रचंड आक्रोश महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांविरुद्ध दिसत आहे. तासंतास विज पुरवठा खंडित झाला होता. विभागाच्या वतीने कोणतीही पर्याय व्यवस्था आणि सुविधा उपलब्ध करून दिली नाही. अधिकाऱ्यांनी फोनही उचलले नाही. विद्युत आपुर्ती पंडित झाल्याने जलापूर्ती आणि इतर अडचणीनाही तोंड द्यावे लागले. पंखे ,कुलर, एसी सह आवश्यक उपकरण बंद पडले होते आणि घामाचे लोट वाहत होते. लहान मुलं आणि लोकांची बिकट परिस्थिती झाली होती. त्यामुळे महावितरणच्या नावाने चांगलीच आरडा-ओरड रात्री दरम्यान बुधवारामध्ये पाहायला मिळाली. महावितरणच्या☞(पान २ वर)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

### कपडे खरेदी करण्यासाठी सासुरवाडी जाताना अपघात

**वर्धा/प्रतिनिधीः-** हिंगणघाटच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर हॉटेल तनवीर सगुना फॅक्टरीजवळ आज शुक्रवार २२ मे रोजी अत्यंत भीषण अपघात घडला. या अपघातात एका कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतांमध्ये पती-पत्नी आणि सहा वर्षांच्या चिमुकलीचा समावेश आहे.



माहिती नुसार, गजानन वानखेडे (वय ४५), पल्लवी वानखेडे (वय ३८) आणि आरोही वानखेडे (वय ६) हे मोपेड क्रमांक MH ३२ AM १६९४ ने आपल्या सासरवाडीतून कपडे खरेदीसाठी हिंगणघाटकडे येत होते. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर विरुद्ध दिशेने भरधाव येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या मोपेड दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत तिघांचाही जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिस ११२ पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर तिघांनाही मृत घोषित केले. विशेष म्हणजे, मृत झालेली आरोही ही जुळी बहीण असून तिच्या पश्चात आणखी एक बहीण आहे.

वानखेडे कुटुंब हे समुद्रपूर तालुक्यातील कुर्ला येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून हळहळ ☞(पान २ वर)

# वारंवार विद्युत पुरवठा खंडित होण्यावर तातडीने उपायोजना करा- आ.सुलभा खोडके

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऐन उन्हाळाचे दिवसात अमरावतीकरांना अपुऱ्या व वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.अनेक भागात तासंतास वीज पुरवठा चालू -बंद राहत असल्याने रखरखत्या गर्मीत नागरिक चांगलेच हैराण झाल्याने त्यांचा महावितरण विरोधात देखील अंसतोष दिसून येत आहे. त्या पार्श्वभूमीवर आमदार सुलभा खोडके यांनी महावितरण प्रशासनासोबत चर्चा करून शहरातील अनेक भागात निर्माण झालेल्या व्होल्टेज समस्या आणि ओव्हरलोडिंग संदर्भात अडथळे दूर करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना केल्यात.



या संदर्भात आ. खोडके यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता देवहाते यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले कि, शहराच्या सर्वच भागातील घरगुती वीज ग्राहक व वाणिज्यिक वापरातील वीज ग्राहकांना विद्युत पुरवठा करत असतांना अस्तित्वातील जुने डीपी ट्रान्सफॉर्मरवर प्रचंड लोड येत असल्याने व्होल्टेजची समस्या आणि ओव्हरलोडिंगमुळे वीज पुरवठा बंद होत आहे. ट्रान्सफार्मरवर ओव्हरलोड आल्याने ट्रिपिंग होत असल्याने शहरात वारंवार वीज पुरवठा चालू -बंद होत असल्याची माहिती त्यांनी दिली. याबाबत महावितरणकडे अपुरे संसाधने असल्याने एवढ्या मोठ्या शहराचा डोलारा सांभाळतांना सुद्धा महावितरणला चांगली कसरत करावी लागत आहे. यावर आ. सुलभा खोडके यांनी चर्चा करतांना ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

### -फोटो व्हायरल करण्याची धमकी

**अमरावती/प्रतिनिधीः-** ओळखीचा फायदा घेऊन एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केला. इतकेच नव्हे तर तीचे फोटो व्हायरल करण्याचीही धमकी तिला देण्यात आली. ही धक्कादायक घटना मंगरुळ दस्तगिर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवार, २१ मे रोजी उघडकीस आली. याप्रकरणात मंगरुळ दस्तगिर पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशांत इंगळे रा. बोरगाव धुरी, ता. परतवाडा, अमरावती, असे आरोपीचे नाव आहे.

अल्पवयीन मुलगी अमरावतीत शिक्षण घेत असताना, मुलीच्या आईने आरोपी प्रशांतकडून ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यावेळी प्रशांतने मुलीचा संपर्क क्रमांक घेतला होता. त्यानंतर प्रशांतने मुलीला फोनवरून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्यात चॅटींग सुरु झाली आणि प्रेमसंबंध प्रस्थापीत झाले. दरम्यान मुलीने प्रशांतकडून ५० हजार रुपये घेतले आणि तीने ते काही दिवसांनी परत सुध्दा केले. दरम्यान एका दिवशी प्रशांतने मुलीला वडाळीच्या बांबु गार्डनमध्ये फिरायला सुध्दा नेले. ८ मे रोजी पिडित मुलगी ही निकाल पाहण्यासाठी अमरावतीत आली. त्यावेळी तीने प्रशांतला फोन करून बोलाविले. त्यानंतर त्यांनी कॉलेजमध्ये जाऊन मार्कशिट घेतली. परंतू त्यावेळी प्रशांतने मित्राच्या कारने मुलीला शहरातील एका खोलीवर नेले आणि तिच्याशी जबरदस्तीने शारिरिक संबंध☞(पान २ वर)

# नांदगाव येथे SFI-DYFI तर्फे NEET पेपरफुटी विरोधात तहसीलदारांना निवेदन

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** देशभर गाजत असलेल्या NEET परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसह दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) व डेमॉक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया (DYFI) यांच्या वतीने नांदगाव खंडेश्वर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, NEET परीक्षेतील गैरप्रकारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यासमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थी प्रामाणिकपणे मेहनत करून परीक्षा देतात, मात्र अशा भ्रष्ट प्रकारांमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर ☞(पान २ वर)




# ग्राम स्तरावरील महसूली कामकाजाची तपासणी करा

## -अपर मुख्य सचिव विकास खारगे यांचे निर्देश

### -अमरावती विभागाच्या महसूल कामकाजाचा आढावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी प्रत्येक महसूल अधिकाऱ्याने आठवड्यातून एक दिवस ग्राम स्तरावरील महसूल यंत्रणांना व प्रत्यक्ष कार्यस्थळांना भेट देऊन तपासणी करावी, असे निर्देश अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी दिले.



अमरावती जिल्हा दौऱ्यादरम्यान विविध शासकीय कार्यालयांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर, विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित अमरावती विभागाच्या महसूल कामकाजाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी महाराजस्व अभियान प्रभावीपणे राबवण्याचे आणि महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत (RTS) अधिसूचित सेवा नागरिकांना विहित वेळेत☞(पान २ वर)

